विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

फेब्रुवारी २०२२



# योद्धा विचारवंत

## प्रा.डॉ.एन.डी.पाटील अभिवादन विशेषांक



शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या खुनाच्या तपासात दिरंगाई होत असल्याने कोल्हापूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांची कार्यकर्त्यांसह एन. डी. पाटील यांनी भेट घेतली.



शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्याकडून डी. लिट. ही पदवी स्वीकारताना एन. डी. पाटील.



डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाच्या तपासात होत असलेल्या दिरंगाईबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करण्यासाठी डॉ. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ गेले होते. भेटीसाठी मुंबई विधान भवनात जाताना तत्कालीन उच्च शिक्षण मंत्री नामदार विनोद तावडे हे या शिष्टमंडळाला प्रवेशद्वाराजवळ घ्यायला आले होते. यावेळी अविनाश पाटील, माधव बावगे, शैला दाभोलकर आदी होते.




रयत शिक्षण संस्थेने 'रयत जीवनगौरव' पुरस्कार सुरू केला. त्याचा पहिला मान. एन. डी. पाटील यांना दिला. हा पुरस्कार शरद पवार यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी रयतचे चेअरमन डॉ. अनिल पाटील आदी उपस्थित होते.




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार' शरद पवार यांच्या हस्ते एन. डी. पाटील व पत्नी सरोज पाटील यांना देण्यात आला. खासदार श्रीनिवास पाटील, डॉ. अनिल काकोडकर, अरुण गुजराथी, ज्येष्ठ लेखक जब्बार पटेल उपस्थित होते.



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रेरणास्थान दिवंगत जनार्दन भगत स्मृती जीवनगौरव पुरस्कार डॉ. एन. डी. पाटील यांना राज्याचे तत्कालीन उत्पादन शुल्क व कामगारमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष रामशेठ ठाकूर, पालकमंत्री आदिती तटकरे, माजी मंत्री आशिष शेलार, एन. डी. पाटील यांच्या पत्नी सरोज पाटील, महापौर डॉ. कविता चौतमोल आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.



**डॉ. नरेंद्र दाभोलकर**
संस्थापक कार्याध्यक्ष
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती


**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**

**संपादक**
नितीन शिंदे

**कार्यकारी संपादक**
उत्तम जोगदंड

**सहसंपादक**
एकनाथ पाटील

**सदस्य**
दीपक बाविस्कर
श्यामसुंदर मिरजकर
मांतेश हिरेमठ

**व्यवस्थापकीय संपादक**
विशाल विमल
अजय भालकर

**सदस्य**
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे

**सल्लागार मंडळ**
प्रदीप पाटकर
संध्या नरे-पवार

**कायदेशीर सल्लागार**
ॲड. गोविंद पाटील

**मुद्रितशोधन** : प्रल्हाद मिस्त्री

**मुखपृष्ठ : प्रशीक पाटील,**
इस्लामपूर

**स्वागतमूल्य : ₹ २५**



विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

**महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र**


# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

विज्ञान निर्भयता नीती


**वर्ष दुसरे । अंक दुसरा**
**फेब्रुवारी २०२२**


**योध्दा विचारवंत डॉ. एन.डी.पाटील अभिवादन विशेषांक**

# अनुक्रमणिका


- **संपादकीय**
- **सत्यशोधकी चैतन्य प्रवाह एन.डी. सर** / नरेंद्र दाभोलकर
- **पुढच्या पिढयांनी सोबत घ्यावा असा एनडीस्तंभ!** / यशवंत मनोहर
- **समग्र परिवर्तनाच्या लढाईतील महाशक्तिमान आणि चारित्र्यवान नेता** / उत्तम कांबळे
- **एन.डी. पाटील : मार्क्सवादी सत्याग्रही** / किशोर बेडकीहाळ
- **भाई एन्.डी. पाटील: एक लढाऊ सत्यशोधक मार्क्सवादी** / भारत पाटणकर
- **१९७२ चा दुष्काळग्रस्तांचा मोर्चा** / प्राचार्य विश्वास सायनाकर
- **सार्वजनिक जीवनातील बाप हरपला** / अविनाश पाटील
- **..................................** / किशोर ढमाले
- **प्रत्येक क्षण जिंदादिलीने भरलेले कृतार्थ जीवन** / उल्का महाजन
- **विज्ञान, निर्भयता, नीतीचे खरेखुरे मानवी रूप** / प्रदीप पाटकर
- **महाराष्ट्रअंनिसचा आधारवड गेला !** / माधव बावगे
- **आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार**/अरुण शिंदे
- **लोकलढ्यांचासेनानी हरपला**/संजय बनसोडे
- **एन.डी. काही आठवणी**/संजीव साने

- **कविता**
- **झंझावात**/एकनाथ पाटील
- **प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचा जीवनक्रम**
- **डॉ. एन. डी. पाटील अभिवादन सभा वृत्तांत**/उत्तम जोगदंड




सदरचे मासिक संपादक नितीन शिवाजीराव शिंदे यांनी भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापले आणि प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर (जिल्हा सांगली) ४१५ ४०९ येथून प्रकाशित केले आहे. महा. अंनिससाठी विवेक जागर ट्रस्टच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर ट्रस्ट सहमत असेलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



**संपादकीय पत्ता**
संपादक, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका,
'कल्पतरु', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, जि. सांगली - ४१५४०९. मोबा. : ९८६०४३८२०८

## विनम्र अभिवादन



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, लेखक, विचारवंत आणि समकालीन प्रश्नांचा अचूक वेध घेणारे पत्रकार अनिल अवचट यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी दुःखद निधन झाले. आयुष्यभर त्यांनी ज्या प्रकारचे रचनात्मक काम केले, ते महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या भूमिकेशी सुसंगत होते. त्यांच्या निधनाने समताधिष्ठित चळवळींची मोठी हानी झाली आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्यावतीने त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन...

सत्यासाठी आयुष्यभर अविरत संघर्ष करणारा सत्याग्रही हरपला...

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ सामाजिक विचारवंत, कष्टकरी जनतेचे नेते आणि डाव्या पुरोगामी चळवळींचे खंबीर आधारस्तंभ डॉ.एन.डी. पाटील यांचे दि.१७ जानेवारी २०२२ रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ९३व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातल्या डाव्या पुरोगामी चळवळी पोरक्या झाल्या आहेत. ज्यांच्याजवळ चळवळीतल्या सर्व प्रकारच्या अडी-अडचणी आणि सर्व स्तरांवरचे प्रश्न अत्यंत विश्वासाने घेऊन जावेत आणि त्यांनी तितक्याच विश्वासाने ऐकून घेऊन मोठ्या कुशलतेने ते मार्गी लावावेत, असा आमच्या कुटुंबातला वडीलधारा 'बापमाणूस' आम्ही गमावला आहे. त्यांचे आमच्यासोबत नसणे, ही कल्पनासुद्धा आम्हाला असह्य आणि सतत अस्वस्थ करणारी आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी एखादा भला मोठा ग्रंथही अपुरा ठरेल, एवढे त्यांचे काम व्यापक आणि बहुस्पर्शी आहे. हा अभिवादन विशेषांक आपल्या हाती सोपवताना त्यांच्या नसण्याचे अतीव दुःख आमच्या मनात आहे. दीपस्तंभ उन्मळून पडल्यावर खवळलेल्या समुद्रातील गलबतांची जी सैरभैर अवस्था होत असेल, त्या अवस्थेचा अनुभव आमच्यासह महाराष्ट्रभरातले सर्वच डाव्या पुरोगामी चळवळींचे कार्यकर्ते आज घेत आहेत. त्यांच्या जाण्याने आपण खूप काही गमावले आहे. न्यायासाठी आयुष्यभर अविरत संघर्ष करणाऱ्या फार मोठ्या सत्याला आपण आता पारखे झालो आहोत.

'बोले तैसा चाले' असेच त्यांचे जीवन आदर्शवत होते. कृती आणि विचार या दोन्ही आघाड्यांवर आयुष्यभर सतत ते संघर्ष करीत राहिले आणि म्हणूनच 'योद्धा विचारवंत' ही उपाधी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला तंतोतंत लागू पडते. नैतिक मूल्यांना सर्वोच्च स्थानी ठेवून कोणतीही किंमत मोजून त्याप्रमाणेच वर्तन करणारे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय जीवनातले एक देदीप्यमान पर्व त्यांच्यासोबत आता संपले आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत सार्वजनिक जीवनात हा नेता कमालीचे विलक्षण आणि झंझावाती आयुष्य जगला. जे जगला ते स्वतःसाठी खूप कमी आणि इतरांसाठीच अधिक जगला. आजच्या काळात अगदी त्यांच्यासारखे समर्पित आयुष्य जगणे कोणालाही केवळ अशक्य आहे. त्यांचे जीवन भावी पिढ्यांसाठी सर्वार्थाने मार्गदर्शक आहे. चळवळी आणि आंदोलनंमधून ते फक्त समाजाच्या हिताचे रचनात्मक काम उभारीत गेले. हाताच्या बोटावर मोजता येतील असे अपवाद वगळता त्यांच्या समकाळातत राजकारण करणाऱ्या अन्य राजकारण्यांचे राजकारण आणि 'एनडी' सरांचे राजकारण यामध्ये खूप मोठे अंतर होते. समताधिष्ठित समाजरचनेच्या निर्मितीसाठी त्यांचे राजकारण होते. परिघाबाहेरच्या उपेक्षित वंचितांचा आवाज बनून राहिलेल्या एनडी सरांनी आपल्या राजकारणात सतत सर्वसामान्य – गोरगरीब माणसांच्या प्रश्नांना अग्रक्रमाने प्राधान्य दिले.

महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा गांधी, संत गाडगेबाबा, कार्ल मार्क्स आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा समन्वय त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. कणखर वैचारिक भूमिका हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा होता. आयुष्यभर त्यांनी जे लढे लढवले त्यामध्ये सर्वस्व पणाला लावून ते रस्त्यावर उतरले. संघर्षावेळी समोर किती बलाढ्य शक्ती उभी आहे, याचा विचार त्यांनी कधीही केला नाही. परिणामांची तमा न बाळगता आयुष्यभर व्यवस्थेच्या विरोधात ठामपणे ते लढत राहिले.

सार्वजनिक जीवनात ते कमालीचे पारदर्शी होते. आत एक आणि बाहेर दुसरेच असे त्यांचे व्यक्तिमत्त्व नव्हते. स्वतःच्या विचारांशी ते अत्यंत प्रामाणिक होते. शब्दासाठी कोणतीही किंमत मोजायची त्यांची तयारी असे. सत्तेसाठी कधीही कुठल्याही प्रलोभनाला ते बळी पडले नाहीत. हाती घेतलेल्या प्रत्येक प्रश्नात

सर्वस्व ओतून लढणे हा त्यांचा स्थायिभाव होता. न्यायाची चाड, अन्यायाची चीड , सतत अभ्यास, अविरत चिंतन, निर्भयता आणि नैतिकता ही त्यांच्या लढ्यांची आयुधे होती. त्या बळावर अनेक लढे त्यांनी यशस्वी केले. लोकांशी संवाद हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक महत्त्वाचा विशेष होता. सर्वसामान्य माणसांची दुखणीखुपणी समजून घेऊन ती सोडवण्यात अख्खे आयुष्य त्यांनी खर्ची घातले. शेतमालाच्या किफायतशीर किमतीचा लढा आयुष्यभर अतिशय नेकीने ते लढले. नव्वदच्या दशकात सुरू झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांनी ते कमालीचे अस्वस्थ होते. या प्रश्नाची धार कमी करण्यासाठी सतत ते एकीकडे शासनाशी संघर्ष करीत राहिले आणि दुसरीकडे सतत शेतकऱ्यांशी संवाद करीत आले. संवादाने अनेक प्रश्न सुटतात यावर त्यांचा भर असे. त्यांचे व्यक्तिमत्त्व कमालीचे संवादी होते. महाराष्ट्राच्या पटावर त्यांनी १९७२ चा दुष्काळग्रस्तांचा लढा, शेतमालाच्या किफायतशीर किमतीचा लढा, एन्रॉनसह रायगडचा सेझ लढा, कोल्हापूरचे टोल आंदोलन, आदिवासींच्या वनजमीन हक्काचा लढा, वीजदराचा लढा, सीमा लढा, असे एक ना अनेक लढे संविधानाच्या चौकटीत राहून त्यांनी यशस्वी केले. अपवाद वगळता सतत विरोधी पक्षात राहूनही लोकांच्या मनात त्यांचे स्थान अढळ होते. ते खऱ्या अर्थाने लोकांचे नेते होते.

माणूस किती जगला यापेक्षा तो कसा जगला, यावर त्यांचे मोठेपण अवलंबून असते. 'एनडी' सर मोठेपणाच्या या कसोटीला सर्वार्थाने उतरलेले बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. आचार – विचारांची खूप मोठी शिदोरी मागे सोडून वयाच्या ९३ व्या वर्षी अत्यंत समाधानाने ते मृत्यूला सामोरे गेले. त्र्याण्णव वर्षांच्या एका आयुष्यात संपन्न, समृद्ध आणि सर्वार्थाने आदर्श अशी अनेक आयुष्य ते जगले. उपेक्षितांबद्दल प्रचंड कळवळा असलेला हा लोकनेता आयुष्याच्या अखेरच्या वळणावरही परिघाबाहेरील माणसांच्या कल्याणाच्या विचाराशिवाय अन्य दुसरा कसलाही विचार करीत नव्हता. सामाजिक आघाड्यांवर प्राणपणाने लढणाऱ्या सरांना कौटुंबिक आघाडीवर आदरणीय सरोज पाटील (माई) यांच्यासह त्यांच्या संपूर्ण कुटुंबाने समर्थ साथ दिली. सर जेव्हा समाजाच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर लढत होते, तेव्हा एखाद्या रणरागिणीसारख्या माई कौटुंबिक आघाडीवर एकाकी लढत होत्या. संघर्षाच्या या काळात समर्थपणे त्या सरांच्या पाठीशी उभा राहिल्या. त्यांच्या त्यागाला आमचा सलाम.

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामात सर सतत आघाडीवर होते. आपल्या व्यस्त वेळापत्रकातून आवर्जून वेळ काढून शेकडो किलोमीटरचा प्रवास करून समितीच्या महत्त्वाच्या उपक्रमांना ते उपस्थित राहायचे. महा.अंनिसच्या रस्त्यावरच्या लढाईत तर एखाद्या सेनापतीप्रमाणे ते अग्रभागी असायचे. मग ते महा.अंनिसचे एखादे शिबिर असो, शनिशिंगणापूरचा लढा असो वा जादूटोणाविरोधी कायद्यासाठीचा संघर्ष असो. त्यांच्या नुसत्या उपस्थितीने आम्हा कार्यकर्त्यांना मोठे बळ यायचे. त्यांच्या दृष्टीने जेवढे महत्त्व शेतीप्रश्नांना होते, तेवढेच महत्त्व अंधश्रद्धा निर्मूलनाच्या प्रश्नाला होते. इतर अनेक चळवळींमध्ये ते नेतृत्वस्थानी असायचे आणि अंधश्रद्धा निर्मूलनाच्या प्रश्नावेळी मात्र वयाने कितीतरी लहान असलेल्या डॉ. नरेंद्र दाभोलकरांना ते आपला नेता मानायचे. हे त्यांच्या मनाचे मोठेपण आणि वेगळेपण होते.

महाराष्ट्रभरातल्या लहान मोठ्या सर्वच डाव्या पुरोगामी चळवळींना एकमुखी आणि सक्षम नेतृत्व देण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये होते. छोट्या–मोठ्या पुरोगामी चळवळींचे ते एकमेव आधारवड होते. त्यांच्या जाण्याने पुरोगामी चळवळींची अपरिमित हानी झाली आहे. सत्यासाठी आयुष्यभर अविरत संघर्ष करणारा सत्याग्रही आपण गमावला आहे. त्यांचे विचार आणि कार्य उद्याच्या अनेक पिढ्यांना दीपस्तंभासारखा प्रकाश दाखवत राहातील. संघर्षांची प्रेरणा देत राहातील. त्यामुळे ते जतन करणे, तेवढ्याच ताकदीने त्यांचे काम पुढे नेणे एवढेच आजमितीला आपल्या हाती आहे आणि आपण सर्वांनी ते प्रामाणिकपणे केले पाहिजे आणि हेच त्यांना खरे अभिवादन असेल.

– संपादक मंडळ

# सत्यशोधकी चैतन्य प्रवाह : एन.डी. सर

शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर

"एन. डी. सरांचा सर्वांत अनुकरणीय गुण म्हणजे त्यांचे 'बोले तैसा चाले' हे आचरण. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीसाठी अशा खंबीर नेत्याच्या आचरणाचीच गरज असते. राजकारणात प्रदीर्घ काळ वावरणाऱ्या व्यक्तीला असे परखड मतप्रदर्शन व कणखर आचरण परवडणारे नसते. सरांचे याबाबतचे वागणे आदर्श आहे. सत्यनारायणाला त्यांनी आयुष्यात कधी हात जोडले नाहीत. त्यामुळे 'विज्ञानाचा पदवीधर सत्यनारायण घालत असेल व मी कुलगुरू झालो, तर त्याची विज्ञानाची पदवी आपोआप रद्द करण्याचा आग्रह धरेन', असे ते नेहमी सांगत असतात. कोल्हापूर शहराचा लोकप्रतिनिधी म्हणून आमदारकीची निवडणूक जिंकल्यानंतर होळीला नारळ देण्याचे आणि अंबाबाईचे दर्शन घेण्याचे नाकारले, असे नेतृत्व विरळेच."

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक स्पंदनासोबत संपर्क असल्याने एन. डी. पाटील हे नाव मला अपरिचित नव्हते. सातारा जिल्ह्यात राखीव जागांचे समर्थन करणाऱ्या समितीत काम करताना वकिलांच्या बैठकीसमोर आणि नंतर गांधी मैदानावरील जाहीर सभेत राखीव जागांच्या बाजूने वेगवेगळ्या प्रकारचे तर्कशुद्ध, प्रभावी युक्तिवाद पोटतिडकीने करताना मी एन. डीं. ना पाहिले होते; परंतु अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संदर्भात त्यांचा संपर्क आला तो काहीसा अनपेक्षितपणे. झाले ते असे की, आम्ही १९९० साली पुण्यामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन जाहीरनामा परिषद घेतली. त्या परिषदेत शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन याबाबत एक महाराष्ट्रव्यापी चर्चासत्र घेण्याचा निर्णय झाला. यासाठी सहकार्य मागण्यासाठी मी रयत शिक्षण संस्थेचे त्यावेळचे सचिव सुभाषचंद्र भोसले यांना भेटावयास गेलो होतो. एन.डी. सर त्यावेळी चेअरमन नव्हते. परंतु माझ्या या भेटीच्यावेळी योगायोगाने तेथे ते होते. अंधश्रद्धा निर्मूलन जाहीरनाम्याची एक पुस्तिका आम्ही काढली होती आणि त्याच्या मुखपृष्ठावर रस्ता ओलांडणारे मांजर दाखवले होते. ही पुस्तिका पाहून एन. डी. म्हणाले, ''दाभोलकर, तुम्हाला माहीत आहे का? मांजर आडवे गेले की, फक्त माणूसच असे म्हणत नाही की, आता काम होणार नाही, तर मांजरही मनातल्या मनात म्हणते, 'अरे बापरे, माणूस आडवा गेला, आता आज काही उंदीर मिळणार नाही आणि उपवास घडणार.' या प्रतिपादनावर सारेचजण खळाळून हसले. मग बराचवेळ अंधश्रद्धा निर्मूलनाचा विषय चर्चेत राहिला. त्याचवेळी मला जाणवले की, सरांचे चळवळीशी नाते जुळले, तर बहार येईल. १९९१साली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पूर्ण कार्यकारिणीची निर्मिती प्रथमच झाली. स्थायी स्वरूप लाभले. त्यावेळी सर्व कार्यकर्त्यांनी अध्यक्षपदासाठी एकमुखाने एन. डी. सरांचे नाव सुचवले. आधीच असंख्य जबाबदाऱ्या खांद्यावर असतानाही चळवळीच्या प्रेमापोटी त्यांनी होकार दिला. त्यानंतर आता गेली १३ वर्षे ते महाराष्ट्र अंनिसचे अध्यक्ष आहेत. प्रत्येक तीन वर्षांनी राज्य कार्यकारिणी एकमताने त्यांचीच फेरनिवड करते. दुसरे नावदेखील चर्चेला येत नाही. एन. डी. ही संघटनेच्या प्रेमापोटी होकार देतात.

एन. डी. समितीचे अध्यक्ष झाल्यानंतर सुरुवातीचा एक भाग म्हणून सातारा शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयातील इच्छुक प्राध्यापकांचे आम्ही अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रशिक्षण शिबिर घेतले. सर्व शिबिरार्थी सातारा शहरातीलच असल्याने रोज संध्याकाळी एक ते दीड तास व्याख्यान व अर्धा तास प्रश्नोत्तरे असा पंधरा दिवसांचा कार्यक्रम होता. उद्घाटनाचे पहिले भाषण अर्थातच, एन. डी. सरांचे झाले. या विषयावरील त्यांची मांडणी तोपर्यंत मी कधी ऐकलेली नव्हती. त्यावेळी माझ्या हे लक्षात आले की, मार्क्सवादाचे अध्ययन आणि महाराष्ट्रातील सत्यशोधकी विचारांची व चळवळीची सखोल जाणीव यामुळे एन. डी. सरांच्या अंधश्रद्धा निर्मूलन विषयावरील मांडणीला स्वाभाविकच एक औरस-चौरस भरभक्कम व्यापकत्व प्राप्त होते. 'माणूस हा त्याच्या बुद्धीने श्रेष्ठ ठरला; परंतु उत्क्रांतीमध्ये त्याला लाभलेली विकसित बुद्धी ही काही देवाची कृपा नाही. माणसाने पहिल्यांदा स्वतःच्या दहा बोटांचा हत्यारासारखा वापर करायला सुरुवात केली. उत्क्रांतीच्या या टप्प्यावर हाताची बोटे सुट्टी झाल्याने आणि अंगठा अधिक प्रमाणात वळवता येऊ लागल्याने त्याला हे शक्य झाले. यानंतर त्याने दगडाचा वापर हत्यार म्हणून करावयास सुरुवात केली. पुढे त्या

दगडाला धार लावून अणकुचीदार केले. नंतर धार लावलेल्या दगडाला झाडाची फांदी तोडून जोडली आणि ओबडधोबड कुऱ्हाड तयार केली. यानंतर धातूंचे शोध लागले आणि हत्यारे विकसित होत गेली. विकसित हत्यारांच्या आधारे आजूबाजूच्या निसर्गावर विविध स्वरूपाच्या प्रक्रिया म्हणून घडवलेला माणूस सर्वश्रेष्ठ ठरला.' एन. डी. सरांच्या मांडणीतील हा एक भाग. मला जाणवलेली दुसरी गोष्ट अशी की, युरोपमधल्या प्रबोधनाच्या कालखंडाचा त्यांचा दांडगा अभ्यास आहे आणि मुक्तीचे पास विकणाऱ्या पोपसारख्यांच्या ढोंगीपणाबद्दल संतापही आहे. महाराष्ट्रातील सत्यशोधकी समाजसुधारकांची परंपरा हा तर त्यांच्या केवळ अभ्यासाचाच नव्हे; तर जिव्हाळ्याचा विषय आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदेंसारख्या उपेक्षा पदरी आलेल्या समाजसुधारकांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल त्यांना अपार आदर आहे. (त्यासाठी त्यांनी रयत शिक्षण संस्थेत स्वतंत्र न्यासाची निर्मितीही केली आहे.) एन. डी. सरांच्या प्रभावाने चालू झालेले हे शिबिर उत्तम संपन्न झाले. त्यानंतर आम्ही असे ठरवले की, ज्या वेगवेगळ्या जिल्ह्यांत संस्थेच्या कामासाठी एन. डी. सर फिरतात, तेथे त्या जिल्ह्यातील शिक्षक-प्राध्यापकांशी खुला संवाद साधायचा. कोल्हापूर, पुणे अशा काही जिल्ह्यांत असे प्राध्यापक-शिक्षक यांचे मेळावे झाले; परंतु मला असे लक्षात आले की, दोन-तीन तासांच्या अपुऱ्या वेळेत शिक्षक-प्राध्यापकांच्या डोक्यांतील सर्व गोंधळ नष्ट तर होत नाहीच, उलट काही वेळेला वाढतो, काही प्रसंगी अकारण विरोधी मानसही तयार होतो. देव, धर्म, पूजापाठ, कर्मकांडे याबद्दल राजकारणात राहूनही सर रोखठोक भूमिका घेतात; परंतु समोर असलेल्या बहुतेक प्राध्यापक, शिक्षकांना तो विचार झेपत नाही. मग आचार तर दूरच राहिला. यामुळे अशा बैठकांतून कामाला कृतिशील कार्यकर्ते मिळतील, हे साध्य होऊ शकले नाही. यानंतर आम्ही 'सत्यशोधक प्रज्ञा प्रकल्प' सुरू केला. अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक दृष्टिकोन, सत्यशोधकी जाणिवा यांचा एक छोटा; पण आखीव-रेखीव अभ्यासक्रम चालू केला. प्राथमिक, माध्यमिक शिक्षक; तसेच प्राध्यापक यांच्यासाठी अभ्यासक्रमाचा स्तर थोडा वेगवेगळा ठेवला. या घटकांची दोन अथवा तीन दिवसांची अंधश्रद्धा निर्मूलन प्रशिक्षण शिबिरे घेण्यास सुरुवात केली. या शिक्षक/प्राध्यापकांनी आपल्या विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम शिकवावा आणि नंतर त्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन त्यांना प्रमाणपत्र द्यावे, असे या प्रकल्पाचे स्वरूप आहे. महाराष्ट्रात हा उपक्रम खूप लोकप्रिय झाला. गेल्या दहा वर्षांत सुमारे सोळा-सतरा हजार शिक्षकांची शिबिरे झाली आणि तीन ते चार लाख विद्यार्थी परीक्षांना बसले. अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार आज महाराष्ट्रात काही प्रमाणात सर्वदूर पोहोचल्याचे जाणवते. याचे महत्त्वाचे कारण सत्यशोधक प्रज्ञा प्रकल्प हे आहे. याची सुरुवात झाली एन. डी. सरांनी 'रयत'च्या शिक्षक-प्रध्यापकांच्या घेतलेल्या शिबिरापासून.

अंधश्रद्धा निर्मूलनाचे मुख्य कार्य आहे शोषण करणाऱ्या, फसवणूक, दिशाभूल करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करणे. चमत्कार, बुवाबाजीचे शोषणाचे प्रकार, भानामतीच्या गूढ घटना, करणीची दहशत, चेटूक, मूठ मारणे अशा स्वरूपाच्या अंधश्रद्धांच्या असंख्य घटना आजूबाजूला घडत असतात व अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा कार्यकर्ता कोणत्याही कायद्याच्या मदतीशिवाय त्याविरोधी झुंजत असतो. या लढ्यात सहभागी होणे एन. डी. सरांना शक्य नव्हते व मुळात तशी अपेक्षाही नव्हती. अपेक्षा होती ती ही की, या स्वरूपाच्या उघड-उघड शोषण करणाऱ्या अंधश्रद्धांच्या विरोधात एका स्वतंत्र कायद्याची निर्मिती शासनाने करावी याची. इ.स.२००० साली महाराष्ट्रात सत्तारूढ झालेल्या लोकशाही आघाडी सरकारने किमान समान कार्यक्रमासाठी एन. डी. सरांच्या अध्यक्षतेखालीच एक समिति नेमली. या समान किमान कार्यक्रमात एन. डी. सरांनी आवर्जून अंधश्रद्धा निर्मूलन कायदा करण्याच्या कलमाचा समावेश केला. अर्थात, शासन अशा गोष्टींना भीक घालणारे नाही, हे या अध्यक्षांनाच माहीत होते. यामुळे एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वाखालीच हा लढा आम्ही लढलो. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन चालू असताना एक महाराष्ट्रव्यापी धरणे आझाद मैदानावर धरले होते; परंतु सरकारच्या लेखी अशा गोष्टींची किंमत ती किती असणार? यामुळे विधिमंडळात जाऊनच मंत्र्यांना हलवण्याची गरज होती. हे जमू शकले ते केवळ एन. डी. सरांच्यामुळे. एका बाजूला संसदीय कामकाजमंत्री, गृहमंत्री, सभापती, मुख्यमंत्री यांना आम्ही भेटलो, तर दुसरीकडे सभागृहात या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी विधानसभा व विधानपरिषदेत एक सक्षम फळी सरांनी तयार केली. त्यामुळेच भारतात प्रथमच अंधश्रद्धा निर्मूलनासाठी स्वतंत्र कायद्याची निर्मिती झाली. याबाबत शासन आपल्या दिलेल्या शब्दाला जागले नाही. कायद्याचा हा मसुदा अवलोकनासाठी दिल्लीच्या गृहखात्याकडे पाठवणे आवश्यक होते. एका महिन्यात हे करून हिवाळी अधिवेशनात हा कायदा मंजूर करण्याचे आश्वासन एन. डी. पाटील यांना व मला अतिशय स्पष्ट शब्दांत त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी दिले होते. प्रत्यक्षात नऊ महिने कायद्याचा मसुदा दिल्लीला पाठविला देखील गेला नाही. मग तो दिल्लीहून येऊन विधिमंडळासमोर मांडणे दूरच राहिले, याबद्दल देखील सरांनी सरकारला धारेवर धरले. खास माणूस पाठवून दिल्लीला हा मसुदा पोचवावा. मा. शिवाजीराव पाटील-चाकूरकर यांच्याशी मी व्यक्तिगत बोलून लवकरात लवकर तो तेथून परत येईल, हे पाहातो आणि राज्यपालांनी वटहुकूम काढून असा प्रस्ताव हा लेख लिहीत असताना एनडींनी राज्य शासनासमोर ठेवला आहे.

विधायक कृतिशील धर्मचिकित्सा हे समितीचे आणखी एक महत्त्वाचे काम आहे. रूढी, कर्मकांडे, परंपरा यामुळे माणसाच्या प्रतिष्ठेचे जे अवमूल्यन होते, त्याला विरोध करणे महाराष्ट्र जवळजवळ विसरत चालला आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समिती हे आवश्यक; पण अप्रिय काम मोठ्या चिकाटीने व सातत्याने करत असते आणि एन. डी. त्याला ताकदीने पाठिंबा देत असतात. उच्च मराठा कुळीतील आमच्या एका कार्यकर्त्याने चळवळीच्या विचाराच्या प्रभावाने मराठा समाजात आजही निषिद्ध मानलेला विधवा विवाह; तोही अपत्य असणाऱ्या विधवेशी आवर्जून केला. या कार्यकर्त्यांचा सत्कार एन. डीं.नी 'रयत'मध्ये घडवून आणला आणि त्याप्रसंगी एकोणिसाव्या शतकात जी प्रथा संपूर्ण जावयास पाहिजे होती, तिच्याविरोधी कृती केल्याबद्दल विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात सत्कार करावा लागतो, याबद्दल खंत व्यक्त केली होती. शनिशिंगणापूर, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथे शनिदेवाच्या चौथऱ्यावर महिलांना प्रवेश नाही, या विरोधात समितीने सत्याग्रह जाहीर केला. बायकांना शनिदेवाकडे घेऊन जाणारा म्हणजेच परिवर्तनाच्या चळवळीची पिछेहाट करणारा असा हा कार्यक्रम आहे, असे टीकाकारांचे मत होते. समितीची भूमिका अशी होती की, हा प्रश्न प्रामुख्याने समतेचा आहे. ज्या ठिकाणी पुरुषांना प्रवेश आहे, त्या ठिकाणी धर्म आणि रूढीच्या नावाने बाईला प्रवेश नाकारणे हे विषमतावादी आहे. पुरुष जाऊ शकतात, त्या शनिदेवाच्या चौथऱ्यावर जावयाचे की नाही, हा सर्वस्वी त्या बाईच्या इच्छेचा प्रश्न आहे आणि ती दूर व्हावयासच हवी. एन. डीं. च्या या भूमिकेला पाठिंबा होता. सातत्याने पाच वर्षे प्रबोधन मोहीम चालविल्यानंतर समितीने महाराष्ट्रव्यापी सत्याग्रह नगर येथे केला. त्याआधी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मी आणि माझे सहकारी उपोषणाला बसलो होतो. त्याप्रसंगी एन.डी. पूर्णवेळ आमच्यासमवेत होते. जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीसप्रमुख यांच्याशी सतत चर्चा चालू होती. उपोषण ठरल्यावेळेआधी बारा तास बंद करावे, असा मोठा दबाव कलेक्टरांनी आणला नाही, तर ताबडतोब अटक करण्याचा इशाराही दिला. या चर्चेला मी, डॉ. लागू, एन. डी. पाटील उपस्थित होतो. विचार करण्यासाठी पंधरा मिनिटांचा वेळ मी मागितला. शेजारच्या खोलीत गेलो. माझा विचार साधा-सरळ होता. तो असा की, 'उपोषण थांबविण्याचा काहीएक अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना नाही. त्यामुळे त्यांना सांगावयाचे खुशाल अटक करा. लढाऊ असलेले एन. डी. पाटील सर हाच निर्णय घेतील, असे मला वाटत होते; पण माझा अंदाज चुकला. एन. डीं. नी माझ्यापेक्षा कितीतरी जास्त उन्हाळे-पावसाळे चळवळीत अनुभवलेले होते. त्यांनी असे सांगितले की, कलेक्टर अगदी चिडीलाच आल्याचे मला दिसते. तो आपल्याला नक्कीच अटक करेल; परंतु त्यामुळे आपला मूळ उद्देशच असफल होण्याचा धोका आहे. तो उद्देश आहे, उद्या शनिशिंगणापूर सत्याग्रह करण्याचा. आज अटक झाल्यानंतर लढा शासकीय हस्तक्षेपाने मध्येच खंडित झाला, असे एका बाजूला होईल. दुसरीकडे, आपले महाराष्ट्रातील सर्व कार्यकर्ते आज निघून उद्या नगरला पोहोचणार आहेत. शासनाने आडमुठी भूमिका घेऊन त्यांना जिल्हाबंदी केली, तर सर्वत्र सत्याग्रह कोसळेल. त्यापेक्षा आपण जिल्हाधिकारी यांच्या विनंतीला मान देऊन उपोषण थांबवूया. आतापर्यंत त्यांनी याबाबत दिलेले सहकार्य उद्यापर्यंत चालू राहाण्याची शक्यता त्यामुळे वाढेल. एन. डीं. चा हा निर्णय अचूक होता, हे पुढे घडलेल्या घटनांनी सिद्ध केले. दुसऱ्या दिवशीचा सत्याग्रह अतिशय शिस्तबद्धपणे पार पडला. पहिल्या तुकडीत एन. डी., डॉ. श्रीराम लागू, डॉ. बाबा आढाव, व्यंकटअण्णा रणधीर आदी मान्यवर होते. दोन दिवस नगरच्या जेलमध्ये होतो. सर्वजण एकाच बराकीत होतो. मला गार पाण्याच्या आंघोळीची सवय आहे. सकाळी उठून बराकीसमोर असलेल्या हौदावर आंघोळीसाठी गेलो, तर माझ्या बाजूला एन. डी. सर हजरच होते. आंघोळ झाल्यावर त्यांनी 'सराईतपणे' स्वत:चे कपडे धुतले. 'सराईतपणे' हा शब्द यासाठी की, आयुष्यभर स्वत:चे कपडे स्वत: धुण्याचे व्रत ते कोणताही गाजावाजा न करता अत्यंत सहजपणे सांभाळत आले आहेत.

महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्राची 'वैज्ञानिक जाणिवा कृती परिषद' आमच्या समितीने घेतली. त्यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापकांत 'विवेकवाहिनी' निर्माण करण्याचा निर्णय झाला. या संघटनेसाठी मी महाराष्ट्रभर महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या बैठका घेत फिरलो. आपल्या अत्यंत व्यस्त कार्यक्रमातही एन. डी. पाटील सरांनी 'विवेकवाहिनी'साठी भरपूर वेळ दिला. मुंबईत ज्या दिवशी 'विवेकवाहिनी'साठी प्राध्यापकांची बैठक झाली, त्यावेळी प्रचंड पाऊस पडत होता. अवघे पाच प्राध्यापक आले होते. तरीही तेवढ्यांच्यासमोर सर नेहमीच्याच तळमळीने बोलले. तयारी करून पुन्हा आणखी एक बैठक घेतली. त्याही बैठकीला पाच-सहा कॉलेजचेच प्राध्यापक आले. त्यावेळी अर्थातच, हे स्पष्ट झाले की, प्राध्यापक न येण्याचे कारण पाऊस नाही, तर अनास्था आहे. याही बैठकीला एन. डी. होतेच आणि इतक्या कमी संख्येबद्दल कोणतीही तक्रार न करता नाउमेद न होता त्यांनी नेहमीच्याच पोटतिडकीने 'विवेकवाहिनी'ची गरज पटवली. विवेकवाहिनी व विवेकाधिष्ठित विचार व आचाराच्या आधारे आपला विकास आपल्या हाती या सूत्राने काम करणारी संघटना आहे. या विचाराला एन. डीं. ना एक चांगला मुद्दा पुरवला. ते विद्यार्थ्यांना सांगत, आज महाराष्ट्रात अठरा ते तेवीस या कॉलेज वयोगटात जाण्यायोग्य वयाचे जे विद्यार्थी आहेत, त्यापैकी फक्त

सहा टक्के विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण मिळते. या अर्थाने तुम्ही अत्यंत भाग्यवान आहात. कारण उद्याच्या समाजातील शास्त्रज्ञ, कलेक्टर, न्यायाधीश, लष्करी अधिकारी, डॉक्टर्स, इंजिनिअर हे फक्त तुमच्यातूनच तयार होणार आहेत. मात्र तुमच्याच वयोगटातील फार मोठ्या समुदायाला हे भाग्य लाभलेले नाही, तुम्ही याची जाणीव ठेवावयास हवी.

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ ही व्यापक समाजपरिवर्तनाशी आपली बांधिलकी मानते. समाजात व्यापक परिवर्तन होऊन शोषणरहित समताधिष्ठित समाजाची निर्मिती झाल्याशिवाय अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा यशस्वी होणार नाही, याचे पक्के भान समिती बाळगून आहे. या दृष्टीने एन. डी. चे मार्गदर्शन हे अत्यंत मोलाचे ठरते. महाराष्ट्रातील व्यापक जनलढ्यांचे एन. डी. आज अग्रेसर असलेले सर्वमान्य नेते आहेत. प्राथमिक शिक्षणाची परवड स्पष्ट करणारी 'हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?' ही मोहीम मोठ्या निर्धाराने त्यांनी चालवली. प्रकाश देण्याच्या नावाने महाराष्ट्रात कर्जबाजाराच्या अंधारात लोटणाऱ्या 'एन्रॉन'चा जमिनीत गाडला गेलेला लढा मोठ्या हिमतीने व हिकमतीने पुन्हा उभा केला. शेतजमिनीचा प्रश्न असो वा धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा; एन. डी. चे नेतृत्व सर्वांना हवे असते. कारण ते अभ्यासू व ठाम असते. हे सारे प्रश्न अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या दैनंदिन चळवळीच्या कार्यकक्षेबाहेरचे आहेत; परंतु समितीचे अध्यक्षच व्यापक लढ्याचे धुरिणत्व करत असल्याने स्वाभाविकच चळवळीतील कार्यकर्त्यांनाही आपण आपल्या कार्याच्या परिघाबाहेर व्यापक लढ्याशी जोडलेले राहावे, अशी प्रेरणा मिळते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अध्यक्षांनी समितीच्या दैनंदिन कामासाठी वेळ द्यावा, अशी अपेक्षा नाही व तशी सवडही एन. डीं.ना असणे अशक्यच; परंतु चळवळीला ज्या-ज्या वेळी गरज असते, त्या-त्या वेळेला अग्रहक्काने सर कार्यकर्त्यांच्या अडचणीला धावून येतात. चळवळीतील दोन कार्यकर्त्यांना मुंबईच्या पोलिसांनी एकदा रात्री केवळ सूडापोटी अटक केली. मध्यरात्री एन. डीं.नी पोलीस आयुक्तांना त्याबाबत फोन केला; एवढेच नव्हे, तर स्वत:च्या हस्ताक्षरांत गृहमंत्र्यांना खडसावणारे पत्रही लिहिले. नरेंद्र महाराजांच्या भक्तांनी समितीच्या दोन कार्यकर्त्यांचे अपहरण करून मारहाण केली. तेव्हा ताबडतोब दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदेंची भेट घेऊन एन. डीं.नी कडक कारवाईची मागणी केली.

या साऱ्यांबरोबरच सरांचा सर्वांत अनुकरणीय गुण म्हणजे त्यांचे 'बोले तैसा चाले' हे आचरण. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीसाठी अशा खंबीर नेत्याच्या आचरणाचीच गरज असते. राजकारणात प्रदीर्घ काळ वावरणाऱ्या व्यक्तीला असे परखड मतप्रदर्शन व कणखर आचरण परवडणारे नसते. सरांचे याबाबतचे वागणे आदर्श आहे. सत्यनारायणाला त्यांनी आयुष्यात कधी हात जोडले नाहीत. त्यामुळे 'विज्ञानाचा पदवीधर सत्यनारायण घालत असेल व मी कुलगुरू झालो, तर त्याची विज्ञानाची पदवी आपोआप रद्द करण्याचा आग्रह धरेन', असे ते नेहमी सांगत असतात. कोल्हापूर शहराचा लोकप्रतिनिधी म्हणून आमदारकीची निवडणूक जिंकल्यानंतर होळीला नारळ देण्याचे आणि अंबाबाईचे दर्शन घेण्याचे नाकारले, असे नेतृत्व विरळेच. फारच आग्रह झाल्यावर पाहिजे तर माझा राजीनामा घ्या; परंतु माझ्या सत्यशोधकी गुरूने जे चूक आहे, असे मला शिकविले, त्यांच्याविरोधी आचरण कधीच करणार नाही. असा तेजस्वी निर्धार असणारे नेते आता कुठे आढळतात? याचाच दुसरा पैलू म्हणजे राजकारणात असूनही सत्तेबद्दलची त्यांची निरिच्छ वृत्ती. काँग्रेसच्या राजवटीत त्यांना प्राथमिक शिक्षणावरील समितीचे अध्यक्षपद देऊ केले होते. त्याचा दर्जा कॅबिनेट मंत्रिपदाचा होता. मात्र ते त्यांनी नाकारले. अगदी अलीकडेच अंधश्रद्धा निर्मूलनासाठीच्या शासकीय समितीचे अध्यक्षपद त्यांना लाभले. तेही मंत्रिपदाच्या दर्जाचे होते. हे अध्यक्षपद स्वीकारण्याची त्यांची पूर्वअटच होती, मंत्रिपदाला नकार देण्याची. सत्यशोधकी विचार, उच्चार व आचार यांचा असा खळाळता प्रवाह महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला लाभावा, ही आमची फार मोठी उपलब्धी आहे, दिलासा व उमेद देणारी गोष्ट आहे.

– डॉ. नरेंद्र दाभोलकर

(वरील लेख प्रा. एन. डी. पाटील 'व्यक्तित्व आणि कर्तृत्व' (संपादक-किशोर बेडकिहाळ/प्रा. सी. व्ही. पाटील) या पुस्तकातून पुनर्मुद्रित केला आहे.)

●

# पुढच्या पिढ्यांनी सोबत घ्यावा असा ‘एनडीस्तंभ!’

यशवंत मनोहर

“

”

‘एनडीस्तंभ’ म्हणजे उपकारक मूल्यांचा दीपस्तंभ! समाजाच्या माणूसमयतेची विश्वासू प्रयोगशाळा म्हणजे एनडीस्तंभ! अशा दीपस्तंभाची समाजाला नेहमीच गरज असते; परंतु अंधार जेव्हा अधिकाधिक गडद होत जातो तेव्हा तर अशा दीपस्तंभाची गरज अधिकच अनिवार्य होत जाते. आज असंख्य पातळ्यांवर आणि असंख्य पद्धतींनी अंधाराची सत्ता गडद केली जात आहे. अशा परिस्थितीत आजउद्याच्या सर्वच पिढ्यांना आपले दीपस्तंभ निश्चित करण्याची गरज आहे. पुढल्या हिटलरकाळोखाने आपल्याला गिळू नये असे वाटणाऱ्या तरुणतरुणींनी आपल्या डोक्यात घ्यावा असा एक निरामय दीपस्तंभ आहे आणि या दीपस्तंभालाच मी एनडीस्तंभ म्हणतो.

**एक :**

एन.डी. पाटील हे सर्वावधानी विचारवंत आणि आंदोलक होते. एक अखंड आंदोलन हेच शीर्षक त्यांच्या आयुष्याचे अन्वर्थक शीर्षक ठरेल इतके त्यांचे आयुष्य आंदोलनमय झाले होते. विद्यमान पिढ्यांनीही आणि येणाऱ्या पिढ्यांनीही हे एनडीपण त्यासाठीच समजावून घ्यायला हवे. एनडींच्या बौद्धिक आणि आंदोलनव्याप्त जीवनात दोन प्रकारची सर्वसमावेशकता मला दिसते. मार्क्स-फुले-शाहू आणि आंबेडकर अशी सममूल्यतेच्या दिशेने जाणारी वैचारिक सर्वसमावेशकता आहे. विषमतेची, शोषणाची आणि अंधश्रद्धांची व्यवस्था नाकारणारी ही वैचारिक सर्वसमावेशकता चैतन्यवादाला आणि त्यावर अधिष्ठित समाजव्यवस्थेला उद्ध्वस्त करणारीच सर्वसमावेशकता आहे. ही पूर्ण विज्ञाननिष्ठ आणि सममूल्यवादी भूमिका एकूण जगातील इहवादी आणि समन्यायी वैचारिक कुटुंबाचीच भूमिका आहे. यातून एनडींचे महाराष्ट्रातील, भारतातील आणि जगातीलही मूल्यसंघर्षाचे भान व्यक्त होते. म्हणजे विश्वातील सर्व व्यवस्थांतरवादी विचारांची एकजूट यातून सूचित होते आणि ती अत्यंत मोलाचीही आहे आणि आवश्यकही आहे.

दुसरी सर्वसमावेशकता मला दिसते ती सकल वंचितांच्या संदर्भातली! शेतकरी, मजूर, मुस्लीम, दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, ओबीसी, बौद्ध आणि स्त्रिया या सर्वांच्या परिवर्तनाच्या चळवळींशी एनडींचे कौटुंबिक संबंध होते. या सर्वच संघटनांची वर्गीय एकमयता एनडींना अभिप्रेत होती. क्रांतिसाठी ही सर्वव्यापक एकजूट त्यांना आवश्यक वाटत होती. या दोन्ही प्रकारच्या शहाण्या सर्वसमावेशकतांमुळे परिवर्तनाच्या चळवळींमधील सर्वच कार्यकर्त्यांना एनडींबद्दल आदर वाटत असे.

**दोन :**

असे विचारवंत आंदोलक फार कमी असतात. प्रा.गं.बा. सरदार, भाई वैद्य, गोविंद पानसरे, नरेंद्र दाभोलकर अशी नावे माझ्या डोळ्यांपुढे येतात. ही नावे सर्वसमावेशकतावादीच होती आणि एनडींचा अंतर्भाव या मालिकेत अत्यंत सन्मानाने करणे मला आवश्यक वाटते. मी त्यांना ‘एनडीस्तंभ’ म्हणतो त्याचे हे कारण आहे. हे लोक डी-क्लास, डी-कास्ट, आणि डी-रिलिजन झालेले असतात. विषमतेच्या परंपरेने त्यांना चिकटवलेल्या उपाध्या त्यांनी गाडूनच टाकलेल्या असतात.

एनडीस्तंभाचा आदर म्हणजे त्यांच्या या निरामय मानवी इसेन्सचाच आदर असतो, ही बाब आपण सर्वांनीच लक्षात घ्यायला हवी. पुढच्या पिढ्यांच्या अंधाऱ्या वाटेवर उजेड म्हणून मांडता येतील अशी माणसे कमीच असतात. एनडी या अल्पसंख्याकांमधले एक आदरणीय नाव आहे.

**तीन :**

आंदोलनालाच आपले जीवन मानणारे कृतीवीर कमीच असतात. त्यातीलही काही थोडेच गंभीर वैचारिक लेखन करीत असतात. एनडी गंभीर लेखन करणारे, विचारवंत आंदोलक आहेत. त्यांनी परिवर्तनाच्या चळवळींना गतिमान करणारी दहा-बारा पुस्तके लिहिली आहेत. सतत प्रवासात, सतत गर्दीत आणि सतत सभांमध्ये वावरणारे एनडी वाचन लेखन कधी करत असतील? त्यासाठी अशा नेत्याला मग अधिकचे कष्ट करावे लागतात. लेखन अशा कष्टांच्यापोटी जन्माला येते. एनडींचे लेखन या प्रक्रियेतूनच जन्माला आलेले आहे.

एनडी डावी भूमिका म्हणजे सर्वहिताय भौतिक भूमिकाच मांडत जगले. पण ते पोथीवादी कधी झाले नाहीत. बदलत्या परिस्थितीत मुक्त मनाने त्यांनी नवी उत्तरे शोधली. शब्दप्रामाण्यवादी डाव्यांप्रमाणे ते केवळच आर्थिक लढ्याच्या मर्यादेत अडकले नाहीत. या समाजातील प्रश्नांचे भीषण वास्तव केवळ आर्थिक विषमतेत मावत नाही, याची त्यांना नीट कल्पना होती. जातिअंत वा स्त्री-पुरुष विषमतेचा अंत केल्याशिवाय आपल्याकडे वर्गीय वास्तवाची, वर्गलढ्याची आणि पायाभूत वर्गातीत व्यवस्थेची कल्पनाही करता येत नाही. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ते संस्थापक अध्यक्ष का होते हे नीट समजावून घ्यावे लागते. अंधश्रद्धातीत होणे म्हणजे पूर्ण विज्ञाननिष्ठ होणेच असते. ही विज्ञाननिष्ठा धर्मातीतच असते. ते साताऱ्याच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमीचे अध्यक्ष होते. घरची सर्वांना खुली असलेली विहीर अस्पृश्यांना खुली केल्याशिवाय मी घरात पाऊल ठेवणार नाही असे म्हणणारे एनडी, विज्ञानाचे प्राध्यापक सत्यनारायण करीत असतील तर, मी कुलगुरू झाल्यावर त्यांच्या पदव्या परत करायला लावीन असे म्हणणारे एनडी त्यामुळेच नव्या पिढ्यांनी अभ्यासायला आणि डोक्यात घ्यायला हवेत.

**चार :**

एनडींकडून आपण काय शिकायचे ते येत्या पिढ्यांनी ठरवायला हवे. जातींच्या आणि धर्मांध शक्तींच्या विरुद्ध त्यांचा लढा होता. एनडी पूर्ण संविधाननिष्ठ जीवन जगत होते. त्यांच्या जगण्यात आणि बोलण्यात पूर्ण एकवाक्यता होती. सर्व लोकजीवनाला जाती-धर्मातीत असे संविधानसूत्र द्यावे यासाठी ते धडपडत होते. भारताच्या सत्ताव्यवस्थेवर सर्वांचाच समान हक्क आहे. पण लोकशाहीचा दुरुपयोग करणाऱ्या पैसापिसाट नवसरंजामदारांनी, नव धर्मांधांनी आणि वर्चस्ववाद्यांनी बहुजनांना सत्तेबाहेरच फेकले. त्यासाठी त्यांनी धर्माचा गैरवापर केला. एनडींना या सर्व सत्तावंचितांची एकजूट व्हावी, असे वाटत होते. यासाठी त्यांनी आपली संपूर्ण बुद्धिशक्ती पणाला लावली. एक अपवादभूत निःस्पृहता त्यांच्यात होती. आपल्या हातून कोणाचे अनुचित होऊ नये, आपल्या हातून संविधानमूल्यांचा कुठल्याही पातळीवर अवमान होऊ नये याची त्यांनी डोळ्यात तेल घालून काळजी घेतली. यासाठीच हा एनडीस्तंभ आपण सर्वांनीच अनुसरणीय मानायला हवा.

**पाच :**

महाराष्ट्र समाजवादी व्हावा हा त्यांचा आग्रह होता. आम्ही भारतीय लोक आहोत असे म्हणणारा प्रबुद्ध स्वभाव इथे निर्माण व्हावा, भारतात जे सर्व आहे ते सर्वच भारतीयांचे आहे, कोणी लुटणारा नाही आणि कोणी लुटला जाणारा नाही, सर्व माणसांच्या संबंधातून संविधानसभ्यता मोहोरत आहे, असा समाज त्यांना हवा होता.

सुमारे सत्तर वर्षे एनडी नावाचे आंदोलन या सभ्य समाजाच्या निर्मितीसाठी झटत होते. ते आपल्या ध्येयाशी पूर्ण प्रामाणिकच होते. म्हणून सत्तेला ते कधी शरण गेले नाहीत. सत्तेसाठी सत्याची हत्या करणाऱ्या गावगुंडांची गर्दी ते बघत होते; पण एनडींनी सत्तेला सत्याशी जोडण्याचाच आटोकाट प्रयत्न केला. त्यांच्या निष्ठेत तडजोडीला वा अंतर्विरोधाला स्थान नव्हते. म्हणून ते आयुष्यभर समाजात सलोखा वाटत फिरले. परिस्थिती प्रतिकूल होतीच; पण तिला वाकवण्याची जिद्द त्यांनी कधी सोडली नाही. सर्वांनाच त्यांनी आपले मानले. एनडींचा हा आदर्श आदर व्यक्त करून बाजूला ठेवण्यासारखा नाही. हा आदर्श लोकांनी प्रत्यक्ष जगण्यात उतरवण्यासाठी आहे.

भारतीय संविधानाला अभिप्रेत भारतीय माणूस कसा असावा, भारतीय प्रबोधनकार कसा असावा, संविधानातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय लोकशाहीचे ध्येय प्रत्यक्षात उतरवण्यासाठी झुंजणारा आदर्श महाराष्ट्रीय कसा असावा या प्रश्नाचे एक ज्वलंत उत्तर एनडी पाटील यांच्या आयुष्यात आपण वाचू शकतो. नव्या पिढ्यांनी हे उत्तर नुसते वाचू नये तर ते उत्तर प्रत्यक्ष जगून दाखवण्याचा निर्धार करावा, असे मला वाटते आणि एनडीमय होण्यासाठी या उत्तरालाच विद्यमान पिढीतील लोकांनी आणि येणाऱ्या पिढ्यांनीही सर्जनशील अभिवादन करावे.

........................................................

'लुम्बिनी, ४५, लोकसेवानगर, नागपूर - ४४००२२
चलभाष : ८००७१५५५७७

●



# समग्र परिवर्तनाच्या लढाईतील महाशक्तिमान आणि चारित्र्यवान नेता

उत्तम कांबळे
९८८१०९९१४३

“वर्गीय लढाईत मध्यमवर्ग काय करतो, कसं करत असतो आणि मुळात काही करतो की नाही याचे खूप मोठे चिंतन त्यांच्याकडे होते. वरची पायरी चढण्याचे स्वप्न पाहाणाऱ्या मध्यमवर्गानं खालच्या वर्गाशी असलेली आपली नाळ तोडू नये असं त्यांना वाटायचं. नाळ तोडणाऱ्यांविषयी त्यांना राग यायचा. टाटा–बिर्लाच्या जोडीला जाण्याचे हे खोटे स्वप्न पाहात आहेत. कारण त्यांना कळसावरची भांडवलशाही कधी येऊ देणार नसते. वर्गीय फूट पाडणाऱ्यांसाठी तिला जणू काही मध्यमवर्गाची निर्मिती तिने केलेली असते. मध्यमवर्गात भ्रम तयार झालेला असतो. तो भ्रमात किंवा मृगजळाचं पांघरूण घेऊन जगत असतो. हे सार सर्कशीतल्या गाढवाचं उदाहरण देऊन ते सिद्ध करायचे. उदाहरण ऐकताना प्रचंड हास्यकल्लोळ व्हायचा. कसरत करताना चुकणाऱ्या सर्कस सुंदरीचं लग्न गाढवाशी लावून दिलं जाईल, असं तिचा शिक्षक सांगत असतो. गाढवानं ते ऐकलेलं असतं. कधीतरी सर्कस सुंदरी चुकेल आणि तिच्याशी आपलं लग्न लागेल, या आशेने गाढव जगत असते. प्रत्यक्षात असं कधी घडत नसतं. घडण्याची शक्यताही नसते. मध्यमवर्गाचे तसेच आहे, हे सर पटवून द्यायचे.”

राष्ट्रीय काँग्रेस शेतकरी कामगारांच्या हिताचे काही गांभीर्याने पाहात नाही. ती भांडवलशाहीच्या हिताचे पाहाते आहे, अशी तीव्र भावना झालेल्या बहुजन समाजातील काही तरुण नेत्यांनी १३ जून १९४८ ला म्हणजे स्वातंत्र्यानंतर सुमारे वर्षभराने शेतकरी कामगार पक्षाची स्थापना मुंबईत केली. काहींच्या मते, ही तारीख १३ जून अशीही आहे. या पक्षाचा जाहीरनामा पुढे १९५० मध्ये मालेगावजवळ दाभाडी गावात लिहिला गेला. त्याला दाभाडी प्रबंध म्हणतात. शेतकरी कामगार पक्षाला त्याच्या स्थापनेपासूनच प्रचंड जनाधार मिळाला. विशेषतः बहुजन समाजातील तर तरणीबांड पिढी मोठ्या प्रमाणात या पक्षाकडे धावली. त्यात एक प्रा. एन. डी. पाटील होते. अर्थात, ही लढाऊ संघटना स्थापन केली होती ती केशवराव जेधे (पुणे), शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत (मुंबई), कॉ. नाना पाटील (सातारा), तुळशीदास जाधव (सोलापूर), दाजीबा देसाई (बेळगाव), ज्येष्ठ नेते भाई माधवराव बागल (कोल्हापूर), पी.के. भापकर, दत्ता देशमुख (नगर) यांनी. मार्क्सवाद हा या संघटनेचा पाया होता. काँग्रेस आणि कम्युनिस्टांपासून स्वतंत्र अशी ही संघटना होती. कम्युनिस्टमधील लोक कॉम्रेड झाले आणि शेतकरी कामगार पक्षातील भाई झाले. अल्पावधीतच चमत्कार वाटावा असे सक्रिय सदस्य या संघटनेला लाभले. लाखोंच्या संख्येने ते होते. बहुजनांना घेऊन परिवर्तनासाठी रणमैदानात उतरलेला आणि दीर्घकाळ आपल्या युद्धकथा तयार करणारा हा पक्ष होता.

एन.डी. पाटीलही समाजाचे भाई झाले. शेतकरी कामगार पक्षात येण्यापूर्वीच त्यांना स्वातंत्र्य चळवळीत तयार झालेली धग ठाऊक होती. त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ चा. स्वातंत्र्याची चळवळ तप्त होण्याच्या काळातला. बेचाळीसच्या आंदोलनावेळी ते तेरा वर्षांचे, तर स्वातंत्र्याच्यावेळी सतरा वर्षांचे होते. ही सर्व लढाई कधी प्रत्यक्ष, तर कधी अप्रत्यक्ष त्यांनी पाहिली होती. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजाची नवरचना करायची होती. म्हणजे सामान्य माणसांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक प्रश्नाला हात घालायचा होता. स्वातंत्र्य चळवळीतील काही नेत्यांनी स्वातंत्र्यानंतर राजकारणात पूर्णवेळ काम करायचं ठरवलं; पण एन. डी. पाटील यांनी संसदीय आणि संसदबाह्य अशा दोन्ही आघाड्यांवर लढायचं ठरवलं. सामाजिक आणि राजकीय परिवर्तनासाठी त्यांनी आयुष्य वेचायचं ठरवलं. सत्ता शेठजी–भटजींच्या ती राबणाऱ्यांच्या हातात यावी आणि राबणाऱ्यांचे संघटन करून त्यांचा आवाज सत्तेवर खेळवायचा तशी ती रचना होती. खूप म्हणजे खूप अल्पावधीत सरांनी जनतेच्या गळ्यातील ताईत बनण्याचा विक्रम केला. स्वातंत्र्यानंतर गोवा मुक्तीचं आंदोलन होतं, अजूनही सुरू असलेलं मराठी भाषिकांचं आंदोलन होतं, सत्तेत वाटा मागणाऱ्या दलित, शेतकरी, कामगार आणि महिलांचंही आंदोलन होतं. या सर्व आंदोलनात दोन देणारे आणि दोन घेणारे नेते म्हणून सततच ते अग्रभागी राहिले. अगदी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतही.

पुरोगामी विचार, कृती, अभ्यास, आराखडे आदी सर्व

गोष्टी यांच्याकडेच होत्या. प्रश्न मध्येच सोडून न देता तो तडीस नेण्याची क्षमता होती. काही वेळा काही सहकाऱ्यांनी युद्धातून माघार घेतली. काहींनी ऊब देणाऱ्या घरट्यात प्रवेश केला. काहींनी नव्या संघटना-संस्था उभ्या केल्या; पण सरांनी आयुष्यभर विचारांशी कधी तडजोड केली नाही. म्हाताऱ्या, दणकट खलाशाप्रमाणे ते आपले जहाज चालवत राहिले. योग्य त्या ठिकाणी नांगरत राहिले. स्वातंत्र्यानंतर समग्र परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्यांपैकी सर एक होते. वर्ग आणि वर्ण यांच्या लढाया, असंघटित क्षेत्रातील घर कामगारांच्यासाठीच्या लढाया, दुर्लक्षित केल्या गेलेल्या किंवा झालेल्यांसाठी लढाया त्यांनी लढवल्या. सर्वहारा वर्ग घेऊन ते निघाले होते आणि त्यांच्या लढायांमध्ये यश मिळवतही होते. धरणग्रस्त, परितक्ता, रिक्षावाले, मजूर, हमाल, विद्यार्थी शिक्षक, शेतकरी, सीमाभागातील मराठी भाषक, देवदासी आदी ते घटक होते. शिक्षण, प्रबोधन, संघटन, संघर्ष आणि संसदीय राजकारण अशा पायऱ्या पकडून ते जात होते. स्वातंत्र्यानंतर म्हणजे विसाव्या शतकाच्या आगेमागे जन्माला आलेले ते एक श्रेष्ठ प्रबोधनकार होते. जसे कॉम्रेड गोविंद पानसरे होते. वर्गात, वर्गाबाहेर, सभेत-सभेबाहेर, मोर्चात मोर्चाबाहेर, असे सतत त्यांचे चौफेर प्रबोधन चालू असायचे. तुफान अशा वक्तृत्वाची प्रबोधनकारी शैली त्यांनी आत्मसात केली होती. सभेत पाच-सहा तास सतत बोलत राहणे आणि समोरची गर्दी आत्मसात करणे ही काही सोपी गोष्ट नाही. धंदेवाईक वक्त्यालाही ते जमणारे नव्हते. विषय मांडायचा कसा? त्याचे पदर उलघडायचे कसे? तो लोकांना त्यांच्यात भाषेत समजून द्यायचा कसा? आपलं भाषण क्लिल्ष्ट नव्हे; तर श्रवणीय आणि आनंददायी कसं करायचं? लोकजीवनातील अनुभव, उदाहरणे कशी द्यायची? आणि या सर्वांच्या मुळाशी झगमगतं तत्त्वज्ञान कसं जिवंत ठेवायचं? हे सारं सरांकडून पाहायला अन् शिकायला मिळालं.

वर्गीय लढाईत मध्यमवर्ग काय करतो, कसं करत असतो आणि मुळात काही करतो की नाही याचे खूप मोठे चिंतन त्यांच्याकडे होते. वरची पायरी चढण्याचे स्वप्न पाहाणाऱ्या मध्यमवर्गानं खालच्या वर्गाशी असलेली आपली नाळ तोडू नये असं त्यांना वाटायचं. नाळ तोडणाऱ्यांविषयी त्यांना राग यायचा. टाटा-बिर्लाच्या जोडीला जाण्याचे हे खोटे स्वप्न पाहात आहेत. कारण त्यांना कळसावरची भांडवलशाही कधी येऊ देणार नसते. वर्गीय फूट पाडणाऱ्यांसाठी तिला जणू काही मध्यमवर्गाची निर्मिती तिने केलेली असते. मध्यमवर्गात भ्रम तयार झालेला असतो. तो भ्रमात किंवा मृगजळाचं पांघरूण घेऊन जगत असतो. हे सार सर्कशीतल्या गाढवाचं उदाहरण देऊन ते सिद्ध करायचे. उदाहरण ऐकताना प्रचंड हास्यकल्लोळ व्हायचा. कसरत करताना चुकणाऱ्या सर्कस सुंदरीचं लग्न गाढवाशी लावून दिलं जाईल, असं तिचा शिक्षक सांगत असतो. गाढवानं ते ऐकलेलं असतं. कधीतरी सर्कस सुंदरी चुकेल आणि तिच्याशी आपलं लग्न लागेल, या आशेने गाढव जगत असते. प्रत्यक्षात असं कधी घडत नसतं. घडण्याची शक्यताही नसते. मध्यमवर्गाचे तसेच आहे, हे सर पटवून द्यायचे.

परिवर्तन ही गोष्ट कोणा कॅलेंडरमध्ये बसणारी नसते. ती सतत चालणारी असते. जुन्या प्रश्नाचे नाक कापत असताना काही नवे जन्माला येत असतात. जुने रुंदावत असताना काही नवे उगवत असतात. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' याप्रमाणे लढतच राहावे लागत असते. नव्या लढाया, नवी मैदाने आणि नवे लढवय्येही येतच असतात. एकातून दुसऱ्याचा जन्म होत असतो. खचायचं नसतं. मैदानाला पांढरा झेंडा दाखवायचा नसतो. जय-विजय या तशा कल्पना असतात आणि संघर्ष वास्तव असतो. दुष्काळाच्याविरोधातलं एक ऐतिहासिक आंदोलन इस्लामपूरमध्ये झाले. ते गोळीबाराने हिंसक बनले. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात काही आंदोलक हुतात्मा झाले. आंदोलन मोडून काढल्यामुळे खचून न जाता शेतकरी कामगार पक्षाने गावोगावी काही पोस्टर तयार करून लावली. त्यात एक शेतकरी कामगार पक्षाच्या कोल्हापुरातील खासबाग मैदानाजवळच्या कार्यालयात होतं. त्या पोस्टवर कुसुमाग्रजांच्या कवितेतील दोन ओळी लिहिल्या होत्या-


'सरणावरती आज आमुची पेटतात प्रेते
त्या ज्वाळातून उठतील भावी क्रांतीचे नेते'

नवे क्रांतिकारी जन्माला घालणाऱ्या, त्यांना साद घालणाऱ्या ओळी अजूनही आंदोलकांच्या ओठावर आहेत.

कोणत्याही नेत्याकडे जी काही शक्ती प्राप्त होते, ती दोन मार्गांनी येत असते. एक स्वतः नेता शक्तिमान होण्यासाठी विचार, तत्त्वज्ञान, आंदोलन आदी आयुध वापरत असतो आणि दोन समाजही त्याला शक्तिमान बनवत असतो. सरांच्याकडे शक्तिमान बनण्याचं आणखी एक साधन होतं, चारित्र्य आणि साधेपणा. वेगवेगळ्या लढाया लढताना आणि आयुष्याची लढाई बनवताना त्यांनी स्वतःचं चारित्र्य शक्तिमान बनवलं होतं. एकही डाग त्यावर पडू दिला नाही किंवा त्यांच्या विरोधकांनीही अशा प्रकारचा डाग टाकण्याचा प्रयत्न केला नाही. निष्कलंक चारित्र्य ही सरांची खूप मोठी शक्ती आणि खूप मोठं हत्यार होतं. अशा त्याला जगातल्या सर्व अन्यायकारी व्यवस्था खूप घाबरत असतात. नेता किती साधा आणि समाजात लगेचच मिसळून जाणार असतो, याचे एक उदाहरण म्हणूनही सरांचे नाव मोठ्या अभिमानाने घेता येईल. नैसर्गिक असलेलं साधं सामर्थ्यवान असतं. म्हणून ते सुंदरही असतं. सर जेव्हा जेव्हा गंभीर आजारी पडले, तेव्हा महाराष्ट्रभरातील त्यांच्या फाटक्या-तुटक्या कार्यकर्त्यांनी हॉस्पिटलबाहेर कशी

गर्दी केली होती आणि ओंजळभर सुटे पैसे घेऊन ते कसे जमा व्हायचे हे महाराष्ट्राने बघितले आहे. अनेक वेळा लोकप्रतिनिधींची निवडणूक जिंकणारा, मंत्री होणारा, रयतसारख्या संस्थेचा प्रमुख होणारा नेता आर्थिकदृष्ट्या इतका सामान्य कसा असतो, हे लोकांना पटणार नाही. पण ते वास्तव होते. चळवळ आणि त्यातील सामान्य माणसं हीच सरांची खरी संपत्ती होती. शेवटपर्यंत त्यांनी ती टिकवून ठेवली. त्यांच्या निधनानंतरही ती आपल्याला चौफेर पाहायला मिळेल.

●



# एन.डी. पाटील: कार्यकर्ता ते नेतृत्वाचा आदर्शबिंदू

किशोर बेडकीहाळ
९४२३०१२८७७

"राजकारण, समाजकारण, सामाजिक चळवळी किंवा सुधारणावादी चळवळी याचंही पुन्हा एक नातं आहे आणि ते द्वंद्वात्मक नातं आहे, याचं भान एन.डीं. च्या नेतृत्वामध्ये नेहमीच राहिलेलं आहे. कोणत्या अर्थानं हे नातं असतं? सुधारणांच्यामागे जर रेटा निर्माण केला, तर राजकारण्यांना त्याची दखल घ्यावी लागते. रेटा जर निर्माणच झाला नाही तर राजकारणी, तो प्रश्न कितीही महत्त्वाचा असला, तरी त्याची दखलसुद्धा घेणार नाहीत. हा नेता एका बाजूला संघर्ष करताना दिसतो. संघर्ष हा त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू होता. पण हाच नेता विधिमंडळात गेल्यावर रस्त्यावरील संघर्षातून निर्माण केलेलं दडपण विधिमंडळात वापरतो ही गोष्ट वाखाणण्यासारखी आहे. एन.डी. एक आदर्श संसदपटू होते. १९६८ मध्ये मधुकरराव चौधरी शिक्षणमंत्री असताना काँग्रेसनं शिक्षणविषयक श्वेतपत्रिका काढली होती. पण एन. डी. सरांनी या श्वेतपत्रिकेचं कृष्णस्वरूप उघड करून भविष्यकाळात बहुजनांच्या शिक्षणाबाबतची भयसूचक अवस्था दाखवली. त्यामुळे काँग्रेसचं बहुमत असूनसुद्धा ही श्वेतपत्रिका काँग्रेसला नाकारावी लागली. म्हणजेच एन.डीं. च्या रस्त्यावरच्या विधिमंडळातल्या आणि पुढे मंत्री झाल्यानंतरच्या अशा तिन्ही प्रकारच्या वर्तनामध्ये सुसंगती दिसते. मंत्री झाल्यावर एक आणि आंदोलन करताना एक असं कोणतंही न पेलणारं, न पचणारं आश्वासन एन.डीं. नी कधीही दिलं नाही. त्यांना आपली स्थिती काय आहे आणि आपण काय करायचं आहे? हे नि:संशय माहिती होतं."

एन.डी.पाटील ज्या काळात घडले, तो सगळा काळ एकोणीसशे बेचाळीसच्या चळवळीचा होता. एकोणीसशे बेचाळीसच्या चळवळीचं महाराष्ट्रातलं वैशिष्ट्य हे आहे की, त्या चळवळीच्या वैचारिकतेचा सगळा कल एका बाजूला साम्राज्यवादाविरोधातला होता आणि दुसऱ्या बाजूला समाजवादाच्या प्रस्थापनेसाठीचा होता. त्यामुळे ज्या वातावरणात एन.डी. पाटील घडले, ते वातावरणच मुळात जनतेचे लढे समाजवादाच्या दिशेनं नेणारं आणि समाजवादाची प्रस्थापना करण्याच्या चळवळींनी भारलेले होते. एन. डी.सर स्वत:बद्दलची एक गोष्ट अभिमानानं सांगतात की, 'जनसत्ता साप्ताहिकाचा अंक हातावर घेऊन मी कोल्हापूरमध्ये विकलेला आहे.' म्हणजे या सगळ्यामध्ये एक कार्यकर्ता म्हणून व एक स्वत:च्या घडणीचा भाग म्हणून सतत एन.डी. सर स्वत:कडे पाहतात.

एकदा एका लेखामध्ये एन.डीं. चा उल्लेख मी स्वत:च 'मार्क्सवादी सत्याग्रही' असा केला होता. आता मार्क्स आणि सत्याग्रह या दोन वेगवेगळी संदर्भमूल्य असलेल्या शब्दांचा मेळ एन.डीं.च्या व्यक्तिमत्त्वामध्ये तंतोतंत बसतो. यापूर्वी महाराष्ट्राच्या वैचारिक विश्वात सत्याग्रही समाजवादाच्या अभिनव मांडणीचा एक प्रयत्न आचार्य जावडेकरांनी केला होता. पण प्रत्यक्षात तत्त्व म्हणून मार्क्स, लेनिनवर श्रद्धा असणारा आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाचा पाईक असणारा माणूस गांधींच्या मार्गाने व्यवहारात कसा काय चालू शकतो? याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे एन.डी. पाटील हे आहेत, अशावेळी हे प्रकर्षाने जाणवते की, त्याचवेळी कार्यकर्त्याचे नेतृत्वामध्ये रूपांतर होण्यासाठी नेतृत्वाकडे सुद्धा एक वेगळी व्हिजन असणं याची आवश्यकता असते. परिस्थितीचं वाचन नेत्याचं स्वत:चं असायला हवं. नेतृत्वाची कसोटी हीच तर असते.

भारतातल्या सर्व मार्क्सवादी पक्षांचा आणि नेत्यांचा मार्क्सवाद हा मार्क्स, लेनिन आणि पश्चिमेच्या दृष्टीनं प्रेरित झालेला होता. अगदी कॉम्रेड डांगेंनी सुद्धा कामगारांचा लढा आणि समाजवाद याच वैचारिक बांधणीतून आपली मांडणी केलेली आढळते. भारतीय परिस्थितीमध्ये मार्क्सवादाचं वेगळं स्वरूप काय आणि कसं असेल? तसेच मुळात महाराष्ट्रामध्ये फुल्यांच्या सत्यशोधक तत्त्वज्ञानाचा आधार घेऊन मार्क्स, लेनिनचा वारसा एकत्र करून काही वेगळं करता येईल का? या पद्धतीनं मार्क्स आणि लेनिनच्या लिखाणाचा विचार करणाऱ्या शेतकरी कामगार पक्षामध्ये एन.डी. पाटील वाढले. म्हणून 'एन.डी.' हे वेगळं व्यक्तिमत्त्व आहे. नेत्याला परिस्थितीचं राजकीय वाचन आणि आकलन कशा पद्धतीने करता येतं, यावरून त्याच्या नेतृत्वाचं महत्त्व ठरतं.

एन.डीं.नी माओत्से तुंग व्यवस्थित वाचलेला आहे, हे कित्येकांना माहिती नसेल आणि आज हे बोलल्यानंतर लगेच कुणीतरी त्यांना माओवादी ठरवून मोकळं होईल. एन.डीं.नी

केवळ माओ वाचलेला नाही तर तो पचवला देखील आहे. माओच्या हिंसक मार्गापासून ते दूर आहेत; पण माओच्या विचारांचं सूत्र मान्य करून ते त्यांनी भारतीय परिस्थितीला लागू केलेलं आहे. इथेच इतर मार्क्सवाद्यांच्या तुलनेत एन.डीं.नी केलेली मार्क्सवादाची मांडणी वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरते. माओचं 'ऑन कॉन्ट्राडिक्शन्स' नावाचं एक प्रसिद्ध पुस्तक आहे. एकेकाळी ते बायबलसारखं वाचलं गेलं. त्यात त्यांनी असं म्हटलेलं आहे की, प्रिन्सिपल कॉन्ट्रडिक्शन्स ही जरी कॅपिटल आणि लेबर यांच्यामध्ये असली तरीसुद्धा समाजामध्ये अनेक सब कॉन्ट्राडिक्शन्स अस्तित्वात आहेत. काही वेळेला हीच सब कॉन्ट्राडिक्शन्स प्रमुख प्रश्न बनून पुढे येतात. त्यावेळेला परिस्थितीचे योग्य वाचन करून योग्य निर्णय घ्यावे लागतात. एन.डीं. च्या लक्षात आलं की, भारतामध्ये भांडवलदारविरुद्ध कामगार हा कितीही महत्त्वाचा कॉन्ट्राडिक्शनचा भाग असला, तरीही कामगार वर्गाची संख्या आणि शेतकऱ्यांची संख्या जर लक्षात घेतली तर इथं मुख्य प्रश्न शेतीचा आहे. शेतीच्या प्रश्नाला हात घातल्याशिवाय आणि शेतकऱ्याचं संघटन त्या दिशेनं नेल्याशिवाय इथं मार्क्सवादाचा भारतीय अवतार सिद्ध होणार नाही. हे परिस्थितीचं वेगळेपण ओळखून एन.डीं.नी वाटचाल केली. या दुय्यम आंतरक्रियेच्या आधारेच त्याचं समाजकारण, राजकारण, सामाजिक सुधारणावादी चळवळींमधला सहभाग हे सगळं उलगडता येईल. या दृष्टीने एन.डीं.च्या वैचारिक प्रवासाचे एकेक टप्पे पाहाण्यासारखे आहेत.

सत्यशोधक समाजाचं तत्त्वज्ञान आणि फुलेंची भूमिका त्यांनी स्वीकारली पण सत्यशोधकाचं ब्राह्मणेत्तर होणं त्यांनी स्वीकारलेलं नाही. कोणत्याही इतर मीमांसेवर एन.डीं. नी भर दिलेला नाही. याचं कारण त्यांच्यावर असलेला नुसता मार्क्स, लेनिनचा प्रभाव नाही; तर मार्क्स, लेनिनच्याबरोबर महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील आणि राष्ट्रीय कालखंडातला अविभाज्य भाग असलेला गांधींचा मार्ग यांचाही प्रभाव आहे. गांधींचा अहिंसात्मक सत्याग्रह तुम्हाला तत्त्वत: मान्य असो वा नसो; पण शांततामय मार्गांनीच आंदोलन केली पाहिजेत. शस्त्र हातात घेणं परवडणारं नाही, म्हणून प्रत्येक आंदोलन निःशस्त्र पद्धतीनेच होईल, हा कटाक्ष एन.डीं. नी नेहमी पाळला. किंबहूना गांधी कालखंडातला हा संस्कार त्यांनी पचवलेला होता. अनेकांना असं वाटतं की, एन.डी. हे मार्क्सवादी आहेत. लेनिनवादी आहेत. म्हणजे ते केवळ हातात बंदूक घेऊनच वावरणार; पण अशी अजिबात शक्यता नाही, कारण त्यांना इथल्या सगळ्या सामाजिक परिस्थितीचे संदर्भ अचूक माहिती होते. १९७२ साली इस्लामपूरमध्ये दुष्काळासंदर्भातला त्यांनी जो मोर्चा काढला, त्या मोर्चावर गोळीबार झाला. एन.डीं. च्या पुतण्यासहित चार जण हुतात्मा झाले. तरीही शस्त्र हातात घेण्याचा विचारही एन.डीं.नी केला नाही.

हे आंदोलन निःशस्त्र होतं. आंदोलनात तेरा मागण्या शासनाला लेखी स्वरूपात पुरवण्यात आल्या होत्या. गांधींच्या पद्धतीनं आंदोलनाची सगळी पूर्वतयारी झाली होती. त्यानंतर आंदोलन पार पडलं. शासनाने आंदोलनावर गोळीबार केला व आंदोलनानंतर न्यायमूर्ती पाटकरांची एक चौकशी समिति नेमली गेली. पाटकरांच्या समितीचा सगळा अहवाल आता प्रसिद्ध झालेला आहे. एन.डी. पाटील प्रतिष्ठाननेच ती पुस्तिका प्रसिद्ध केलेली आहे. तो अहवाल जर पाहिला, तर असं लक्षात येतं की, हे पहिलं आंदोलन आहे की, ज्याच्या चौकशी समितीनं आंदोलनाच्या सर्वच्या सर्व मागण्या न्याय्य ठरवलेल्या आहेत. जवळपास सर्वच मागण्या न्याय होत्या असा निष्कर्ष न्यायमूर्ती पाटकरांनी काढलेला आहे. त्यावेळी पाटकरांची पंचायत अशी झाली की, ते शासनाच्या चौकशी समितीचे प्रमुख असल्यामुळे व त्यांची विचारपद्धती अंतिमत: कायदा व सुव्यवस्थेला महत्त्व देणारी असल्यामुळे त्यांनी गोळीबाराचे समर्थन केले; पण त्यांनीही गोळीबार झाला, पण गोळीबाराचा अतिरेक झाला हे मान्य केलं. या तेरा मागण्यांची चिरफाड करून त्या किमान आणि न्याय्य होत्या हेही मान्य झालं. जर एखादी किमान आणि न्याय्य मागणी माणसाला माणूस म्हणून जगण्याच्या पातळीपासून खाली नेणार नाही इतपत न्याय्य असेल, तर तिचं नैतिक दडपण निर्माण होतं आणि जर का मागण्याचं नैतिक दडपण निर्माण झालं, तर सत्ताधाऱ्यांना शस्त्रांशिवाय सुद्धा पराभूत करता येतं, हा १९७२ च्या आंदोलनानं सेट केलेला नवा मानदंड होता. या सगळ्याचं श्रेय केवळ एन.डीं.ना जातं म्हणून एन.डीं. चा खास उल्लेख मी 'मार्क्सवादी सत्याग्रही' असा करतो. त्याकाळी त्यांना खूप प्रलोभनही होती; पण त्यांनी ती अतिशय प्रामाणिकपणे धुडकावून लावली.

१९७२ च्या गोळीबाराची चौकशी चालू असताना, ॲड.व्ही. एन. पाटलांसारखे नामवंत वकील एन.डीं.च्या व आंदोलकांच्या बाजूने केस लढवत होते. ते खटल्याच्या एका टप्प्यावर एन.डीं. ना असं म्हणाले की, ''सर तुम्हाला खोटं बोलावं लागेल. तुम्ही बंदीरेषा ओलांडली नाही असं सांगाव लागेल.'' एन.डीं. नी बंदीरेषा ओलांडली होती. तेव्हा एन.डी. म्हणाले, ''मी बंदीरेषा ओलांडली आहे, मी खोटं बोलणार नाही.'' त्यावेळी व्ही. एन. पाटील संतप्त होऊन वकीलपत्र सोडून चालले होते, पण त्यांना काय वाटलं कुणास ठाऊक. ते परत आले तेव्हा त्यांना आपला सगळा डिफेन्स बदलावा लागला. एन.डी. म्हणाले, ''मी बंदीरेषा ओलांडली हे खरं आहे. पण आमच्या कुणाच्याही हातात शस्त्र नव्हती.'' शेतकऱ्यांनी काठीला कणसं बांधून आणली होती. कणसं

म्हणजेच शस्त्र आहेत, असा अनेकांनी सोयीचा अर्थ लावला आणि सरकारी साक्षीही तशाच पढवल्या गेल्या.

खोटं बोलायची संधी वकील देत असतानासुद्धा एन.डी. खोटं बोलले नाहीत. कारण सत्याग्रहीकडे नुसतं सत्य असून चालत नाही, तर त्या सत्यासाठी लागणारा अंगभूत प्रामाणिकपणाही असावा लागतो. प्रामाणिकपणा जर अंगी असेल, तरच ते सत्य अधिक प्रखर होतं. एन.डीं. नी हे आंदोलन पूर्णत: सत्याग्रही पद्धतीने केलं, त्यामुळे मी त्यांना 'सत्याग्रही' म्हटलं.

एन.डीं.ना आदर्श म्हणण्याचं दुसरं कारण म्हणजे, एन.डीं. ची जडणघडण अशा कालखंडामध्ये झाली, जेव्हा राजकारण आणि सामाजिक सुधारणा यांची फारकत झालेली नव्हती. राजकारण करणाऱ्या माणसाने समकालीन सुधारणांना हात घालायचा नाही ही भूमिका एन.डीं. नी कधीच मान्य केलेली नव्हती. म्हणून राजकारण करत असताना मी अंनिसच्या व्यासपीठावर जावं की नाही किंवा मुस्लीम प्रश्नावर बोलावं की नाही हा इतर कॉम्रेडना पडलेला प्रश्न एन.डीं. ना कधीच पडला नाही.

राजकारण, समाजकारण, सामाजिक चळवळी किंवा सुधारणावादी चळवळी याचंही पुन्हा एक नातं आहे आणि ते द्वंद्वात्मक नातं आहे, याचं भान एन.डीं. च्या नेतृत्वामध्ये नेहमीच राहिलेलं आहे. कोणत्या अर्थानं हे नातं असतं? सुधारणांच्या मागे जर रेटा निर्माण केला, तर राजकारण्यांना त्याची दखल घ्यावी लागते. रेटा जर निर्माणच झाला नाही तर राजकारणी, तो प्रश्न कितीही महत्त्वाचा असला, तरी त्याची दखल सुद्धा घेणार नाहीत.

हा नेता एका बाजूला संघर्ष करताना दिसतो. संघर्ष हा त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू होता. पण हाच नेता विधिमंडळात गेल्यावर रस्त्यावरील संघर्षातून निर्माण केलेलं दडपण विधिमंडळात वापरतो ही गोष्ट वाखाणण्यासारखी आहे. एन.डी. एक आदर्श संसदपटू होते. १९६८ मध्ये मधुकरराव चौधरी शिक्षणमंत्री असताना काँग्रेसनं शिक्षणविषयक श्वेतपत्रिका काढली होती. पण एन. डी. सरांनी या श्वेतपत्रिकेचं कृष्णस्वरूप उघड करून भविष्यकाळात बहुजनांच्या शिक्षणाबाबतची भयसूचक अवस्था दाखवली. त्यामुळे काँग्रेसचं बहुमत असूनसुद्धा ही श्वेतपत्रिका काँग्रेसला नाकारावी लागली. म्हणजेच एन.डीं. च्या रस्त्यावरच्या विधिमंडळातल्या आणि पुढे मंत्री झाल्यानंतरच्या अशा तिन्ही प्रकारच्या वर्तनामध्ये सुसंगती दिसते. मंत्री झाल्यावर एक आणि आंदोलन करताना एक असं कोणतही न पेलणारं, न पचणारं आश्वासन एन.डीं. नी कधीही दिलं नाही. त्यांना आपली स्थिती काय आहे आणि आपण काय करायचं आहे? हे नि:संशय माहिती होतं.

एन. डी. सरांनी सहकारमंत्री असताना दोन क्रांतिकारी निर्णय घेतले. एक म्हणजे त्यांनी कापूस एकाधिकार योजनेची पुनर्रचना करून ही योजना यशस्वी करून दाखवली. शेतकऱ्यांच्या मालाला चोवीस तासाच्या आत चुकारा मिळेल, पैसे जागेवर रोखीने मिळतील आणि उशीर झाला, तर बारा टक्क्यांनी व्याजसुद्धा मिळेल, असा विश्वास दिला. व्याजाच्या कॅलक्युलेशनसहित शेतकऱ्यांच्या हातात पैसे ठेवणारे ते महाराष्ट्रातले पहिले सहकारमंत्री आहेत. पण राज्यकर्त्यांना ही योजना पुढे सोयीची नव्हती. कारण दलाल, व्यापारी आणि राज्यकर्ते यांचं घनिष्ठ हितसंबंध दुखावले जात होते. एन.डीं. नी नेमका त्याच्या मुळावरच घाव घातला होता.

त्यांचा दुसरा निर्णय म्हणजे सहकार क्षेत्रात त्यांनी एक ठाम भूमिका अशी घेतली की, सहकारी कारखान्याच्या निवडणुकांमधली पॅनेलबाजीच रद्द केली. कारखान्यांच्या ज्या निवडणुका पॅनेलवरून होतात, त्या निवडणुका बदलवणारं एक विधेयक त्यांनी आणलं. त्यावेळी काँग्रेस नेत्यांनी जळफळाट केला. काँग्रेस पक्षातून जनता पक्षात आलेल्यांनीसुद्धा तडफडाट केला. कारण ते जनता पक्षातून असले तरी ते मूळचे काँग्रेसचेच होते. इतकं सगळं होऊनसुद्धा एन.डीं. नी त्यांचा मुद्दा रेटला. विधेयक मंजूर झालं. कधी नव्हे ते निरनिराळ्या साखर कारखान्यांच्या पॅनल्समध्ये चार-दोन विरोधी लोक डायरेक्टर बोर्डावर दिसायला लागले.

एन.डीं. चं म्हणणं असं होतं की, एक जरी विरोधी पक्षाचा माणूस डायरेक्टर बोर्डावर आला, तरी तो डायरेक्टर बोर्डाच्या निर्णयाची बाहेर चिरफाड करणार. सगळं पॅनेल निवडणुकीत निवडून येणं हे लोकशाहीला घातक आहे आणि म्हणून जगभर 'एक माणूस एक मत' असा नियम असेल, तर सहकाराच्या निवडणुकांमध्येसुद्धा 'एक माणूस एक मत' हा नियम असला पाहिजे. 'एक माणूस आणि अठरा मते' हे गणित चालणार नाही. एन.डीं. च्या या भूमिकेनं सहकार क्षेत्रातल्या पॅनेलबाजीचं कंबरडं मोडलं. अर्थात, सरकार टिकलं नाही हा भाग वेगळा. पण पुढे नंतर आलेल्या सरकारनं इतर विकास कामं करावी की न करावी यापेक्षा त्यांनी एन.डीं. नी घेतलेला निर्णय तातडीनं बदलून टाकला. कारण ते त्यांना सोयीचं होतं, साखर कारखाने हे पैसा उपसण्याच्या यंत्रणा आहेत. त्यातून विविध निवडणुकीसाठी पैसा उभा करता येतो, हा भ्रष्टाचार रोखणारी प्रक्रिया एन.डीं. नी तडीस नेली होती. पण संधी मिळताच ती पुन्हा प्रस्थापित झाली.

एन.डीं.च्या सर्व लढ्यामध्ये सगळ्यात महत्त्वाचा होता तो एन्रॉनचा लढा. एन.डीं. नी एन्रॉनसाठी सत्ता पणाला लावली. एन्रॉनची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे आणि ती करायची असेल, तर जी चौकशी समिती नेमायचा मुद्दा पुढे आलेला होता. त्यात शरद पवार यांनी काही नावं सुचवली होती. ती

सगळीच्या सगळी नावं जर चौकशी समितीमध्ये असती तर कदाचित एन्रॉनचा चौकशी प्रवास वेगळा झाला असता. काही घडलंच नाही, असा तो प्रवास झाला असता. एन.डी. शरद पवारांना म्हणाले, ''बाकीची चार नावं तुम्ही कुणाचीही घाला, पण त्या चौकशी समितीत 'माधव गोडबोले' असलेच पाहिजेत.''

माधव गोडबोले एका टप्प्यावर मुक्त अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते आहेत, हे जरी मान्य असलं, तरी त्यांच्या सचोटीबद्दल एन.डीं.ना अजिबात शंका नव्हती. व्यक्तीची पारख असणं ज्याला म्हणतात, ती पारख त्यांच्याकडे होती. काहीही झालं तरी माधव गोडबोले विकले जाणार नाहीत, अमिषांना, प्रलोभनांना बळी पडणार नाहीत. म्हणून त्यांनी गोडबोलेनांही विनंती केली. गोडबोलेंनी विनंतीचा स्वीकार करेपर्यंत आग्रह धरला. पण शरद पवारांनी मात्र गोडबोलेंच्या नावाला शेवटपर्यंत विरोध केला. पवार म्हणाले, ''गोडबोले सोडून कुणीही घ्या.'' पण त्यावर एन.डी. म्हणाले, ''गोडबोले सोडून नव्हे; तर गोडबोलेंशिवाय दुसरं कुणीही घेणार नाही'', असं म्हणून मंत्रालयाच्या मजल्यावरून ते खाली आले आणि गणपतराव देशमुखांच्या चेंबरमध्ये गेले. कारण गणपतराव देशमुख त्यावेळेला मंत्री होते. एन.डी. गणपतरावांना म्हणाले, ''तुम्ही ताबडतोब राजीनामा द्या. आपल्याला सत्ता सोडून खाली जायचं आहे.'' गणपतराव देशमुख राजीनामा द्यायला खाली येत आहेत हे कळेपर्यंत साहेबांचा निरोप घेऊन काही लोक त्यांच्यामागे आले आणि म्हणाले, की 'माधवराव गोडबोले' साहेबांना मंजूर आहेत. म्हणजे अशा किचकट राजकीय प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सत्ता असणं, या लोकांसाठी किती महत्त्वाचं होतं हे लक्षात येतं आणि हा सत्तेचा प्रयोग एन.डी. नी जाणीवपूर्वक केला.

१९७८ हे पुरोगामी लोकदलाचं सरकार असो किंवा नंतर आलेलं पुरोगामी लोकशाही आघाडीचं सरकार असो दोन्हीचेही अध्यक्ष एन.डी.च होते. दोन्हीचेही जाहीरनामे एन.डीं.नीच तयार केलेले आहेत. म्हणून सामाजिक सुधारणांची कलमं, गरीब शेतकऱ्यांचे रोजगार हमीचे प्रश्न, शेतमालाच्या किमतीचे प्रश्न हे या जाहीरनाम्याचा एक अविभाज्य भाग झाले. जर एखाद्या नेत्याला व्हिजन असेल, तर तो आंदोलनातून दडपण निर्माण करतो. विधिमंडळात गेल्यावर आवश्यक ते कायदे करतो आणि मंत्री झाल्यावर प्रत्यक्ष कृती करतो. वेळ पडली, तर सत्ता सोडायचीही तयारी दाखवतो आणि पुन्हा जनसामान्यांमध्ये येतो. इतकं विलक्षण असं एन.डीं.चं व्यक्तिमत्त्व होतं, म्हणूनच ते खऱ्या अर्थाने लोकशाहीतल्या जनआंदोलनाचे मुख्य करून आधार होते.

एन.डीं. चं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे आपण ज्या पक्षाचे नाही त्याही पक्षाच्या चळवळींमध्ये सहभाग घेणे. नेतृत्व आपलं असो वा नसो प्रसंगी दुसऱ्या व्यक्तीच्या नेतृत्वाखालीसुद्धा तीच चळवळ करायची तयारी एन.डीं. नी नेहमीच दाखवली. ते नेहमी म्हणत की, 'दाभोळकर माझे नेते आहेत.' या पद्धतीचं वक्तव्य करायलासुद्धा फार मोठं मन लागतं, सुपाएवढं काळीज लागतं. एखाद्या चळवळीमध्ये जाणं आणि आपल्या सहवासाने त्या चळवळीमध्ये, आंदोलकांच्यामध्ये विश्वसनीय आधार निर्माण करणं हे काम एन.डी. अतिशय प्रेमानं करीत.

महाराष्ट्रामध्ये चळवळी फोडण्याचे राजकारणसुद्धा आहे. आजपर्यंत अनेक पक्ष, अनेक चळवळी फोडल्या गेल्या. पँथरसारखी चळवळसुद्धा अशाच काही कारणांनी फुटली. हे सगळं लक्षात घेता कार्यकर्त्यांना नेहमी भीती असते ती म्हणजे एखाद्या नेत्याकडे जर आपण मदतीसाठी गेलो, तर तो आपल्यात फूट पाडेल की काय? आपली चळवळ तो नेता फोडेल की काय? एन.डीं. च्या बाबतीत अशी कसलीही भीती कोणत्याही संघटनेला आजतागायत वाटलेली नाही. एखाद्या चळवळीचं नेतृत्व एन.डी. करोत अथवा न करोत; पण ज्यांच्यासोबत एन.डी. आहेत त्यांना ते नेहमीच आधारभूत वाटलेले आहेत. नर्मदा आंदोलनामध्येसुद्धा ज्यावेळेस संघर्ष निर्माण झाले होते आणि तत्कालीन मंत्री मेधा पाटकरांना भेटच देईनात त्यावेळेसदेखील मध्यस्थी एन.डीं. नीच केली होती. म्हणजे प्रसंगी हा माणूस आंदोलक आणि सरकार यांच्या मधला मध्यस्थही होऊ शकतो, प्रसंगी आंदोलकांचा नेताही होऊ शकतो, प्रसंगी समोरच्या बाकावर बसून निर्णय घेणाराही होऊ शकतो, अशी राजकारणातली अनेक रूपं एन.डीं. नी लीलया पेलली आहेत. महाराष्ट्रात दुर्दैवाने लढणारे आणि लिहिणारे यांच्यात एक शत्रुभावी अढी आहे. लढणाऱ्यांनी म्हणायचं. 'लिहिणाऱ्यांचं काय जातंय ते काहीही लिहितात, लेखक फक्त हस्तिदंती मनोरे रचतात'. आणि लिहिणाऱ्यांनी म्हणायचं, 'लढणारे काय काहीतरी प्रासंगिक मागण्या करत असतात. त्यांना तर्कशास्त्र वगैरे काहीच कळत नाही' हे जे द्वैत आहे ते आपल्याला एन.डीं. च्या व्यक्तिमत्त्वामध्ये मिटलेलं दिसेल. 'लढणारा आणि लिहिणारा' वेगळा नसतो. लढतो तोही लिहू शकतो आणि लिहिणाराही लढू शकतो. हे एन.डी. नी सोदाहरण दाखवून दिलंय.

कार्यकर्त्यांशी बोलताना एन.डी. ग्रामीण बोलीभाषेचा वापर करतात. आपला मुद्दा पटवून देतात आणि समोरची सभा जिंकतात. अभ्यासकांच्यात गेलं की एन.डीं. चं रूप वेगळं होतं. त्यांच्या बोलण्यात वेगळेपणा येतो. कार्यकर्त्यांच्यात गेले की ते एका वेगळ्याच वातावरणात जातात ही सगळी एकाचं माणसाची रूपं आहेत. म्हणून हे अद्भुत रसायन कौतुक वाटावं असं आहे. केवळ त्यामुळेच लिहिणाऱ्यांना एन.डी. कधीच परके वाटले नाहीत आणि लढणाऱ्यांना त्यांचं वेगळं वाटणं तर शक्य नव्हतं; पण महाराष्ट्रातला लिहिणारा जो विचारवंतांचा,

लेखकांचा वर्ग होता त्यांनीही एन.डीं.ना कधीही कमी लेखलेलं नाही.

एखाद्या मुद्यावर मी चार संदर्भ सांगायच्या आधी एन.डीं. चा पाचवा संदर्भ तयार असतो. मला आठवतंय, सातारच्या एका चर्चासत्रामध्ये 'गांधी आणि आंबेडकर यांच्या राजकीय प्रतिकाराची संकल्पना' या विषयाचं बीजभाषण एन.डीं. च्याकडे होतं. त्यांनी पटकन एका इंग्रजी कवितेचा उल्लेख केला आणि सांगितलं की, सत्याग्रहाची बीज इथं आहेत. एन.डीं. नी एका कवितेच्या आधारे सत्याग्रहाची संपूर्ण संकल्पना काय आहे? संघर्ष कसा करायचा याचं विश्लेषण अगदी सहजपणे दिलं. ही ताकद त्यांच्याकडे कशामधून येते? एकतर ते स्वत:ला वैचारिक पातळीवर नेहमी अपडेट ठेवत होते. त्यांना वाचनाचा प्रचंड व्यासंग होता. सतत माणसांच्यात, कार्यकर्त्यांच्यात वावरणारा, आंदोलनात जाणारा माणूस केव्हा वाचत असेल? पण ते वाचत होते. इ.पी.डब्ल्यू. चा प्रत्येक अंक वाचून त्यात त्यांनी खुणा केलेल्या होत्या. अर्थशास्त्रातलं सगळं अपडेट लेखन त्यांनी वाचलेलं होतं, म्हणूनच थॉमस पिकेटीचं कॅपिटल आणि मार्क्सचं कॅपिटल याच्यावर ते अस्खलितपणे बोलू शकत होते. वाचनाच्या माध्यमातून स्वत:ला सतत अपडेट करण्याची सुप्त प्रेरणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होती.

आपण सगळ्यांनीच मात्र त्यांना राजकारण आणि समाजकारण एवढ्याच चौकटीत नेहमी अडकवून ठेवलं. त्यांच्यातल्या साहित्याकाकडे फारसं डोळसपणे आपण बघितलंच नाही. ज्यावेळेला निपाणी येथे झालेल्या दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून एन.डीं. ना बोलण्याचा प्रसंग आला, त्यावेळचं त्यांचं अध्यक्षीय भाषण जर वाचलं, तर लक्षात येईल की साहित्याकडे हा माणूस कशा पद्धतीने पाहातो. माणगावला झालेल्या विचारवेध संमेलनात एका माणगावी कवीनं आईवरंची अतिशय सुंदर भावगर्भ कविता सादर केली. ती ऐकताच एन.डीं.च्या डोळ्यांत पाणी आलं. त्यांनी ती कविता त्याला पुन्हा म्हणायला सांगितली. आई नावाचं रसायन काय आहे? हे त्या कवीनं तंतोतंत उलगडण्याचा प्रयत्न केला होता आणि एन.डीं. ना ते भावलं होतं.

साहित्य, कला किंवा संस्कृती याची निकोप वाढ होण्यासाठी सुद्धा जो अवकाश समाजामध्ये असायला पाहिजे त्यासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांना सुद्धा बळ पुरवण्याचं काम एन.डीं. नी केलं आहे. अंनिसची, आंबेडकर अकादमीची किंवा समाजप्रबोधनीची चळचळ असेल, विद्यार्थी चळवळी किंवा विद्रोही संमेलनं असतील यापैकी कुठल्याही चळचळीला एन.डीं. चा आधार नाही असं झालं नाही. महाराष्ट्रामध्ये हा एकच आधार असा होता की, ज्याने न्याय्य मागण्या करणाऱ्या लोकांच्या अवकाशाला वाव दिला. जनसामान्यांशी बांधिलकी असल्यामुळं ते शिक्षणक्षेत्रामध्ये दीर्घकाळ राहिले. तरीसुद्धा ते शिक्षणसम्राट झाले नाहीत, सहकार क्षेत्रात राहिले. मात्र सहकार सम्राट झाले नाहीत, सत्तेमध्ये राहिले तरीही खुर्ची सम्राट झाले नाहीत. सतत लोकांच्यामध्ये असणं हा त्यांचा स्वभावधर्म होता. एन.डीं.चं वर्णन एका वाक्यात मी असं करेन की, 'कर्मवीरांनी जी शैक्षणिक क्रांती केली आणि ग्रामीण महाराष्ट्राच्या लोकशाहीकरणाचा जो सर्वात मोठा प्रकल्प राबवला, त्या प्रकल्पातनं निर्माण झालेल्या राजकारणाची जी महत्त्वाची पिढी होती, त्या पिढीतले एन.डी. पाटील हे 'कर्मवीरांच्या शेतकरी क्रांतीला आलेलं फळ होतं' यापेक्षा एन.डीं. चं वेगळं वर्णन करणं अवघड आहे.

●



# भाई एन.डी. पाटीलः एक लढाऊ सत्यशोधक मार्क्सवादी

डॉ.भारत पाटणकर

“ ”

माझ्या जन्माच्या आधीपासून,१९४०–४२ सालापासून, आमचं घर म्हणजे कार्यकर्ते राहाण्याची, बैठका आणि शिबिरं होण्याची जागा. मला आठवत असण्याच्या काळापासून एनडी आमच्या वरचेवर येणाऱ्या कार्यकर्त्यांपैकी एक प्रमुख कार्यकर्ते, नेते राहिले आहेत. घरी नेहमी येणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये प्रामुख्याने जरी समाजवादी पक्ष, भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि नंतर त्यातूनच वेगळा झालेला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष यांचे प्रमाण जास्त होते, तरी शेतकरी कामगार पक्षाचे एन.डी. पाटील, या प्रमुख माणसांमध्ये होते. ते मला सगळ्यांपेक्षा वेगळे जाणवायचे. मार्क्सवादाबरोबरच महात्मा फुले आणि राजर्षी शाहू यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर स्पष्टपणे होता. मी हायस्कूलमध्ये शिकत असताना आणि कॉलेजमध्ये गेल्यावरसुद्धा ज्या विधानसभा निवडणुका झाल्या, त्यामध्ये मी एन.डी.यांचा छोटा प्रचारक म्हणून काम केले आहे. वाळवे तालुक्यात ते निवडणूक लढवीत असत. पण तिथल्या विशिष्ट परिस्थितीत ते कधी निवडून आले नाहीत. तरीही ते महाराष्ट्रातील चळवळींबरोबरच तालुक्यातील पुरोगामी चळवळीचा बुलंद आवाज राहिले. माझे वडील क्रांतिवीर बाबुजी पाटणकर यांच्या हौतात्म्यानंतर माझी आई क्रांतिवीरांगना इंदुमती पाटणकर धाडसाने पुन्हा चळवळीत सहभागी होऊ लागली. आईला या काळात सहकार्य करणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये, एन.डी. पाटील हे एक महत्त्वाचे कार्यकर्ते होते. अगदी अंथरुणाला खिळून राहाण्याची अवस्था येइपर्यंत सुख–दुःखाच्या सर्व प्रसंगांच्या प्रसंगी ते कासेगावी येत राहिले. आमच्या चळवळीच्या कुटुंबाचा ते भाग होते. महाराष्ट्रात अशी अनेक 'चळवळीची कुटुंबे' होती आणि आहेत की ज्यांचे ते घटक होते. आता अशी कुटुंबेसुद्धा दुर्मिळ उरली आहेत. आख्खं कुटुंबच चळवळीचं असण्याची परंपरा आता संपत चालली आहे!

एन. डी. एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. समाज परिवर्तनाच्या सर्व क्षेत्रात सहजतेने विहार करण्याची आवड आणि कुवत त्यांच्यामध्ये होती. तशी त्यांची क्षमतासुद्धा होती. शिक्षण क्षेत्र, राजकीय क्षेत्र, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्र, जन आंदोलनांचे क्षेत्र अशा सर्व क्षेत्रांत ते ताकदीने योगदान करत राहिले. असे सर्वांगीण योगदान करणारे कार्यकर्ते इतिहासात आणि आजही फार दुर्मिळ आहेत. सेझच्या धोरणांतर्गत हजारोंच्या संख्येने कष्टकरी, शेतकरी जनतेच्या जमिनी भांडवलदारांच्या घशात घालण्याच्या सरकारी धोरणाविरोधात रायगड जिल्ह्यातील जनतेच्या संघर्षाचे नेतृत्व त्यांनी केले. यासंदर्भात सार्वमत घ्यायला भाग पाडणारी ही चळवळ ठरली. मतदानात जनतेने विजय मिळवला! हे देशातील एकमेव उदाहरण ठरले! खरे म्हणजे चळवळीचा हा पॅटर्न सार्वत्रिक होणे आजही अत्यावश्यक आहे. ही एक, १९४२ त्या प्रतिसरकार सारखी 'प्रतिलोकशाही' मतदान पद्धतच आहे. याचा सैद्धांतिक पातळीवर गंभीर विचार होणे गरजेचे आहे. एन्रॉन कंपनीच्या, समुद्र किनाऱ्यावर होणाऱ्या वीजनिर्मिती प्रकल्पाला, रोखण्यासाठीसुद्धा जी चळवळ झाली त्यात एन.डीं.चे मोठे योगदान होते. त्याचप्रमाणे शेतीसाठी पाणी उपसणाऱ्या पंपाच्या वीजदराबाबत झालेला संघर्ष, कोल्हापूर शहराशी संबंधित टोल नाका बंद करण्याचा संघर्ष याही चळवळींमध्ये त्यांनी योगदान केले. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, सीमाप्रश्न, दाभोलकर–पानसरे यांचे खून पाडणाऱ्या धर्मांध जातीयवादी शक्तींचा पराभव करणारी चळवळ यामध्ये महत्त्वाचा वाटा उचलला. या सर्व चळवळींमध्ये त्यांनी पायाला

भिंगरी लावून काम केले.

महाराष्ट्र राज्य जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच नवे पाणी दर ठरविण्याची प्रक्रिया सुरू झाली. कष्टकरी, शेतकऱ्यांना माहीतही न होता दर ठरविण्याचा घाट घातला जात होता त्यावेळी आमच्या आग्रहाला मान देऊन ते या संदर्भात आकार घेत असलेल्या चळवळीत पुढाकाराने सहभागी झाले. यासाठी स्थापन झालेल्या पाणीधोरण संघर्ष मंचच्या नेतृत्वाखाली सुरू होणाऱ्या चळवळीचे ते निमंत्रक झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली सहनिमंत्रक म्हणून कार्य करण्याचा मान मला मिळाला. पाणीदराचा प्रस्ताव, शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया मागवण्यासाठी, प्राधिकरणाने, टाइम्स ऑफ इंडिया या इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध केला! प्राधिकरणाला असा शोध लागला होता की, सर्व शेतकऱ्यांना इंग्रजी समजते! या पार्श्वभूमीवर पाणीधोरण संघर्ष मंचने आंदोलन सुरू केले. महाराष्ट्रातील सर्व पाटबंधारे मंडळांच्या कार्यक्षेत्रात सुनावणीसाठी मेळावे घ्यावेत, असा निर्णय प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना घ्यावा लागला! महाराष्ट्रभर रान उठले आणि इतिहासात पहिल्यांदाच लोकशाही मार्गाने आणि जनतेच्या सहभागातून राज्यपातळीवरील निर्णयप्रक्रिया घडवण्यात जन चळवळीने यश मिळवले. यानंतर एकंदर पाणीधोरणाला जनताभिमुख बनवण्यासाठी मंचाने सातत्याने कार्य केले. जनतेचे पाणी भाडवलदारांना खिरापत म्हणून वाटण्याच्या धोरणाला बदलणारे बेमुदत ठिय्या आंदोलन मंचाच्या वतीने आझाद मैदानावर केले. त्याचा विधानसभा अधिवेशनावर दबाव आला आणि सरकारला धोरण बदलावे लागले. एन.डी. गेल्यानंतर आजही मंचाचा प्राधिकरणाचे धोरण ठरवण्यातला सहभाग चालू आहे आणि तो चालू राहाणार आहे. हा लढा लांब पल्ल्याच्या पाणीधोरणाचा निर्णय घेणारा होता. शोषणमुक्त समाजाच्या बांधणीसाठी आवश्यक भूमी तयार करणारा होता म्हणून तो ऐतिहासिक होता. एन.डीं.च्या जीवनातील एक मैलाचा दगड ठरलेल्या लढ्यांपैकी होता.

१९८४ सालापासूनच समन्यायी पाणी वाटपाच्या मुद्यावर सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यात आम्ही चळवळ सुरू केली होती. ताकारी योजना समान पाणी वाटप कृतिसमितीची स्थापना करून ही चळवळ चालू झाली होती. या चळवळीच्या पहिल्या परिषदेला डॉ.बाबा आढाव, भाई दि.बा. पाटील, भाई गणपतराव देशमुख यांना निमंत्रित केल्याप्रमाणे ते सहभागी झाले होते. या संदर्भात आम्ही केलेल्या अभ्यासाची चर्चा एन.डीं.बरोबर झाली होती. नंतरच्या काळात राज्यात आलेल्या आघाडी सरकारच्या काळात, सरकारचा किमान समान कार्यक्रम लिहिण्याची जबाबदारी एन.डीं.वर होती. त्यांचा मसुदा सरकारने मंजूर करून प्रसिद्ध केला. या पुस्तिकेत पहिला धोरणात्मक मुद्दा पाण्याच्या समन्यायी वाटप धोरणाचा होता. पाण्याचे समान वाटप या मुद्यावर लिहिले आहे, राज्यातील जेमतेम १५टक्के एवढेच क्षेत्र बागायती असून, उरलेले ८५टक्के क्षेत्र आजही निसर्गाच्या लहरीवरच अवलंबून आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्यातील उपलब्ध पाण्याचे लोकसंख्येच्या प्रमाणात समान वाटप केले जाईल. ही गोष्टच ऐतिहासिक होती. आमच्या पाणी चळवळीच्या धोरणाचा समावेश एन.डीं.च्या आग्रहाने एका सरकारच्या कार्यक्रमात झाला होता!! अर्थातच, नंतर आमची चळवळ तेरा दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये पसरली. संघर्षाची अनेक वर्षे गेली. २००५साली आघाडी सरकारला समन्यायी पाणीवाटपाच्या पायावर फेर आखणी करणारे पथदर्शक प्रकल्प; आटपाडी, तासगाव आणि सांगोला तालुक्यांसाठी मंजूर करावे लागले. आटपाडी तालुक्यातील आखणी प्रत्यक्षात राबवण्याचे, सार्वत्रिक बंद पाईप पद्धतीने पाणी वितरण करण्यासह सर्व काम ८०टक्के पूर्ण होत आले आहे आणि सांगोला व तासगाव तालुक्यांतील फेर आखणी पूर्ण होत आली आहे. या पॅटर्नला महाराष्ट्रभरात सार्वत्रिक करण्यासाठी सकारात्मक चर्चा सरकारबरोबर चालू आहे. एन.डीं.नी जनतेच्या ज्या स्वप्नाला सार्वत्रिक करण्यासाठी सरकारच्या धोरणाच्या पातळीवर जे पहिले पाऊल टाकले ते आता प्रत्यक्षात येण्याच्या उंबरठ्यावर आहे. फक्त, ते आपल्यात असताना हे घडू शकले नाही, याची साहाजिकच मोठी खंत राहाणार आहे.

एका कष्टकरी, शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या या कार्यकर्त्या-नेत्याने स्वतःची कामगार, शेतकरी, दलित, शोषित स्त्री-पुरुष जनतेत असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही. त्यामुळेच कार्यकर्तेपणा कायम राखूनच ते नेते झाले. चळवळीची कुटुंबे जतन करणे आणि तयार करण्यासाठी प्रयत्न करीत राहाणे हा जीवन व्यवहार त्यांनी अखेरपर्यंत कायम ठेवला. म्हणूनच आम्ही एकाच कुटुंबातील असण्याच्या स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झालेल्या परंपरेला जिवंत राखू शकलो. तत्त्वांच्या पातळीवरील तडजोडी न करण्याचा आजकाल दुर्मिळ होत चाललेला काटेकोर व्यवहारसुद्धा त्यांनी निष्ठेने आचरणात आणला. असे एन.डी. गेले पण काळजात कायम राहिले---माझ्या, तुमच्या, जनतेच्या. त्यांना क्रांतिकारी सलाम.

●

# दुष्काळग्रस्तांचा १९ ऑक्टोबर १९७२ मोर्चा

प्राचार्य विश्वास सायनाकर
९८९०९१७३२७

“शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्यासाठी शहीद झालेल्यांबद्दल भाई एन.डी.पाटील म्हणतात, एक वेळ नद्यानाले आटतील, सागरही सुकतील; पण शहिदांच्या रक्ताचे ओघळ कधीही सुकणार नाहीत. चार हुतात्म्यांपैकी रंगराव बाळा गायकवाड आणि दिलीप निलाखे यांची आर्थिक परिस्थिति बिकट होती. त्यामुळे भाई एन.डी.पाटील यांनी स्वतःच्या पैशातून काही रक्कम त्यांना हुतात्मा पेन्शन म्हणून द्यायला सुरुवात केली. दिलीप निलाखेच्या निधनानंतर काही काळ ही पेन्शन त्यांच्या आईला दिली जात असे. त्यांनी स्वतःच्या तोकड्या उत्पन्नातून सत्तेचाळीस हजार रुपये यासाठी खर्च केले. त्यांच्या सहकाऱ्यांना हे समजल्यानंतर प्रा.एन.डी.पाटील यांनी पुढाकार घेऊन हुतात्मा निधी सहकाऱ्यांकडून गोळा केला. आज या निधीच्या व्याजातून श्रीमती कमल गायकवाड यांना वर्षाला चोवीस हजार रुपये पेन्शन रूपात दिले जातात.”

१९ ऑक्टोबरच्या भरदुपारी वीस हजारांहूनही अधिक कष्टकरी, शेतकरी यांचा मोर्चा हातात लालबावटा, ज्वारीच्या ताटांना बांधलेले भुईमुगाचे वेल घेऊन शांततेने इस्लामपूरच्या मामलेदार कचेरीकडे वाटचाल करत होता. उगवलेली कोवळी रोपे कोमेजून गेली. एस.टी. स्टँडवरून निघालेला हा मोर्चा तालुक्यातल्या विविध गावांतून आलेल्या दुष्काळग्रस्तांचा होता.

चिमणीलाही प्यायला पाणी नाही, असा हा भयाण दुष्काळ. हाताला काम नाही, पोटात अन्न नाही आणि प्यायला पाणी नाही ही गोरगरिबांची अवस्था. अशा दुष्काळात शेतकरी, कष्टकरी दिवस कंठत होते. खरे तर वाळवा पंचायत समितीने एकमताने ठराव करून दुष्काळी कामे सुरू करावीत, असा ठराव संमत केला होता आणि महाराष्ट्र सरकारला पाठवला होता. पण सरकार, अधिकारी, सत्ताधारी पक्षाचे नेते यांचे अक्षम्य दुर्लक्ष चालू होते.

गावोगावी जाऊन सभा, बैठका घेऊन, जनजागरण करून भाई एन.डी. पाटील यांनी हा मोर्चा संघटित केला होता. या मोर्चाच्या ठळक मागण्यांपैकी पहिली मागणी होती, गावोगावी हाताला काम मिळावे म्हणून दुष्काळी कामे गावोगावी चालू करा. त्याचप्रमाणे रेशन दुकानातून धान्य द्या, काम करण्यासाठी औजारे द्या, जनावरांना जगण्यासाठी चारा तगाई द्या, गावोगावी आणि दुष्काळी कामावर पाण्याचे टँकर सुरू करा. स्त्री-पुरुष मजुरांना समान वेतन द्या, अशा एकूण तेरा मागण्या होत्या. मोर्चा दुपारी बारा वाजण्याच्या दरम्यान मामलेदार कचेरीवर धडकाला पोलिसांच्या मदतीला राखीव पोलीस दलाची मदत होती. कचेरीपासून काही अंतरावर बंदी रेषा आखली होती आणि त्या रेषेवर पोलीस सुसज्ज उभे होते. पोलिसांनी हा मोर्चा अडवला. मोर्चाच्या आघाडीला भाई एन.डी. पाटील, शिगावचे भाई रंगराव दादा पाटील, भाई विठ्ठलराव बारवडे, वाळव्याचे भाई शिवाजीराव माने इत्यादी कार्यकर्ते मोर्चाची आघाडी सांभाळत होते. भाई एन.डी.सरांनी सरकारी अधिकाऱ्यांना विनंती केली की, मोर्चा शांततेने आला आहे. मोर्चेकऱ्यांना कचेरीच्या गेटपर्यंत येऊ द्या. तेथे आम्ही सभा घेऊ, मामलेदारना मागण्यांचे निवेदन देऊ आणि घोषणा दिल्यानंतर शांतपणे मोर्चाचे विसर्जन होईल. पण प्रांत आणि पोलीस अधिकारी यांनी ही मागणी धुडकावून लावली.

त्यामुळे भाई एन.डी.पाटील यांनी विनंती केल्यानंतर मोर्चातील दुष्काळग्रस्त भरउन्हात डांबरी रस्त्यावर बसले. स्त्रिया एका झाडाच्या सावलीत बसल्या. भाई एन.डी.पाटील हातात माईक घेऊन एका गाड्यावर उभे राहून शेतकऱ्यांच्या मागण्या मांडू लागले. पण कोणतीही पूर्वसूचना न देता राखीव पोलीस दलातील शिपायांनी अमानुष लाठीमार चालू केला. एन.डी. सरांवर अनेक पोलीस चालून आले आणि त्यांना लाठ्यांनी झोडपू लागले. यातला एक तडाखा त्यांच्या माईक असलेल्या हातावर बसला आणि हातातील माईक गळून पडला. लाठ्यांचे वार त्यांच्या पाठीवर बसतच होते. त्यांच्या मानेपासून पायापर्यंत लाठ्यांचे सदुसष्ट वार बसले होते. त्या अवस्थेत ते गाड्यावर कोसळले. त्यांना इस्लामपूर पोलीस स्टेशनच्या आवारात नेले आणि पोलीस कोठडीत बंद केले. अत्यंत गलिच्छ असणाऱ्या या कस्टडीत बसायला साधे पटकरही नव्हते.

इकडे लाठीमारापाठोपाठ अश्रुधुरांची नळकांडी फोडली गेली आणि पाठोपाठ कोणतीही सूचना न देता पोलिसांनी मोर्चेकऱ्यांवर गोळीबाराच्या फैरी झाडायला सुरुवात केली. हे

सगळे आवाज भाई एन.डी.सरांच्या कानावर येत होते. ते पोलीस अधिकाऱ्यांना विनवणी करत होते, 'लाठीमार, गोळीबार थांबवा, मला थोड्या वेळासाठी बाहेर सोडा, मी मोर्चेकऱ्यांना शांत करतो आणि ते शांतपणे आपआपल्या गावी जातील.' पण त्यांची विनंती कोणीही जुमानली नाही.

थोड्या वेळाने त्यांना कोठडीत सांगण्यात आले की, गोळीबारात त्यांचा पुतण्या सुरेश शंकरराव पाटील, भाई रंगराव दादांचा चिरंजीव राजेंद्रकुमार पाटील, जक्राईवाडीचे रंगराव बाळा गायकवाड आणि इस्लामपूरमधील दिलिप निलाखे या चौघांचे निधन झाले. गायकवाड सोडले तर इतर तिन्ही मुले सोळा वर्षांच्या आतील होती. संध्याकाळी उशिरा सरांची सुटका झाली. त्यांच्या दुःखाला सीमा नव्हती. पोटाला भाकरी आणि हाताला काम मागायला आलेल्या दुष्काळग्रस्तांना लाठीमार आणि गोळीबार यांना सामोरे जावे लागले, रक्त सांडावे लागले.

सरांच्या अटकेची प्रत्यक्ष वेळ आणि पोलिसांनी रजिस्टरमध्ये नोंदवलेली वेळ यात दोन तासांचे अंतर होते. कारण पोलिसांना हे सिद्ध करायचे होते की, दगडफेकीच्या, हिंसाचाराच्या, दंगलीच्या मागचे भाई एन.डी.पाटील हेच सूत्रधार होते.

या मोर्चाच्या मागण्यांचा योग्यपणा, लाठीमार, अश्रूधूर, गोळीबार यांच्याबद्दल चौकशी करण्यासाठी सरकारतर्फे पाटकर आयोग नेमला गेला. मोर्चेकरी आणि एन.डी.सरांच्यावतीने त्यांची बाजू मांडण्याचे काम सातारचे सुप्रसिद्ध फौजदारी खटल्यांचे वकील ॲड.व्ही.एन.पाटील आणि अन्य काही वकील पार पाडत होते. काँग्रेस पक्षाने सरकार पक्षाच्या समर्थनासाठी शंभर साक्षीदारांची फौज उभी केली होती. त्यातील एका वकिलांनी खोटी साक्ष दिली. तेव्हा उलट तपास करताना भाई एन.डी. सरांनी इस्लामपूरच्या कोर्टाचा रोजनामा सादर केला. त्यातून हे सिद्ध झाले की, मोर्चाच्या वेळी हजर होतो म्हणणारे हे वकील त्याचवेळी कोर्टासमोर आपल्या अशिलाची बाजू मांडत होते. आयोगाने त्यांना विचारणा केली की, त्यांच्या खोट्या साक्षीबद्दल त्यांची वकिलांची सनद रद्द का करू नये. त्यामुळे अन्य साक्षीदार मागे घेतले गेले.

पाटकर आयोगाने निर्णय दिला की, मोर्चातील एकूण तेरा मागण्यांपैकी दहा  मागण्या योग्य होत्या. एन.डी.सरांनी सादर केलेल्या मोर्चाबरोबर असलेल्या पोलीस वायरलेस व्हॅनने वेळोवेळी पाठविलेल्या संदेशावरून हे सिद्ध होत होते की, मोर्चा शेवटपर्यत शांतपणे चाललेला होता. पाटकर आयोगाने सरकारला आणि सरकारी यंत्रणांना दोषी ठरविले.

ॲड.व्ही.एन.पाटील यांनी एन.डी.सरांना सांगितले, 'तुम्ही बंदीरेषा ओलांडली हे कबूल करू नका, नाहीतर तुमची सुटका अशक्य ठरेल.' भाई एन.डी.पाटील म्हणाले, 'हजारो लोकांच्या डोळ्यांदेखत मी बंदीरेषा ओलांडलेली होती. त्यामुळे एन.डी.पाटील कातडी बचावण्यासाठी खोटे बोलतात असा संदेश समाजात जाणे मला मान्य होणार नाही, भले परिणाम काहीही होवोत. मी सत्य तेच सांगणार.' संतापलेल्या व्ही.एन.पाटलांनी खटल्याची कागदपत्रे टेबलावर आपटली आणि संतापाने साताऱ्याला निघून गेले. भाई एन.डी.पाटील सत्य सांगण्याच्या आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. शेवटी ॲड.व्ही.एन.पाटील परत आले आणि ही केस शेवटपर्यंत चालवत राहिले. पण या प्रसंगातून परिणाम काहीही होवोत सत्य तेच बोलणार हा भाई एन.डी.सरांचा बाणा समोर आला.

हा महाराष्ट्रातला एकमेव मोर्चा की जो आयोगाने सर्वार्थाने योग्य ठरवला. त्याचे एकमेव कारण भाई प्रा. एन. डी. पाटील. कारण वायरलेस व्हॅनच्या नोंदी, सरकारी अधिकाऱ्यांनी दुष्काळी कामे चालू न करण्याबद्दल वेळोवेळी दिलेली कारणे, शेतमजूरांचे मस्टर या सर्वांच्या साहाय्याने त्यांनी सरकार पक्षाचे पितळ उघडे पाडले होते.

त्याचबरोबर एन.डी.सरांच्या अटकेची वेळ पोलीस रजिस्टरमध्ये कोणाच्या तरी राजकीय दबावाखाली त्यांना आरोपी सिद्ध करण्यासाठी खोटी नोंदविण्यात आली होती. हा आरोप सांगली जिल्ह्याचे डी.एस.पी वेंकटचलम आणि इस्लामपूर पोलीस ठाण्याचे इन्स्पेक्टर मोरे यांच्यावर सिद्ध झाला. विधान परिषदेचे सदस्य असणाऱ्या एन.डी.सरांच्या संदर्भातील आरोपांची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या आमदार आप्पासाहेब जाधव अध्यक्ष असणाऱ्या तीन सदस्यांच्या चौकशी कमिटीने एन.डी.सरांचे निर्दोषत्व सिद्ध करणारा निर्णय दिला. हेतूपुरस्सर हे केल्याचे सिद्ध झाले. अशा प्रकरणात ही समिती कठोरात कठोर शिक्षा देऊ शकते.

ही शिक्षा होती श्री. वेंकटचलम आणि श्री. मोरे यांना बडतर्फ करणे आणि या बडतर्फीचा अर्थ असा की, त्यांना रिटायरमेंटनंतर मिळणारी ग्रॅज्युएटी, पेंशन रद्द होणे. या दोघाही पोलीस अधिकाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना रस्त्यांवर यावे लागले असते. यातून केवळ भाई एन.डी.पाटीलच त्यांना वाचवू शकत होते. शेवटी त्यांच्या कुटुंबीयांचा विचार करून त्यांचा स्वतःचा आणि मोर्चेकऱ्यांचा घोर अपमान आणि अत्याचार करणाऱ्या या दोघांना भाई एन.डी.पाटील यांनी क्षमा केली आणि त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या या शिक्षेतून आणि सात दिवसांच्या पोलीस कोठडीतून वाचविले.

६ सप्टेंबर १९७१ रोजी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने बार्शी तालुक्यातील वैराग येथे असाच मोर्चा आयोजित केला होता. त्याचे नेतृत्व श्री. निंबाळकर यांनी केले होते. तेथे झालेल्या गोळीबारात आठ हुतात्मे झाले होते. पण कमिशन समोर योग्य बाजू मांडता न आल्यामुळे सरकारी कमिशनने मोर्चाचे नेतृत्व आणि मोर्चेकऱ्यांवर ठपका ठेवला होता. हा

मोर्चा जसा विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी झाला तसाच आणखी एक मोर्चा नागपूर येथे झाला होता. या मोर्चावरही गोळीबार झाला. या गोळीबारात सात हुतात्मे झाले. या पंधरा दुष्काळग्रस्तांचे बळी महाराष्ट्र सरकारने घेतले होते.

लाठीमार, गोळीबार त्यातून झालेला रक्तपात आणि झालेले हुतात्म यामुळे दुष्काळग्रस्त किंवा भाई एन.डी.पाटील कोणीच दबलेले नव्हते. दबण्याची वेळ सरकारवर आली होती. हुतात्म्यांच्या दहाव्या दिवशी पहिल्यापेक्षा विराट मोर्चा पुन्हा इस्लामपूरच्या मामलेदार कचेरीवर धडकला. या वेळी सरकारच दबले होते. ना बॅरिकेटस, ना बंदीरेषा, ना पोलीस दल, ना राखीव पोलीस दल या मोर्चाचे नेते भाई एन.डी.पाटील होते. कचेरीतील लोक निमूटपणे गेट बंद करून आपली कामे करीत बसले होते.

शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्यासाठी शहीद झालेल्यांबद्दल भाई एन.डी.पाटील म्हणतात, एक वेळ नद्यानाले आटतील, सागरही सुकतील; पण शहिदांच्या रक्ताचे ओघळ कधीही सुकणार नाहीत. चार हुतात्म्यांपैकी रंगराव बाळा गायकवाड आणि दिलीप निलाखे यांची आर्थिक परिस्थिती बिकट होती. त्यामुळे भाई एन.डी.पाटील यांनी स्वतःच्या पैशातून काही रक्कम त्यांना हुतात्मा पेन्शन म्हणून द्यायला सुरुवात केली. दिलीप निलाखेच्या निधनानंतर काही काळ ही पेन्शन त्यांच्या आईला दिली जात असे. त्यांनी स्वतःच्या तोकड्या उत्पन्नातून सत्तेचाळीस हजार रुपये यासाठी खर्च केले. त्यांच्या सहकाऱ्यांना हे समजल्यानंतर प्रा.एन.डी.पाटील यांनी पुढाकार घेऊन हुतात्मा निधी सहकाऱ्यांकडून गोळा केला. आज या निधीच्या व्याजातून श्रीमती कमल गायकवाड यांना वर्षाला चोवीस हजार रुपये पेन्शन रूपात दिले जातात. १९ ऑक्टोबरला होणाऱ्या हुतात्मा दिनादिवशी ही रक्कम सन्मानाने त्यांना सुपुर्द केली जाते. हुतात्मा दिनादिवशी सर्व कार्यकर्ते यथाशक्ती या निधीत भर घालत असतात. तीन वर्षांपूर्वी आणखी एक विलक्षण घटना घडली. ताकारीच्या गुरू रविंद्रनाथ टागोर शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम.ए.पाटील (आप्पा) यांनी या निधीसाठी कर्तव्यबुध्दिने एक लाख रुपयाची भरघोस देणगी दिली होती. सर्व कार्यकर्ते हुतात्मादिनी इस्लामपूर येथे हुतात्म्यांना अभिवादन करतात. हयात असताना भाई. एन.डी.पाटील यांनी हा कार्यक्रम कधीही चुकविला नाही.

●



# सार्वजनिक जीवनातील बाप हरपला

अविनाश पाटील
८९७५१३०६०९

"शोषणमुक्त आणि समतेवर आधरित समाजाची निर्मिती हे एन. डी. सरांचे स्वप्न होते. त्यासाठी ते स्वातंत्र्यलढ्यापासून ते अगदी आजतागायत प्रत्येक लढ्यात सहभागी झाले. गिरणी कामगारांचा लढा, गोवा मुक्ती संघर्ष, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, एक गाव एक पाणवठा, भूमिहीनांसाठीचा संघर्ष, शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावा म्हणून केलेले लढे, कापूस एकाधिकार योजना, महागाई आणि उपासमारविरोधी आंदोलन, बहुजनांच्या शिक्षणाला ग्रासणाऱ्या श्वेतपत्रिकेविरोधातील लढा, धरणग्रस्तांचे-विस्थापितांचे आंदोलन, मराठवाडा नामांतर आंदोलन, एन्रॉन हटाव आंदोलन, हमीभावासाठी शेगाव ते नागपूर विधानसभेवर पायी चालत काढलेली दिंडी, महाराष्ट्र राज्य वीज संघर्ष समितीचे आंदोलन, भूविकास बँकेच्या गैरकारभाराविरोधाचे आंदोलन, अन्याय्य कपाती करणाऱ्या साखर कारखानदाराविरोधातील आंदोलन, जागतिकीकरणाविरोधात केलेले सेझविरोधी लढ्यासारखे विविध संघर्ष, अगदी अलीकडे कोल्हापुरातील टोलच्या विरोधात कॉ. गोविंद पानसरेंच्या साथीने केलेले आंदोलन, असे अनेक लढे एन. डी. सरांनी लढवले आहेत. हे संघर्षच खरे तर एन. डी. सरांच्या व्यक्तित्वाची खरी ओळख आहे."

भाई एन. डी. पाटील सर हे महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीचे खंदे पाठीराखे आणि वडीलधारे मार्गदर्शक होते. एन. डी. सरांच्या निधनाने सार्वजनिक जीवनातील आमचा बाप हरपल्याची भावना निर्माण झाली आहे. एन. डी. सर हे अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संघटित कामाशी समितीच्या स्थापनेपासून जोडलेले आहेत. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे एन. डी. सर हे आजअखेर संस्थापक अध्यक्ष होते. दाभोलकरांना संघटना म्हणून काम करण्यासाठी आवश्यक ते पाठबळ आणि मार्गदर्शन त्यांनी दिले होते. कार्यकर्ता ते महाराष्ट्र अंनिसचा कार्याध्यक्ष या सर्व वाटचालीत सरांचे मला मार्गदर्शन मिळत राहिले आहे. संसदीय लोकशाहीमध्ये सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आणि कायदा, धोरण निर्माण करण्यासाठी कसे काम करावे याची शिकवण त्यांच्याकडूनच मला मिळाली. डॉ.दाभोलकर जादूटोणाविरोधी कायद्यासाठी पाठपुरावा करत असताना आणि सामाजिक बहिष्कारविरोधी कायद्यासाठी मी धावपळ करत असताना आम्हाला एन. डी. सरांचे अत्यंत मोलाचे कृतिशील मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे महाराष्ट्र अंनिसच्या सततच्या मागणीमुळे महाराष्ट्रात हे दोन्ही क्रांतिकारक कायदे संमत झाले.

शिक्षणाशिवाय पर्याय नाही. गोर-गरीब, दुर्बल घटकातल्या कुठल्याही जाती-जमातीच्या मुला-मुलींना मोफत शिक्षण द्यावं, विचार व संस्कार द्यावेत हा कर्मवीर भाऊराव पाटलांचा रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून आदर्श निर्माण केला. त्यासाठी प्रा. एन. डी. पाटील यांनी निष्ठापूर्वक योगदान दिलं. शेतकरी व शेतमजूर पाण्याशिवाय शेती नाही. फळप्रक्रिया, अन्नप्रक्रिया याशिवाय पर्याय नाही म्हणून शासन कुठलंही असलं, तरी या पद्धतीचा विचार आमदार व मंत्री असताना विधिमंडळात व त्याबाहेर अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीनं त्यांनी आयुष्यभर मांडला. शेतकरी कामगार पक्ष व त्या पक्षाच्या जाती-धर्मातीत अतिशय पुरोगामी विचारानं व लढाऊ बाण्यानं महात्मा जोतिबा फुले यांच्या सर्वंकष विचाराचा वसा घेऊन सर आयुष्यभर निष्ठापूर्वक काम करीत राहिले.

माझ्या जडणघडणीत त्यांच्या जीवननिष्ठा, विचारनिष्ठा या मला खूप काही देऊन गेल्या. १९८० च्या जळगाव ते नागपूर शेतकरी दिंडीमध्ये देशातले अनेक पक्षांचे महत्त्वाचे नेते श्री. शरदचंद्र पवार साहेब यांनी जोडले होते. ही ऐतिहासिक शेतकरी दिंडी अनेक अर्थांनी यशस्वी करण्यामध्ये जे काही पाच-पंचवीस लोक होते त्यात एन. डी. पाटील साहेब अग्रणी होते. ६ डिसेंबर १९८० दिंडीच्या सुरुवातीच्या आदल्या दिवशी दिवसभर संपूर्ण दिंडीचं आरेखन, देशभरचे वक्ते व शेतमालाच्या संबंधीतले महत्त्वाचे प्रश्न या त्यांनी आणि सहकाऱ्यांनी दिवसभर १४ तास बसून पक्के केले. पहिली सभा कविवर्य ना.धों. महानोर यांच्या पळसखेडमध्येच झाली आणि जवळपास २ लाख लोकं सभेला अमरावतीमध्ये होते. त्यामुळे राज्यातील व देशातील राज्यकर्ते हादरले व पोहोरा बंदीच्या जंगलात दिंडीला यशवंतराव चव्हाण, शरदराव पवार, राजाराम बापू पाटील, गणपतराव देशमुख यांसारखे मातब्बर नेते व एक

लाख लोकांना अटक करण्यात आली व भंडाऱ्याच्या मार्केट यार्डच्या जेलमध्ये टाकून देण्यात आले. अशावेळीसुद्धा निर्धाराने प्रचंड गर्जना करून शेतकऱ्यांचा आवाज व प्रश्न याची तुतारी एन. डी. पाटील व त्यांसारखे लोक तिथे मोठ्याने घुमवित राहिले. याशिवायच्या गेल्या ५० वर्षांतल्या माझ्या व्यक्तिगत जीवनातल्या कौटुंबिक व सार्वजनिक जीवनात ते माझ्यासाठी मोठे आधारवड होते. उतराई होण्यासाठी माझ्याकडे तसे काहीच नाही. एक छोटीशी गोष्ट माझ्या ३५ पुस्तकांपैकी 'गाव गरूड' हे पुस्तक मी त्यांना नम्रतापूर्वक अर्पण केलेले आहे. प्रा. एन. डी. पाटील साहेब त्यांचं जगणं, सुरुवातीचा खडतर प्रवास, शिक्षणाचा व पुरोगामी विचारांचा त्यांनी आयुष्यभर निष्ठापूर्वक प्रत्यक्षात स्वतःला झोकून दिलेला विचार, प्रचंड वाचन व अभ्यासपूर्ण बोलणं हे नव्या पिढीतल्या तरुण-तरुणींनी जर घेतलं, तर त्यांना एक नवी दिशा मिळू शकते असा मला विश्वास वाटतो.

एन. डी. म्हणजे मुक्काम पोस्ट एस. टी. असेच म्हटले जायचे. सतत भ्रमंती. त्यावेळेसही त्यांची भ्रमंती चालूच असायची. त्यांच्या आईची तक्रार असे, 'ह्यो नारायण फुडल्या दाराने येणार आणि मागल्या दारान पशार व्हणार. वर घरी आला तर ह्यो झोकांडा.' पण ही सारी भ्रमंती, आटापिटा, समर्पण एका बाजूला सर्वसामान्य गोरगरिबांसाठी, रयत शिक्षण संस्थेसाठी व्यापक अर्थाने ग्रामीण भागातील, बहुजन समाजातील शेतकऱ्यांची मुले शिकावीत, ज्ञानी, आधुनिक जगाला सामोरी जाणारी बुद्धिवादी व्हावीत यासाठी होता. तर, दुसऱ्या बाजूला शेतकरी कामगार पक्षासाठी व्यापक अर्थाने दाभाडी प्रबंधाने दिलेले मार्क्सवादी-लेनिनवादी तत्त्वज्ञान प्रत्यक्षात आणून कामगार-शेतकऱ्यांचा शोषणमुक्त आणि समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी होता. त्यामुळेच एन. डी. पाटील त्यावेळी शेतकरी कामगार पक्षाच्या कामाबरोबरच रयतच्या सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम करीत होते. या दोन्ही पातळ्यावरील त्यांचा संघर्ष जारी होताच.

'रयत'ची स्थिती जरी भक्कम असली, तरी 'शेतकरी कामगार पक्षा'ची स्थिती काही फारशी चांगली नव्हती. शेकाप अजून आहे का? अशा कुत्सित प्रश्नांना त्या पक्षाच्या नेत्यांना सामोरे जावे लागत होते. मग दाजीबा देसाई यांच्यासारख्या नेत्यांनी पुढाकार घेतला. नव्या दमाने भेटीगाठी चालू झाल्या. त्यांनी साताऱ्याला येऊन एन. डी. पाटलांची भेट घेतली. पक्ष अडचणीत असताना आपण तुलनेने स्वास्थ्याची नोकरी करण्यात काय अर्थ? असा विचार करीत पक्षाचे पूर्णवेळ काम करण्यासाठी त्यांनी प्राध्यापकाची नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला व कर्मवीर अण्णा परवानगी देणार नाहीत ही खात्री असल्याने त्यांना न सांगताच एन. डी. सरांनी मुंबईची वाट धरली आणि मुंबईत गिरणी कामगार युनियनचे सेक्रेटरी म्हणून काम सुरू केले. पण फार काळ ते रयतपासून लांब राहू शकले नाहीत. कर्मवीरांचे गंभीर आजारात निधन झाले. त्यांच्या इच्छेप्रमाणे एन.डी. सरांना संस्थेचे सभासदत्व देण्यात आले आणि तेव्हापासून आजअखेर ते रयत शिक्षण संस्था आणि शेतकरी कामगार पक्ष या दोन्हीसाठी अहोरात्र राबत आले.

शोषणमुक्त आणि समतेवर आधरित समाजाची निर्मिती हे एन. डी. सरांचे स्वप्न होते. त्यासाठी ते स्वातंत्र्यलढ्यापासून ते अगदी आजतागायत प्रत्येक लढ्यात सहभागी झाले. गिरणी कामगारांचा लढा, गोवा मुक्ती संघर्ष, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, एक गाव एक पाणवठा, भूमिहीनांसाठीचा संघर्ष, शेतीमालाला किफायतशीर भाव मिळावा म्हणून केलेले लढे, कापूस एकाधिकार योजना, महागाई आणि उपासमारविरोधी आंदोलन, बहुजनांच्या शिक्षणाला ग्रासणाऱ्या श्वेतपत्रिकेविरोधातील लढा, धरणग्रस्तांचे-विस्थापितांचे आंदोलन, मराठवाडा नामांतर आंदोलन, एन्रॉन हटाव आंदोलन, हमीभावासाठी शेगाव ते नागपूर विधानसभेवर पायी चालत काढलेली दिंडी, महाराष्ट्र राज्य वीज संघर्ष समितीचे आंदोलन, भूविकास बँकेच्या गैरकारभाराविरोधाचे आंदोलन, अन्याय्य कपाती करणाऱ्या साखर कारखानदाराविरोधातील आंदोलन, जागतिकीकरणाविरोधात केलेले सेझविरोधी लढ्यासारखे विविध संघर्ष, अगदी अलीकडे कोल्हापुरातील टोलच्या विरोधात कॉ. गोविंद पानसरेंच्या साथीने केलेले आंदोलन, असे अनेक लढे एन. डी. सरांनी लढवले आहेत. हे संघर्षच खरे तर एन. डी. सरांच्या व्यक्तित्वाची खरी ओळख आहे.

१ मे १९६० ला मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला. पण बेळगाव, निपाणी, कारवारचा प्रश्न मात्र तसाच लोंबकळत पडला. तो आजतागायत तसाच आहे. यासाठी मोर्चे निघाले, आंदोलने झाली, धरणे धरण्यात आली, सत्याग्रह झाले, न्यायालयीन लढाई अजूनही चालू आहे. त्या सर्व कार्यक्रमात आघाडीवर राहात सीमाभागातील जनतेला न्याय देण्यासाठी एन.डी. सरांनी तुरुंगवासही भोगला. तत्कालीन शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनी शिक्षणासंदर्भात काढलेल्या श्वेतपत्रिकेचे महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप उघड करण्यासाठी त्यांनी शिक्षण हे राष्ट्राने करावयाचे धर्मादाय काम नसून राष्ट्राच्या भविष्यकालीन विम्यासाठी केली जाणारी फलदायी गुंतवणूक आहे, असे सरकारला ठणकावत सभागृहाबाहेर सर्व आमदारांच्या समोर चार तास भाषण केले व ह्या श्वेतपत्रिकचे काळे अंतरंग साऱ्या आमदारांच्या समोर खुले केले. त्याआधी साऱ्या महाराष्ट्रभर या बहुजनांच्या शिक्षणाच्या मुळावर आलेल्या श्वेतपत्रिकेविरोधात त्यांनी रान उठवले होते. बॅ. पी. जी. पाटील यांच्यासह त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर ४००

सभा घेतल्या. त्यामुळे काँग्रेस पक्षाकडे विधानसभेत प्रचंड बहुमत असतानाही सरकारला संबंधित ठराव मागे घ्यावा लागला. विशेष म्हणजे त्यावेळेस एन. डी. सर कोणत्याच सभागृहाचे सभासद नव्हते. त्यानंतरही अगदी आजतागायत शिक्षणाच्या बाजारीकरणाच्या विरोधातील प्रत्येक लढ्यात एन. डी. सरांनी संघर्ष करणाऱ्यांना भक्कम साथ दिली आहे.

एन.डी. सर विधानपरिषदेत १८ वर्षे, तर विधानसभेत पाच अशी एकूण २३ वर्षे आमदार होते. तर काही काळ सहकारमंत्री होते. आपल्या राजकीय जीवनात उठता बसता शेतकऱ्याचे नाव घेणारे अनेकजण आहेत. पण आपल्या वैधानिक कारकिर्दीत एन. डी. सरांनी कापूस एकाधिकार खरेदी योजना, पाण्याचे समान वाटप, शेतमालाचा किफायतशीर हमीभाव असे शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न निकराला आणले आहेत. विधिमंडळात त्यांनी दिलेली विविध विषयांवरील अभ्यासपूर्ण भाषणे त्यांच्या विद्वतेची, व्यासंगाची आणि हजरजबाबीपणाची साक्ष आहेत.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने लढवलेल्या प्रत्येक लढ्यात मग तो शनि शिंगणापूरचा सत्याग्रह असो, जादूटोणाविरोधी कायदा होण्यासाठी केलेला संघर्ष असो अगर नरेंद्र महाराजांसारख्या भोंदू बुवाबाबाच्या विरोधातील आंदोलन असो त्यांनी व्यक्तिश: आघाडीवर राहात सहभाग घेतलेला आहे. शक्य असेल, त्यावेळेस महाराष्ट्र अंनिसच्या महाराष्ट्र कार्यकारिणीला ते उपस्थित असतच आणि कार्यकारिणीतील त्यांची उपस्थिती कार्यकर्त्यांना उत्साह, बळ देई; पण प्रत्येकवेळी त्यांचे भाषण कार्यकर्त्यांना काहीतरी नवा विचार देऊन जात असे. शहीद डॉ. दाभोलकरांच्या खुनानंतर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहून नेहमी त्यांनी बळ दिले. कोल्हापुरात प्रत्येक महिन्याच्या २० तारखेला निघणाऱ्या 'निर्भय मॉर्निंग वॉक'ला एन.डी. सर आवर्जून हजर असायचे.

महाराष्ट्रातील गेल्या ५० वर्षांतल्या छोट्या-मोठ्या डाव्या, पुरोगामी, परिवर्तनवादी जनचळवळी, सामाजिक चळवळी यांच्यासाठी एन. डी. सर एक विश्वसनीय, भक्कम आधारस्तंभ आणि मार्गदर्शक राहिले आहेत. चळवळीने त्यांना मदतीची हाक द्यावी, महाराष्ट्रातल्या कोणत्याही कोपऱ्यात एन. डी. सर हजर. मग त्यांना शक्य असेल तर सर्व करतील. ते त्या चळवळीसाठी मोर्चात येतील, धरणे धरतील, सत्याग्रह करतील, तुरुंगात जातील, मंत्रालयात बेधडक मंत्र्यांच्या दालनात शिरणार, परत त्या चळवळींना आपल्या पंखाखाली घेण्याची वृत्ती अजिबात नाही. चळवळीची स्वायत्तता, स्वतंत्र नेतृत्व आणि कार्यक्रमात्मक मुभा यांचा त्यांनी नेहमीच आदर केला आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील चळवळींची माहिती अगदी त्या चळवळीचे कार्यकर्ते, वैचारिक भूमिका, त्या चळवळीने हातात घेतलेल्या प्रश्नांचे स्वरूप, पार्श्वभूमी, आकडेवारी याची संपूर्ण माहिती त्यांच्याजवळ असेच. त्यांच्या सततच्या भटकंतीत त्यांचे वाचन, मनन, चिंतन, टिपण चालूच असे. त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकाला नवे काहीतरी हमखास पदरात पडत असे.


कोल्हापुरात ओरडून पक्षाचे मुखपत्र विकणारा मुलगा म्हणून आपली राजकीय कारकीर्द चालू केलेल्या ह्या मुलाने आज लोकप्रतिनिधी, आमदार, विरोधी पक्षनेता, नामदार, आघाडी सरकारचा समन्वयक, पक्षाचा ज्येष्ठ नेता, जनचळवळीचा आधारस्तंभ असा लौकिक मिळवला. निरक्षर कुटुंबात जन्माला येऊन रयतसारख्या शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदापर्यंत ते पोहोचले. या यशस्वी आणि सफल जीवनात त्यांच्या पत्नी सरोज पाटील यांचे महत्त्वाचे योगदान आहे. अंनिस वार्तापत्राला दिलेल्या मुलाखतीत त्या एन. डीं. चा उल्लेख 'एक वादळ' असा करतात. संसाराच्या सुरुवातीपासूनची एन.डीं.ची भ्रमंती त्यांनी आता सवयीचा भाग म्हणून स्वीकारली आहे. त्या सांगतात, आता पायाच्या अधुपणामुळे, आजारपणामुळे बाहेर कार्यक्रमाला वगैरे जाणे, फिरणे त्यांना अवघड झाले आहे. पण मुलांनी मला सांगितले आहे, शक्य असेल तेथे जाऊ देत, त्यांना अडवू नकोस. तो 'माणसांतला माणूस' आहे. सभोवती माणसे नसतील तर त्यांना अस्वस्थ वाटते. मुलांची जबाबदारी, सुरुवातीची संसारातील आर्थिक ओढाताण, त्यावर मात करण्यासाठी लग्नानंतर पूर्ण केलेले शिक्षण, त्यानंतरची शाळेतील नोकरी, आपल्या कार्यक्षमतेचा वेगळा ठसा उमटवत शाळेच्या मुख्याध्यापक पदापर्यंत पोहोचणे व एन.डी. सरांच्या लोकसंग्रहाच्यामुळे घरात होणारी उठबस, राजकारणातले चढ-उतार-ताण यांना सामोरे जाणे हे सारे सरोजताईंनी हसतमुखाने पार पाडले. एन. डी. सरांनी जपलेली मूल्ये त्यांनीही तेवढ्याच निष्ठेने जपली. एवढेच नव्हे, तर मुलांच्यातही उतरवली. एन. डी. सरांच्या मुलांनीही कधी सरकारी गाडी मिळावी किंवा खास वागणूक मिळावी असा आग्रह धरला नाही. मुलांचे मामा मुख्यमंत्री (शरद पवार) व वडील मंत्री असतानाही त्यांनी सरकारी कोट्यातून मिळत असलेला वैद्यकीय प्रवेश नाकारला. अभियांत्रिकीच्या प्रवेशासाठी रांगेत उभे राहूनच प्रवेश मिळविला. कोणताही सत्तेचा भपका एन. डी. सरांनी कधीच मिरवला नाही. तसेच त्यांच्या कुटुंबीयांनीही.

एन. डी. सर विचाराने पक्के मार्क्सवादी. अर्थातच त्यांचा ईश्वर, अध्यात्म वगैरेंवर अजिबात विश्वास नाही. पण त्यांचे वैशिष्ट्य हे की, ही वैचारिक धारणा त्यांनी सार्वजनिक जीवनातही कायम ठेवली. मंत्रीपद स्वीकारल्यावर आपल्या हस्ते कोणतेही भूमिपूजन वा कोणतेही धार्मिक कार्यक्रम, विधी होणार नाहीत असा आदेश त्यांनी लगेच जारी केला. त्यांनी

लोकांच्या धार्मिक श्रद्धा मान्य केल्या; पण त्यांचा वापर आपल्या राजकारणाकरिता केला नाही. कोणतेही कर्मकांड त्यांनी आपल्या व्यक्तिगत अगर कौटुंबिक आयुष्यात केले नाही. आपली विचारसरणी आणि आचार यात कमालीची सुसंगती त्यांनी राखली. त्यांच्या प्रत्येक कृतीतून त्यांचा विवेक सतत जागृत असल्याचे दिसून येते. त्यांचा प्रचंड लोकसंग्रह वैचारिक किंवा व्यावहारिक तडजोडीतून निर्माण झालेला नाही, तर लोकांच्या प्रश्नांची तड लावण्याच्या संघर्षशील भूमिकेतून निर्माण झालेला आहे. आपली विचारधारा, तत्त्वनिष्ठा कायम राखूनही इतका प्रचंड लोकसमुदाय आपल्या पाठीशी उभा करता येतो, हे एन. डी. सरांच्या उदाहरणावरून सिद्ध होते.

आज एका बाजूला जातीयवादी, धर्मांध, सनातनी, फॅसिस्ट शक्तींनी असहिष्णुता, धर्मांधता यांसारखे प्रश्न तर दुसऱ्या बाजूला नवउदारवादी आर्थिक धोरणांनी बेरोजगारी, महागाईसारखे प्रश्न उभे केले आहेत. पुरोगामी डाव्या चळवळींसमोर या प्रश्नांच्यारूपाने खूप मोठी आव्हाने उभी आहेत. त्या आव्हानांना तोंड द्यायचे, तर केवळ धर्मनिरपेक्ष असणे उपयोगी नाही तर या नवसाम्राज्यवादी, नवउदारवादी आर्थिक धोरणांच्या विरोधात उभे राहिले पाहिजे, अशी भूमिका असलेल्या एन. डी. सरांसारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची समाजाला नितांत गरज असतानाच त्यांचे असे निघून जाणे सर्वच चळवळींमध्ये मोठी पोकळी निर्माण करणारे आहे.

●



# योद्धा, सत्यशोधक समतावादी हरपला!

किशोर ढमाले
९४२२०१५८५४

महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर काळात समतेचा प्रवाह तीन पद्धतीने आला आणि रुजला. एक प्रवाह म. फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊरावअण्णा पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर असा सत्यशोधक जातीस्त्रीदास्यांताचा प्रवाह तर दुसरा रानडे, गोखले, महर्षि शिंदे, सेनापती बापट, म. गांधीप्रणित अहिंसक, राजकीय सत्याग्रही प्रवाह आणि तिसरा कॉ. श्रीपाद अमृत डांगे, दिनकरराव जवळकर ते दाभाडी प्रबंधापर्यंत विकसित झालेला, मार्क्सवादी समतेचा प्रवाह. हे तीन प्रवाह स्वातंत्र्यपूर्व काळात समांतर वाहात असल्याचे भासत असले, तरी त्यात एक अंतर्गत सूत्र होते. या तीनही प्रवाहांचे स्वातंत्र्योत्तर काळातील एकजीव मिश्रण झाल्याचे उत्तुंग उदाहरण म्हणजे भाई. एन. डी. पाटील सर होय! सरांना कर्मवीर भाऊराव पाटलांकडून सत्यशोधक वारसा मिळाला. विठ्ठल रामजी शिंदेंकडून सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीला मिळाला. तसा म. गांधींच्या सत्याग्रहाचा तर स्वातंत्र्यांच्या उंबरठ्यावर स्थापन झालेल्या शेतकरी कामकरी पक्षाकडून विशेषतः भाई दाजीबा देसाई आणि दाभाडी प्रबंधातून शेतकरी केंद्री मार्क्सवादाचा वसा मिळाला. एन.डी. पाटील सर मार्क्सवादी शास्त्रीय जीवनदृष्टिकोन अंगीकारलेले अहिंसक सत्याग्रही जातीअंतक धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी कृतिशील विचारवंत होते!

‘असाध्य ते साध्य- करिता सायास- कारण अभ्यास- तुका म्हणे।’

१९८८ साली सत्यशोधक विद्यार्थी संघटनेची स्थापना झाली. त्यावेळी नवे शैक्षणिक धोरणाला विरोध, दलित-आदिवासी विद्यार्थी शिष्यवृत्ती वाढ, मंडल आयोगानुसार मध्यम शेतकरी व बलुतेदार जातींना (ओबीसी) शिष्यवृत्ती मिळावी यासाठी मोर्चा काढण्याचे ठरले. या मोर्चाच्या पूर्वतयारीसाठीच्या एका भेटीत सरांची व माझी ओळख कॉ. शरद पाटलांनी करून दिली. २६ सप्टेंबर १९८९ रोजी निघालेल्या त्या मोर्चाला सरांनी मार्गदर्शन केलेच; शिवाय मंत्रालयात शिक्षणमंत्री, समाजकल्याण मंत्र्यांशी चर्चा घडवून आणण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. त्यावेळी सर कोल्हापूर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधी होते. १९८६ साली राजीव गांधींनी नवीन शैक्षणिक धोरण आणले होते. नव्या शैक्षणिक धोरणामुळे देशातील श्रीमंत विद्यार्थ्यांसाठी ‘ड्यून स्कुलस’ व गरिबांना सामान्य शिक्षण देण्याचे निश्चित झाले होते. हा सरळ - सरळ कष्टकरी जनतेशी द्रोह असल्याचे मत एन.डी. सरांनी ठामपणे मांडले. या नवीन शैक्षणिक धोरणाला विरोध करण्यासाठी सरांनी महाराष्ट्रभर मोहीम काढली. समोर माणसे ५० असोत की ५००, सरांचे खणखणीत आवाजात अभ्यासपूर्ण मांडणी अखंडपणे चालायची. ‘भिंतीला पाठ लावून लढणं’ हा वाक्प्रचार सरांची भाषणे ऐकत असताना सतत आठवायचा. अलीकडे मी त्यात थोडा बदल करून म्हटले, ‘सर उभे राहिले की मागे भिंत असायची गरजच नाही. त्यांचे उभे राहाणे हे पहाडासारखे असायचे आणि त्यांची वाणी धबधब्यासारखी कोसळायची.’

याच नवीन शैक्षणिक धोरणविरोधी मोहिमेत १९९०च्या

सुमारास एन.डी.सर धुळ्याच्या जयहिंद महाविद्यालयात आले होते. त्यांच्या जाहीर व्याख्यानात कॉ. शरद पाटलांबरोबर मीही गेलो होतो. जयहिंद शिक्षण संस्था ही एन.डी. सरांचे ज्येष्ठ बंधुवत सहकारी, शेकाप नेते भाई झेड. बी. पाटील (नाना) यांनी उभी केलेली संस्था. या भाषणात सरांनी नवीन शैक्षणिक धोरणाचे श्रीमंतधार्जिणे वर्ग चरित्र स्पष्ट केले आणि जयहिंद शिक्षण संस्थेनेही मूठभरांसाठी नव्हे; तर समस्त कष्टकरी, शेतकरी आदिवासी–दलितांसाठी कार्यरत राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. ही अपेक्षा जयहिंद शिक्षण संस्थेच्या वर्गजातीस्वरूपावरील 'टिप्पणी' असल्याचे कॉ. शरद पाटलांनी मला समजावून सांगितले होते.

मधुकरराव चौधरींनी शिक्षणमंत्री असताना शिक्षणास नाईक दाम्पत्याच्या सहकार्याने शिक्षणासंदर्भात जी श्वेतपत्रिका प्रसिद्ध केली, तेव्हापासून दुहेरी शिक्षण पद्धतीला एन.डी. पाटील सरांचा विरोध होता. म. जोतिराव फुल्यांच्या शिक्षण विचारांचाच हा परिणाम होता. सरांनी स्वतःच्या शिक्षणसंस्थेला म. फुलेंचे नाव दिले आहे. फुले–आंबेडकरांची नावे संस्थांना देणे आणि प्रत्यक्ष त्यांच्या विचारांचे अनुकरण, वैचारिक मांडणी व व्यवहार करणे याचा अन्योन्यसंबंध काय असतो याचे मूर्तिमंत उदाहरण बघायचे असल्यास लगेच एन. डी. सरांचेच नाव आपल्यासमोर येते. मधुकरराव चौधरींच्या श्वेतपत्रिकाविरोधातील अकोल्यातील सभा असो की विधिमंडळातील आमदारांचा, यशवंतराव चव्हाणांच्या सांगण्यावरून घेतलेला अभ्यासवर्ग असो याचे किस्से सरांच्या तोंडून ऐकणे ही पर्वणीच होती. कल्याणकारी व्यवस्थेने संविधानप्रणित मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या दिशेने जाण्याऐवजी विरुद्ध दिशेने वाटचाल सुरू केली होती. त्या प्रत्येक टप्प्यावर मग तो श्वेतपत्रिकेचा असो १९८५ च्या नवीन शैक्षणिक धोरणाचा, एन.डी. सरांनी कष्टकरी, शेतकरी बहुजनांच्या बाजूने त्याबद्दल कठोर टीकास्त्र उगारले. त्यासंदर्भात सत्ताधाऱ्यांना विधिमंडळ व बाहेरही धारेवर धरले. सरांनी राज्यकर्त्यांची ही नवी वाट उच्चजातवर्गीयांना पक्षपाती असल्याचे बरोबर हेरले होते. त्यांच्यातला फुलेवादी शिक्षणतज्ज्ञ तिन्ही त्रिकाळ जागा होता. आपल्या जनतेच्या 'विद्याविषयक' हितसंबंधासाठी हा शिक्षणतज्ज्ञ प्रत्येक पातळीवर लढत होता. 'शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?' असा आर्त सवाल विचारत हा शिक्षणतज्ज्ञ सत्ताधाऱ्यांच्या स्वातंत्र्यकालीन वारसाच्या स्मृती जाग्या करू इच्छित होता आणि त्यांच्या प्रतिकूल प्रतिसादानंतर जनतेसमोर राज्यकर्त्यांचे स्वार्थीधोरण उघडे करत होता.

एन्रॉनच्या आंदोलनाला भाई वैद्य, भाई एन.डी. सर, कॉ.प्रभाकर संझगिरी यांनी गती दिली. यावेळी पुण्यात नेहरू मेमोरियला झालेल्या सभेत आंदोलनाची दिशा स्पष्ट करणारे सरांचे भाषण आजही स्मरणात आहे. प्रस्थापित सरकारच्या जनविरोधी व बहुराष्ट्रीय कंपन्यांना धार्जिणे वीजधोरणाची चिरफाड सरांनी केली. दरम्यान, शरद पवारांना लक्ष्यकेंद्र बनवून गोपीनाथ मुंडेंनी 'सत्तेवर आल्यावर एन्रॉन अरबी समुद्रात बुडवू', अशी घोषणा देत प्रचाराचा धुरळा उठवला. प्रत्यक्षात १९९५ साली सत्तेवर आल्यानंतर युती सरकारने एन्रॉनला मखमली पायघड्या अंथरण्याची स्पर्धा आपसातच कशी चालवली हे उभ्या महाराष्ट्राने पाहिले. याहीवेळी एन्रॉनविरोधी लढ्याला नवे वळण देण्यात एन.डी.सर अग्रभागी होते. महाराष्ट्रात सत्याग्रहाचे रान उठले नंतर सत्ता बदल झाला आणि एन्रॉन प्रश्नी निर्णायक भूमिका घेण्याची वेळ आली तेव्हाही गोडबोलेंची समिती नियुक्ती होऊन प्रश्न धसास लागण्यासाठी सरांनीच पुढाकार घेतला. त्यावेळी सर लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

त्याच सुमारास सत्यशोधक विद्यार्थी संघटनचे फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू होते. फार्मसी विषय तंत्रशिक्षण विभागाकडून काढून नव्याने स्थापित आरोग्य विज्ञान विद्यापीठाला जोडण्यात आला होता. विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या व तज्ज्ञांच्या मते तो पूर्वीप्रमाणेच तंत्रशिक्षण विभागाकडे असणे आवश्यक होते. सत्यशोधक विद्यार्थी संघटनेच्या नेतृत्वाखाली हजारो विद्यार्थी दि. २ ऑक्टोबर २००० रोजी मुंबईत धडकले. उपोषणाला सुरुवात झाली. मी हवालदिल झालो होतो. ४ विद्यार्थ्यांना ३ ऱ्या दिवशी ॲडमिट करावे लागले. दरम्यान, एन.डी. सर मुंबईबाहेर होते. त्यांच्या कानावर बातमी गेली. ते तडक आझाद मैदानात आले. 'उपोषण सुरू आहे तर तड लागेपर्यंत चालू ठेवा, मी संबधितांशी बोलतो', म्हणाले. दुसऱ्या दिवशी आघाडी सरकारचे निमंत्रक या नात्याने त्यांनी उच्चशिक्षणमंत्री व मुख्यमंत्री यांच्याशी आमची चर्चा घडवून आणली. दि. ९ तारखेच्या कॅबिनेटमध्ये विषय येईल व तुमच्या मागणीप्रमाणे निर्णय होईल, असे आश्वासन एन.डी. सरांसमोर मुख्यमंत्री विलासराव देशमुखांनी दिले. आम्ही मंत्रालयातून बाहेर आलो. सरांनी आम्हाला सांगितले, 'आता आझाद मैदानात जा. सर्व विद्यार्थ्यांना गोळा करून आपली चर्चा सांगा. आता आश्वासन मिळाले आहे, सरकार त्यापासून मागे फिरू शकत नाही; पण मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय होण्यास दोन दिवस आहेत. तोपर्यंत उपोषण चालवायचे की आजच्या निर्णयावर स्थगित करायचे हे तुम्ही सर्वानुमते ठरवा आणि मला कळवा. मगच मी उपोषण सोडवायला येईल.' हा आहे लोकशाहीवादी नेत्याचा आदर्श! 'मी मध्यस्थी केली, आता उपोषण सोडा' असा आदेश सर सहज देऊ शकले असते, आम्हालाही पर्याय नव्हता. पण सरांनी आंदोलनातील लोकशाही निर्णयप्रक्रियेचा धडा आम्हाला दिला. दि. ७ ऑक्टोबरला सर आझाद मैदानात

आले. आमचे उपोषण सुटले. ठरल्याप्रमाणे मंत्रिमंडळाचा ९ तारखेला निर्णय झाला. आजही २० वर्षांनंतर फार्मसीचे विद्यार्थी कुठेही भेटले तर सरांची आठवण आवर्जून काढतात. असे प्रत्येक आंदोलनात, लढ्यातच नव्हे; तर प्रत्येक भेटीत सर नवीन गोष्ट शिकवत गेले.

२००२ हे महाराष्ट्रातील भूमिहीनांच्या जमीनहक्क लढ्याचे सेनापती निष्ठावंत आंबेडकरवादी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष होते. कॉ. अप्पासाहेब भोसलेंच्या सूचनेवरून शताब्दी समितीच्या कार्यकर्त्यांनी पुण्यात क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडींच्या उपस्थितीत बैठक लावली. डॉ. भारत पाटणकर, मेधाताई पाटकर, उल्का महाजन, भाई वैद्य, मी, रामसिंग गावीत, प्रतिभा शिंदे, कॉ. गं.पा. लोके, संपत देसाई, जयंत निकम, इ. कार्यकर्ते उपस्थित होतो. बैठकीत पहिल्यांदा गायरानप्रश्नी औरंगाबादला परिषद घेण्याची सूचना आली. मी अमरावतीला हत्तीच्या पायाखाली पिके तुडवण्याच्या फॉरेस्टच्या कृतीचा दाखला देत वनजमीनप्रश्नी आदिवासी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कृतीची गरज अधोरेखित केली. सर्वानुमते मुंबईला १० ऑक्टोबर २००२ रोजी मोर्चा काढण्याचे ठरले. काही संघटना मुद्दाम कुरघोडी करत होत्या. तरी ठरल्याप्रमाणे विशाल मोर्चा निघाला. क्रांतिवीर नागनाथअण्णा, एन.डी. सर यांनी विशाल मोर्चाचे नेतृत्व केले. सरांनी शिष्टमंडळातर्फे बोलताना मुख्यमंत्र्यांना अक्षरशः धारेवर धरले. विलासराव देशमुखांनी, ‘सर, तुमचा मोर्चा येणार हे पोलिसांकडून अगोदरच कळल्यामुळे आम्ही यासंदर्भात शासन निर्णय घेतला आहे व आजच्याच तारखेला तो जाहीर करीत आहोत. १९७८ पूर्वीच्या वनजमिनींवरील आदिवासींच्या वहिवाटींना नियमानुकुल करण्यात आता अडचण येणार नाही’, असे स्पष्ट केले. आदिवासींच्या वनजमिनीवरील वहिवाटींबाबत कागदोपत्री पुरावे विचारून वनखात्यामार्फत होणारा छळ, सावकारांकडून आणि बिगर आदिवासी जमीनदारांकडून होणारे शोषण यासंदर्भात एन.डी.सरांनी १९७२ पासून वेळोवेळी विधिमंडळात आणि बाहेर मांडणी व कृती केलेली होती. २००१ च्या सुमारास मेधाताई पाटकरांना मंत्रालयाच्या प्रवेशद्वारावर पोलिसांकरवी धक्काबुक्की झाल्याचे कळताच एन.डी. सर संतापले. आम्ही शेकापवाले सरकारमध्ये असताना आंदोलनकर्त्यांबाबत असे होत असेल तर त्या सत्तेचा काय उपयोग? असे म्हणत सरांनी पक्षसरचिटणीस म्हणून मंत्री गणपतराव देशमुखांना त्यांच्याच दालनात सर्व सचिवांसह नर्मदा बचाव आंदोलनाच्या मागण्यासंदर्भात बैठक बोलवायला लावली. नंतर आघाडी सरकारचे निमंत्रक म्हणून मुख्यमंत्र्यांना या बैठकीतल्या निर्णयांवर कृती करायला भाग पाडले. सत्यासाठी सत्ता राबवली गेली पाहिजे यासाठी हा अट्टाहास होता. पाच वेळा आमदारकीच्या गुलालात न्हाऊन निघालेल्या सरांचा संसदीय सहकाऱ्यांनाही याच मार्गाने पुढे नेण्याचा आग्रह कायम राहिला.

सरांच्या नेतृत्वाखाली जागतिकीकरणविरोधी कृतिसमिती महाराष्ट्रात कार्यरत झाली. साम्राज्यवादी जागतिकीकरणाला विरोध करण्यासाठी सरांनी सर्व डाव्या-पुरोगामी-समतावादी प्रवाहांना एकत्र आणण्याचे काम केले. या सर्वांना एकत्र ठेवणे म्हणजे तारेवरची कसरत, विचारांचे टकराव, एनजीओकरणातून आलेली व्यक्तीनिष्ठता, घसरत चाललेल्या जनपाठिंब्यानंतरही टोकाचे अभिनिवेश, परंपरागत जातीस्थानातून आलेला आणि पुरोगामी प्रबोधनानंतरही उरलेला तुच्छताभाव, शोषित समाजातून आल्यामुळे इतरांप्रति असलेला संशयभाव एक ना अनेक प्रकारचे भाव-प्रवृत्ती घेऊन लोक सामाजिक, राजकीय चळवळींमध्ये कार्यरत असतात. पुलाखालून वाहून जाणारे पाणी बघत काहीजण हळूहळू निराशाग्रस्तही होतात. पण सर म्हणजे पहाडच! त्यांचा जनतेच्या कर्तृत्वावरचा विश्वास आणि परिवर्तनाच्या तत्त्वावरची निष्ठा अढळ होती. जागतिकीकरणविरोधी कृतिसमितीच्या एका बैठकीत सुरुवातीलाच प. बंगालमध्ये सिंगुर जमीन अधिग्रहणविरोधी लढणाऱ्या शेतकऱ्यांवर कम्युनिस्ट सरकारच्या पोलिसांनी गोळीबार केल्याची बातमी आली. बैठकीला आलेला एकजण क्रिकेटचा स्कोअर सांगितल्याप्रमाणे मृतांचे वाढलेले आकडे सांगत होता. कुणाला प्रस्थापित डाव्या पक्षांच्या जनद्रोहाचा कडेलोट वाटला तर कुणाला आणखी काही. एन.डी. सर स्तब्ध होते. ते एवढेच म्हणाले, ‘गोळीबारात मृत शेतकऱ्यांना आदरांजली वाहूया’, तेव्हा बैठकीतून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे प्रतिनिधी जाऊ लागले. सर म्हणाले, ‘आपण जागतिकीकरणविरोधी कृतिसमितीत एकत्र आहोत. पुढे एकत्रच राहिले पाहिजे. कुणालाही कुणी जा म्हटलेले नाही. त्यामुळे कृतिसमितीतून कुणीही बाहेर पडू नये. डाव्यांची एकजूट टिकली पाहिजे’ ह्या आग्रहाशी सर ठाम होते.

केवळ कृतिसमितीचाच नव्हे; तर एन्रॉननंतर देशातील जागतिकीकरणविरोधी लढ्यातील महत्त्वाचे पर्व म्हणून एसईझेडविरोधी लढ्याकडे बोट दाखवावे लागेल. अंबानींच्या महामुंबई सेझविरोधात एन,डी.सरांनी रणशिंग फुंकले. त्यांच्या नेतृत्वाखाली उल्का महाजन, सुरेखा दळवी, आमदार धैर्यशील पाटील, रायगडचा शेकापक्ष आणि विविध जनसंघटनांनी अभूतपूर्व लढा उभारला. या दरम्यान सरांनी उपोषणाची घोषणा केली. सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेच्या अनेक आंदोलनात आम्हाला सरांचे मार्गदर्शन लाभले होते. आता सरच अंबानीच्या सेझविरोधात उपोषणाला बसत आहेत म्हटल्यावर आम्ही निर्णय घेतला. पेरणीचे दिवस असतानाही २००

कार्यकर्ते रेल्वेचे तिकीट काढून नंदुरबारकडून मुंबईत पोहचलो. करणसिंग कोकणी, रामसिंग गावीत व मी आझाद मैदानात गेल्यागेल्या सरांना भेटलो. पुढचे दोन दिवस हललो नाही. आझाद मैदानात दुपारीच भाई गणपतराव देशमुख, एस. एम. तात्या पाटील यांनी मला बोलावून विचारणा केली. भाई गणपतराव थोडे त्रासले होते. ते म्हणाले की, ''का हो ढमाले, हे काय केले तुम्ही? सरांना उपोषण करायला लावले?'' मी म्हटलो, ''सरांना उपोषणासाठी एक शब्दानेही मी भरीस घातलेले नाही. सरांनीच एक वर्षापूर्वी सरकारने शब्द न पाळल्यास मी स्वत: उपोषणास बसेन, असे जाहीर केले. त्याप्रमाणे ते बसले आहेत. याठिकाणी रायगड आंदोलनातील उल्का महाजन, संजीव साने आहेत त्यांनाच याबद्दल जास्त माहिती आहे. ते सांगतीलच. आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट; सर माझ्या काय किंवा अन्य कोणाच्या सांगण्यावरून सर निर्णय घेतील, असे तुम्हाला तरी वाटते का? सरांविषयीच्या काळजीमुळेच आम्ही नंदुरबार-धुळ्यावरून येथे संख्येने आलो आहोत. त्यामुळे तुमचा गैरसमज झालेला दिसतोय.'' मग त्या दोन्ही ज्येष्ठांनी उल्का महाजन आणि साथी संजीव सानेंकडे मोर्चा वळवला. थोड्या वेळात आ. धैर्यशील पाटील आले आणि मग पुढच्या हालचाली सुरू झाल्या.

सर उपोषणाला बसले तेव्हा ८० वर्षांच्या जवळपास पोहोचलेले होते. स्वत:च्या जीवावर उदार होऊन त्यांनी हा लढा लढवला. सरांबरोबर मी, कॉ. पानसरे, सरांचा ड्रायव्हर परशुराम सरांसोबत हॉस्पिटलमध्येही होतो. मंत्री पतंगराव कदम सरकारचा निरोप घेऊन उशिरानेच तेथे पोहचले. सरकारने जनमत चाचणी घेण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आणि याही परीक्षेला बसण्याच्या तयारीला एन.डी. पाटील सरांनी तिथे आझाद मैदानातच सुरुवात केली. उपोषणाच्या थकव्याऐवजी या निर्धारानेच त्यांचा चेहरा उजळून निघालेला मी बघितला!

आदिवासींच्या जल जंगल जमिनीवरील अधिकारासाठी चाललेल्या चळवळींच्या बाजूने एन.डी. पाटील सर कायम उभे राहिले. धुळे जिल्ह्यात बहुराष्ट्रीय पवन ऊर्जा कंपन्यांच्या नफ्यासाठी आदिवासींना बेदखल करण्याचे धोरण शासन-प्रशासनाने आखले. त्यासाठी कार्यकर्त्यांवर खोट्या केसेस चालवण्याचं कारस्थान कंपनीच्या सांगण्यावरून पोलिसांनी चालवलं होतं. मला पाच जिल्ह्यांतून हद्दपारीची नोटीस बजावण्यात आली. या विरोधात कष्टकरी आदिवासी शेतकऱ्यांच्या हितासाठी मोठा जनसंघर्ष उभा करण्याचं काम एन.डी.सरांच्या नेतृत्वाखाली झालं. या प्रश्नासाठी २००७ साली आम्ही सरांना धुळ्यात बोलावले. सरांनी सभेच्याआधी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेतली. जिल्हाधिकारी भास्कर मुंडेंना त्यांनी विचारलं, ''का हो या सुझलॉन कंपनीचे २५ कोटी रुपये खर्चून उभारलेलं हॉस्पिटल कुठे आहे? मला जरा ॲडमिट व्हायचं आहे.'' कलेक्टरांनी असे हॉस्पिटल अस्तित्वात नसल्याचे व कंपनीने खोटी जाहिरात केल्याचे सांगितले. यानंतर साक्रीच्या विराट मोर्चासमोर सरांनी गर्जना केली, ''हे कंपन्यांनो, तुम्ही कोणाच्या जमिनीवर आक्रमण करता आहात? आमच्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही, अशी शेखी मिरवणाऱ्या ब्रिटिशांची अंबारी उलथवणारे लोक आहोत आम्ही. आमच्या आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीकडे वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत करू नका. नाही तर तुमचीही तीच दशा केल्याशिवाय राहाणार नाही.'' सरांच्या मार्गदर्शनाने आमच्यात हत्तीचं बळ आलं. याच प्रश्नावर विक्रमसिंग पाटणकर असोत की मंत्री बबनराव पाचपुते असोत एन.डी.सरांनी कंपन्यांची वकिली करणाऱ्या कुणाचाही गय केली नाही. ते ठामपणे आदिवासी, कष्टकऱ्यांच्या, शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहिले. तुम्ही योग्य पद्धतीने विना तडजोड आंदोलन करता आहात म्हणूनच कंपनीची माणसं त्यांचे हितसंबंधी तुमच्या विरोधातल्या कागाळ्या करत फिरत आहेत. घाबरू नका. महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यात तुमचा आवाज बंद करण्याचे त्यांचे मनसुबे मी रोखल्याशिवाय राहाणार नाही. हा शब्द त्यांनी अखेरपर्यंत पाळला. मला हद्दपारीची नोटीस आली. गल्लीपासून मंत्रालयापर्यंत मला हिंसक आंदोलक ठरवण्याचे प्रयत्न कंपनीच्या बाजूने खासदार माणिकराव गावीत, वनखात्याचे कर्मचारी, पोलीस यांपासून ते वनमंत्री बबनराव पाचपुतेंपर्यंतचे हितसंबंधी करत होते. जिल्हाधिकारी प्राजक्ता लवंगारेंनी तर हद्दपारीचा निर्णय घेतल्याचे कॉ. सुभाष काकुस्ते यांना सांगितले होते. मंत्रालयातील मिटिंगा म्हणजे धमक्यांचे केंद्र झाले होते. त्यावेळी एन.डी. सर बैठकीतच एका मंत्र्याला म्हटले, ''अरे किती तळी उचलाल त्या कंपन्यांची. त्यांच्या उपकारच्या भाराने वाकलात की रे तुम्ही! निःशस्त्र, अहिंसक आंदोलकांची तुम्हाला आता भीती वाटू लागली. काय किमया आहे कंपन्यांची!'' एकदा आर. आर. आबांना ते म्हणाले, ''दादा सामंत व मी घोटून दाढी करणारे लोक. आता या किशोरलाही सांगतो दाढी काढ बाबा, तू दाढीमुळे क्रूरकर्मा हिंसक वाटतोय यांना!'' सरांनी धुळ्यापासून ते मंत्रालयापर्यंत खंबीरपणे लोकशाही मार्गाने जलजंगलजमीन वाचवायच्या सत्यशोधक आदिवासींच्या लढाईचे समर्थन केले. नेतृत्व केले. अशीच २००९ ची गोष्ट. पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील विमानतळाबाबत. भामा आसखेड धरणाच्या लाभक्षेत्रात चारचार किलोमीटर पर्यंत लिफ्टने पाणी नेऊन श्रमाने, घामाने जमिनी बागायती केल्या. त्याच जमिनी विमानतळासाठी काढून घेण्याचे शासनाने ठरविले. मी, माणिकराव कदम, बाळासाहेब साळुंखे, प्रा. जालिंदर दळवी, लहू गोरे इ. सहकाऱ्यांना बरोबर घेऊन विमानतळ विरोधी कृतिसमिती स्थापन केली. सरांच्या

नेतृत्वाखाली आम्ही लढलो. विमानतळ विरोधी मोर्चे, सत्याग्रह झाले. सरांनी लढ्याच्या सुरुवातीला मला विचारले, ''लोकांना शेती कसायची आहे की जमिनीचा भाव वाढवून मिळवायचा आहे? जरा नीट तपास करून सांग. कारण जमिनीचे भाव वाढवून मिळतील अशी अपेक्षा असेल, तर आपण वेळ खर्च करण्याचे कारण नाही. राबणाऱ्या कष्टकरी, शेतकऱ्यांसाठी आपण लढायचे.'' नंतर मी सांगितले की, ''सर, बागायती जमिनी आहेत. लोक त्यासाठी लढायला तयार आहेत.'' सर आले. त्यांच्या मार्गदर्शनाने शेतकरी मैदानात ठामपणे उभा राहिला. विमानतळ हटले, शेतकऱ्याच्या जमिनी वाचल्या!

एन.डी.पाटीलसरांचे मार्गदर्शन होते म्हणूनच लोकलढे उभे राहिले. धुळे, नंदुरबार जिल्ह्यातल्या आदिवासींच्या जमिनी, पवन ऊर्जा कंपन्या व एस. ई. झेड.च्या कचाट्यातून, पोलिसांच्या अत्याचारातून, जंगलखात्याच्या दडपशाहीतून वाचल्या. साम्राज्यवादी जागतिकीकरणाच्या काळात रायगडचा आगरी शेतकरी असो, की धुळे, साक्री, नंदुरबार या भागातला आदिवासी शेतकरी ताठ मानेनं स्वतःच्या जमिनीत उभा आहे. त्याचं महत्त्वाचं कारण जागतिकीरणविरोधी कृतिसमितीतील एन.डीं.सरांचं नेतृत्व हेच आहे. त्यांनीच ८ ऑगस्ट २००७ ला कॉ. रामसिंग गावीत यांच्या उपस्थितीत 'एकच नारा, सात बारा!' ही घोषणा धुळ्यातील आदिवासींच्या मनात रुजवली.

१९६२ ला मुंबईला शेकापतर्फे शेतकऱ्यांचा मोर्चा निघणार होता. भाई दाजीबा देसाईंनी एन.डी.सरांना शेतमालाच्या प्रश्नावर पुस्तिका लिहायला सांगितली. 'शेतीमालाच्या किफायतशीर किमतीचा प्रश्न' ही या संदर्भातील स्वातंत्र्योत्तर काळातील पहिलीच असावी अशी पुस्तिका सरांनी लिहिली. विचार आणि कृती यांचा संबंध त्यांनी सतत जपला. लढ्याला मार्गदर्शनासाठीच लेखणी हातात घेतली. सर सहकारमंत्री असतानाच कापूस एकाधिकार योजनेची यशस्वी अंमलबजावणी झाली. खान्देशापासून विदर्भापर्यंतच्या कापूस उत्पादकांच्या घामाला उचित दाम मिळाला. 'पांढरं सोनं' हा कापसाला पर्यायी शब्द खऱ्या अर्थाने सिद्ध झाला. महाराष्ट्र राज्य दुष्काळ निवारण निर्मूलन मंडळाची धुरा धनंजयराव गाडगीळांनंतर सरांच्या खांद्यावर आली. अर्थतज्ज्ञ सुलभा ब्रह्मे, प्रा. एच.एम. देसर्डा यांच्यासह आमच्यासारख्या डाव्या चळवळीतील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन सरांनी दुष्काळग्रस्तांचे प्रश्न पुढे आणले. पायाला भिंगरी लावून मराठवाडा, खान्देश, दक्षिण महाराष्ट्रातील गावखेड्यात फिरत राहिले. धरण उशाला–कोरड घशाला यातील पाणीदारी, समन्यायी पाणी वाटपाचा प्रश्न सांगत राहिले. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणांच्या कार्यकालात पिण्यासाठी पाणी, शेतीसाठी पाणी, उद्योगासाठी पाणी हा अग्रक्रम बदलला गेला आणि २ लाख हेक्टरला बागायती बनवू शकेल एवढे पाणी उद्योगांना वळविले गेले तेव्हा एन.डी.सर कडाडले. हे पाणी उद्योगांना वळवले नव्हे पळवले आहे, हा शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यावर दरोडा आहे. हीच गोष्ट १९७८ च्या दुष्काळात लढून मिळवलेली रोजगार हमी योजना, या लढ्यातसुद्धा एन.डी. सरांचा इस्लामपूरमधील मोर्चावरील गोळीबारात ४ शेतकरी तरुणांचा बळी गेला होता. अशी राज्यातल्या शेतकऱ्यांनी रक्त सांडून मिळवलेली रोहयो बंद करून, त्यासाठी कररूपाने गोळा केलेला पैसा अर्थसंकल्पाचा भाग बनवून इतर योजनात खर्च करण्याचा घाट घातला गेला होता. महाराष्ट्रातील डाव्या चळवळींना जनसंघटनांना बरोबर घेऊन सरकारवर दबाव आणण्यात एन.डी. सरांनी पुढाकार घेतला. शेवटी किमान २००० कोटी रुपये प्रत्येक बजेटमध्ये रोहयोसाठी वेगळे ठेवण्याची भूमिका घेत शासनाला माघार घ्यावी लागली. धान्यापासून दारू बनवण्याच्या शासनाच्या धोरणावर स्त्रियांची बाजू घेत म. फुल्यांच्या थोडे तरी मद्य वर्ज्य करा, तोचि पैसा भरा ग्रंथांसाठी या अखंडाचा दाखला देत एन.डी.सरांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यात फुलेवाड्यात दुष्काळ निवारण निर्मूलन मंडळाच्या वतीने डॉ.सुलभा ब्रह्मे, मी, प्रतिमा परदेशी, प्रा. एच.एम. देसर्डा, कॉ. भीमराव बनसोड, कॉ. मेधा थत्ते इत्यादींनी डाव्या पक्षांचे प्रतिनिधींसह परिषद घेतली. माझ्या विनंतीवरून ते दलित युवक आंदोलनाच्या रेशन हक्क परिषदेस आले.

एन.डी म्हणजे महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनातील शेतीमालाच्या रास्त किमतीचा प्रश्न, पाण्याच्या समन्यायी वाटपाचा प्रश्न, विजेचा प्रश्न, अन्याय्य भूसंपादनाचा विरोध करण्याचा प्रश्न, सहकारी साखर कारखाने तोट्यात नेऊन हितसंबंधियांना बहाल करण्याचा प्रश्न अशा जवळजवळ सर्व अंगांना स्पर्श करून त्यात शेतकरीहिताची भूमिका घेणारा योद्धा विचारवंत नेता! अंतोनिओ ग्रामसी या इटालियन मार्क्सवाद्याने मुसोलिनीच्या कैदेत असताना लिहिलेल्या प्रिझन नोटबुकमध्ये म्हटले आहे, शेतकरी हा दुर्दैवी वर्ग असतो की, ज्याचा बुद्धिजीवी विभाग तयार होतो पण प्रस्थापित शासनकर्त्यांकडून आपलासा केला जातो. शेतकऱ्यांना स्वत:च्या प्रामाणिक बांधिलकी मानणाऱ्या बुद्धिजीवी विभागाची वानवाच असते. ग्रामसीचे हे शब्द काळजात चर्र करत कापत जातात. भारतात तर उच्चजातींकडे बौद्धिक ठेका कायम ठेवणारी जातीव्यवस्था आहे. शेतकरी बहुजनांची भूमिका मांडणारे बुद्धिजीवी कुठे सापडणार? शेतकऱ्यांना कर्ज देऊ नका, ते कर्ज बुडवतात, ते अनुदाने आणि सवलती मागत राहातात, त्यांना आयकर लावा इथपासून ते मुलीबाळींच्या लग्नात पैसा उधळतात आणि नुकसानभरपाईसाठी आत्महत्या करून पुढच्या पिढ्यांची सोय करतात इथपर्यंत शेतकऱ्यांचे विपरित चित्र रेखाटणारा प्रचार

वृद्धिंगत करण्यात इथला बुद्धिजीवी धन्यता मानतो. ग्रामसीनेच यासंदर्भात जैविक बुद्धिजीवीची संकल्पना मांडली आहे. आपल्या कष्टकरी वर्गाशी आणि तिच्या क्रांतिकारी वाटचालीशी सदैव जोडून घेतलेला इमानदार क्रांतिकारी जैविक बुद्धिजीवी! स्वातंत्र्योत्तर वाटचालीतील अशा बोटावर मोजता येतील जैविक बुद्धिजीवीत एन.डी. पाटील हे नाव तेजाने तळपताना दिसेल. सरांची भूमिका केवळ वर्गवादी नव्हती ती फुलेप्रणित सत्यशोधक भूमिका पुढे नेणारी होती. दाभाडीप्रबंधानंतर शेकापचा, पाठोपाठ बहुजनांचा सत्यशोधक प्रबोधन चळवळीशी असलेला बंध तुटत गेला आणि त्याचे रूपांतर संसदीय यंत्रणेत होऊ लागल्याचे त्यांच्या लक्षात आले होते. म्हणून त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीसाठी प्रचंड वेळ देऊन तो धागा पुन्हा जोडला. डॉ. नरेंद्र दाभोलकरांना बरोबर घेऊन अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा विधिमंडळात मंजूर व्हावा म्हणून त्यांनी केलेली प्रचंड मेहनत अविनाश पाटील इ. अंनिसचे सर्व सहकारी जाणतात. एकदा डॉ. दाभोलकर, एन.डी. सरांबरोबर मी संसदीय कामकाजमंत्री हर्षवर्धन पाटलांना भेटायला जातानाही त्यांच्यासोबत होतो. त्यावर्षी विधिमंडळाच्या कामकाजात अंधश्रद्धाविरोधी विधेयकाचा समावेश व्हावा या दरवर्षीच्या मागणीसाठी हे प्रयत्न चालू होते. दरम्यान, विधिमंडळाच्या कामातून वेळ काढून एक वरिष्ठ मंत्री हर्षवर्धन पाटलांकडे आले. त्यांच्या हातात गळ्यात भरपूर गंडेदोरे बांधलेले. आमच्याकडे त्यांचे लक्ष नव्हते. विधिमंडळ अधिवेशन काळातील शिरस्त्याप्रमाणे हर्षवर्धन पाटलांनी त्यांना ''जेवण मागवू का?'' विचारले. त्यांनी ''हो'' म्हटले व ते बसले. पण त्यांचे लक्ष एन.डी.सर व दाभोलकरांकडे गेलं आणि ते तात्काळ उठलेच! अंधश्रद्धा निर्मूलनवाद्यांसमोर जेवण करायची सत्य साईभक्त मंत्र्यांना भीती वाटली असावी. त्यांनी बाजूच्या खोलीत जेवण मागवले. त्यांच्या अचानक उठण्याने हर्षवर्धन पाटीलही चक्रावले; पण सर आणि दाभोलकर मिश्किल हसले. अशा अंधश्रद्ध राज्यकर्त्यांच्या गळी अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा उतरवण्याचा प्रयत्न सर व दाभोलकर करत होते!! डॉ. दाभोलकरांसह अंधश्रद्धा निर्मूलन समिती, डॉ. आंबेडकर अकादमीचे किशोर बेडकिहाळांसह विचारवेध संमेलन असो की, आमच्यासह विद्रोही साहित्य संमेलन, परिवर्तनासाठी प्रबोधनाची आवश्यकता बहुजनांनी समजावून घ्यावी म्हणून या प्रबोधन चळवळींना ते मार्गदर्शन, सहकार्य, मदत करत राहिले. ७ वे विद्रोही साहित्य संमेलन वाशी नवी मुंबईत आयोजित करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाने मदत करावी ही आमची विनंती सरांनी मान्य केली. प्राचार्य बी.ए.पाटलांना बोलावून विद्रोही संमेलनाचे महत्त्व सांगितले. महाकवी तुळशी परबांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन यशस्वी होण्यात एन.डी. सरांचे मार्गदर्शन, रयत शिक्षण संस्थेचे सहकार्य व प्राचार्य बी.ए.पाटील, पुष्पराज शेट्टी, राजू कोरडे, अजित देशमुख इ. कार्यकर्त्यांची मेहनत महत्त्वाची ठरली.

विद्रोही सांस्कृतिक चळवळीतील फूट क्लेशदायी आहे. ती सांधण्यासाठी सरांनी कॉ. गोविंद पानसरे व डॉ. आ.ह.साळुंखे यांना सोबत घेऊन एकजुटीचे प्रयत्न केले. पहिल्या बैठकीत एन.डी.सरांनी विचारले, ''बोल किशोर, एकीकरणासाठी काय अटी आहेत तुमच्या?'' मी म्हटले सर, ''तुम्ही तिघा ज्येष्ठ विचारवंतांनी आम्हाला बोलावले हाच आमचा सन्मान आणि तुम्हाला अटी सांगण्याएवढे बेमुर्वतखोर आम्ही नाहीत. आम्ही विनाअट एकजुटीला तयार आहोत.'' प्रा, तानाजी ठोंबरे, प्रतिमा परदेशी, किशोर जाधव, सिद्धार्थ जगदेव, रणजित गावीत, अर्जुन बागुल, संपत मोरे, यशवंत बागुल, रेहाना बेग, व्ही.जे.वळवी, अशोक अडसूळ, मन्साराम पवार इ. आम्ही सर्वांनी या तीनही ज्येष्ठांचा शब्द खाली पडू दिला नाही.

एन.डी.सर सांस्कृतिक परिवर्तनासंदर्भात अत्यंत सजग होते. अनेक इंग्रजी-मराठी कविता आणि नामदेव -तुकारामांचे अभंग सरांना मुखोद्‌गत होते. भालचंद्र नेमाडेंच्या हिंदू कादंबरीच्या प्रकाशनाला उपस्थित राहाणारे एकमेव राजकीय नेते म्हणून त्यांचा उल्लेख ज्येष्ठ संपादक ज्ञानेश महारावांनी केला. ज्ञानेश महारावांनी लिहिलेल व अभिनित केलेले 'जिंकूया दाही दिशा' या नाटकाच्या एका प्रयोगाला येण्याचा माझा आग्रह त्यांनी मोडला नाही. माई व ते दोघेही नाटकाला आले. मध्यंतरात कलावंताचा सत्कार एन.डी.सरांच्या व भाईंच्या हस्ते झाला. कलेची जोड असल्यावर विचार किती प्रभावीपणे पुढे नेता येतात याचे हे नाटक उत्तम उदाहरण असल्याची पावती तर त्यांनी महारावसरांना दिलीच आणि साताऱ्यात रयतच्या शिक्षण-सेवकांसाठी प्रयोगही ठेवला.

अजित देशमुख या मराठी नाट्य चित्रपटक्षेत्रातील विचारी लेखक दिग्दर्शकाने लिहिलेली शेती प्रश्नावरच्या चित्रपटाची कथा-पटकथा सरांनी वेळ देऊन पूर्ण वाचली, ऐकली आणि त्याला विश्लेषणात्मक पत्रही दिले.

अल्पसंख्यांकाच्या शैक्षणिक स्थितीगतीद्दल सर चिंतीत असायचे. आमच्या घरी जेवणानंतर त्यांनी पुस्तकांच्या कपाटात सच्चर समितीचा अहवाल पाहिला आणि वाचण्यासाठी घेऊन गेले. पुढच्याच महिन्यात कोल्हापुरात सच्चर समितीवर मांडणी केल्याची बातमी मला वाचायला मिळाली. चहुबाजुंनी डोळे उघडे ठेवत ज्ञान मिळवत राहायचे आणि पुन्हा जनतेला देत राहायचे हा त्यांच्यातील सत्यशोधकी शिक्षकाचा खाक्या होता.

तासगाव सहकारी साखर कारखाना राजकीय हितसंबंधांपोटी विकण्याचा घाट राज्यकर्त्यांनी घातला. सरांनी

स्थानिक दहशतीला न जुमानला संजय संकपाळ इत्यादी सहकाऱ्यांना बरोबर घेऊन कारखाना वाचवण्यासाठी लढा उभारला. यासंदर्भात एक दिवस माझ्याकडून धुळे जिल्ह्यातील साक्रीचा साखर कारखाना विक्री थांबवणाऱ्या सुभाष काकुस्तेंचा नंबर घेतला आणि त्यांच्याकडून साक्रीचा कारखाना वाचवण्यासाठी केलेल्या कामाची सर्व माहिती घेतली. नवीन परिस्थितीत लढण्यासाठी वयाने लहान कार्यकर्त्यांकडून माहिती घेण्यात या एकेकाळच्या सहकारमंत्र्यांना अजिबात कमीपणा वाटला नाही. त्यांनी साखर आयुक्त-शिखर बँक अधिकाऱ्यांची झोप उडवली. तासगाव सहकारी वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर 'विवेकवाहिनी', 'पथनाट्ये', 'जिंकू या दाही दिशा', 'शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ला', 'अधांतर'सारखी सामाजिक नाटकेही रयतच्या शैक्षणिक चळवळीचा भाग बनावी, अशी त्यांची कायम इच्छा राहिली. ज्ञानाशी त्यांची बांधिलकी अवर्णनीय होती. प्रवासातही त्यांचे वाचन सुरूच असायचे. शेकापच्या आमदार निवासासमोरील कार्यालयातील त्यांची खोलीही विविध कात्रणांच्या फाईली, निरनिराळ्या जी.आर. च्या फाईलींनी आणि पुस्तकांनी भरलेली असायची. कार्यकर्त्यांनीही अभ्यासाशिवाय बोलू नये हा त्यांचा कटाक्ष होता. तत्कालीन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या शेतकरी आत्महत्येसंदर्भातील अहवालाची एन. डी. सरांनी केलेली चिरफाड असो की, औरंगाबादला डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाने एन.डी. सरांना सन्माननीय डी. लिट. पदवी दिली. त्या समारंभात शिक्षणधोरण व व्यवहाराविषयी त्यांनी व्यक्त केलेले चिंतन असो किंवा साम्राज्यवादी जागतिकीकरणाच्या कालखंडातील लोकशाहीसमोरील आव्हानासंदर्भात विचारवेधमधील अध्यक्षीय भाषण असो, सरांच्या आंतरविद्याशाखीय व्यासंगाचा, सखोल अभ्यासू वृत्तीचा सतत प्रत्यय येत राही, हे सर्व चिंतन कष्टकरी जनतेच्या प्रश्नांपासून सुरू होई आणि लोकशाही मार्गाने त्याची उत्तरे मिळवण्याचा कृतिकार्यक्रम शोधत पुढे जात असे. या कृती आणि चिंतनाला मानवतेचा पाया होता. सार्वजनिक जीवनात कठोर दिसणारे एन. डी. सर व्यक्तिगत जीवनामध्ये हळवे होते. एका विद्वानाने त्यांच्यासंदर्भात अपमानजनक लिहिले आणि संकुचित पुरावेहीन लिखाण छापून सवयीप्रमाणे काहींनी वाटसरूंनी त्याची मजाही घेतली. सरांना ते खूप लागले. पण सरांच्या मनात ना लिहणाऱ्याबद्दल ना छापणाऱ्याबद्दल दोघांबद्दलही कधीही किल्मिष दिसले नाही. आपण एका भयावह प्रतिक्रांतीच्या उंबरठ्यावर आहोत त्यामुळे आपसातील व्यवहारिक मतभेदांचा फायदा प्रतिगामी शक्तींना होऊ नये, एवढे तरी पथ्य लोकांनी पाळावे असेच त्यांना वाटत असे. डॉ. नरेंद्र दाभोलकर व कॉ. गोविंद पानसरे यांच्या हौतात्म्यानंतर तर त्यांचे हे मत अधिक प्रस्तुत बनले आहे. शेकाप, रयत शिक्षण संस्था, सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी, शेतकरी आंदोलने, धर्मचिकित्सा करणाऱ्या कृती, अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, दुष्काळाविरोधी लढे, पाण्याचे संघर्ष अशा अनेक विषयांना त्यांनी हात घातला, त्यात वैचारिक हस्तक्षेप केला. लोकहिताच्या भूमिका पुढे नेण्यासाठी कृती केली. कष्टकऱ्यांनी लोकवर्गणीतून बांधलेल्या सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा व सत्यशोधक शेतकरी सभेच्या दहिवेल - (साक्री, जि. धुळे) व नवापूर (जि. नंदुरबार) येथील कार्यालयांचे उद्घाटन करण्यासाठी एन.डी.सर आले होते. चळवळीतील सातत्यता महत्त्वाची आहे म्हणत पाठीवर हात ठेवला. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली २०१२ मध्ये जीवनहक्क परिषदा धुळे जिल्ह्यात हजारोंच्या उपस्थितीत झाल्या. ते सत्यशोधकांच्या हाकेला ओ देत पुन्हा पुन्हा येत राहिले. शिक्षण हक्काची लढाई असो की, जमीन हक्काची एन.डी.सर शोषितांना संघर्षाच्या वाटेवर घेऊन अथकपणे चालत राहिले. जीवनाच्या सर्व क्षेत्रात धर्म-संस्कृती-अंधश्रद्धा असो की राजकारण-समाजकारण. वर्चस्व आणि शोषणाच्या विरोधात - विषमतेविरोधात लढलेच पाहिजे असे ते आम्हाला सांगत राहिले. म.फुलेंवरील त्यांचा एक दीर्घ लेख आणि रयतच्या औंध येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील (पत्रकार संपत मोरेने शब्दबद्ध केलेले) एक भाषण मासिक सत्यशोधक जागरतर्फे एकत्रितरित्या छापण्याची परवानगी प्रा. प्रतिमा परदेशी व सत्यशोधक प्रबोधन महासभेला त्यांनी मोठ्या मनाने दिली. भाई प्राचार्य टी.एस.पाटील व मी एन.डी.सरांना भेटलो. त्यांनी प्राचार्य टी.एस.पाटलांना सत्यशोधक प्रबोधन महासभेचे नेतृत्व करण्याची सूचना केली. भाई गणपतराव देशमुखांना आणि मला वीज मंडळ कर्मचाऱ्यांच्या वतीने लोकनेते कॉ. दत्ता देशमुख पुरस्कार मिळाला, त्यावेळी धुळ्यात झालेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भाई एन.डी.सरच होते. 'तुझ्या हद्दपारीला उतारा म्हणून हा पुरस्कार तू घे' असे डॉ. बाबा आढावांनी मला सांगितले आणि बाबा, कॉ. यशवंत चव्हाण, एन. डी. सर सर्वांनी धुळ्यात एकत्र हजर राहून लढ्याला पाठबळ दिले. जन चळवळींचे वकील आणि कायदेतज्ज्ञ ॲड. निर्मलकुमार सूर्यवंशी यांच्या पासष्टीच्या कार्यक्रमाला एन.डी. सर धुळ्यात आले. आजही आठवतंय, प्रचंड प्रवास करूनही प्रवासाचा शीण नाही की जेवणाबद्दल काही तक्रार नाही. आपल्या ज्ञान व कर्तृत्वामुळे दडपण येईल असा कोणताही भाव नाही. सरळ, साधा माणूस! बघणाऱ्याला प्रश्न पडावा की कोणत्या मुशीत घडलाय हा माणूस?

या वयात तुम्ही कोणते प्रश्न घेऊन उभे राहाता आणि लढत राहाता? तुम्हाला हे कसं शक्य होतं? असा प्रश्न ८५ वर्ष

वयाच्या आमच्या विचारवंत नेत्याला मंत्रालयासमोर एकानं विचारला. तेव्हा ते शांतपणे म्हणाले, ''मी शेतकऱ्याचा पोरगा आहे आणि शेतात गेलं की शेत काम काढतंच, अशी आमच्या आईबापांची शिकवण आहे. तसं जनतेत गेलं की जनतेचं दु:ख, वेदना, प्रश्न कळतात आणि ते सोडवण्यासाठी लढावेच लागते. त्यात वयाचा काय प्रश्न?'' हे एक किडनी निकामी झालेल्या, मधुमेह सोबतीला असलेल्या आणि खुब्यात एक रॉड बसवलेल्या आमच्या नेत्याचे उत्तर होते. १३ डिसेंबरला माईंच्या परवानगीने एकनाथ पाटील, टी. एस. पाटीलसर व मी एन.डी.सरांना भेटलो. शेवटची भेट. सर स्मरण-विस्मरणाच्या पलीकडे आणि मी म्हटलं, ''सर, तुम्ही दिलेली एकच नारा सात-बारा घोषणा आदिवासी जनतेत रुजत आहे.'' सरांनी ताडकन प्रश्न केला, ''मालकी मिळाली का मालकी?'' मग मी नेटाने बोलत राहिलो. सरांना गेल्या वर्षभरात चार वेळा दिल्ली किसान आंदोलनात सहभागी झाल्याचे सांगितले, आता शेतकरी जिंकले. मोदी सरकार माघारी गेले व लढाई संपल्याचे मी म्हटले न म्हटले तोच उसळून सर म्हणाले, ''लढाई कधीच संपत नसते!'' त्र्याण्णव वर्षाचा, थकलेल्या शरीराचा योद्धा विस्मरणाच्या धुक्यातून बाहेर येऊन, माझी चूक दुरुस्त करून, सांगून गेला लढाई कधीच संपत नसते!!

अज्ञान आणि विषमतेच्या विरोधात भारतीय सत्यशोधक पायावर उभी क्रांतिकारी बदलाची वैश्विक शास्त्रीय मार्क्सवादीदृष्टी सोबत ठेवावी लागेल, व्यवस्थेमध्ये आमूलाग्र परिवर्तनाची ती पूर्वअट आहे असे ते म्हणत. आपल्याबरोबर किती लोक आहेत? याचा विचार जसा आवश्यक आहे तसाच आपली भूमिका किती प्रामणिक आहे, हेही काकणभर जास्त महत्त्वाचे आहे. असे ते आम्हाला सांगत. 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता।' हा तुकोबारायांचा अभंग आणि 'सत्य सर्वांचे आदिघर- सर्वधर्मांचे माहेर।' हा म. फुले यांचा अखंड एन.डी. पाटील नावाच्या अंधश्रद्धा निर्मूलनासाठी स्वकीयांशी झगडणाऱ्या माणसाच्या भूमिकेचा पाया होता. आम्हाला त्यांचा आधार होता, मार्गदर्शन होते म्हणून प्रस्थापित सनातनी शक्तीविरोधातील लढाई लढू शकलो. आज त्यांच्या जाण्याने आमच्यासारख्या कार्यकर्त्यांचा-रयतेचा आधारवड गेला आहे. आम्ही पोरके झालो आहोत! आज त्यांनी सुरू केलेला शेतमालाच्या किफायतशीर किमतीचा लढा एमएसपी गॅरंटी कायद्यात परावर्तित करण्याची व हुकुमशाहीवादी सनातनी केंद्र शासनाच्या विरुद्धची लढाई पुढे नेणे हीच त्यांना आदरांजली असेल! म.फुले, शाहू, महर्षी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, क्रांतिसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, भाई उद्धवराव पाटील, भाई दाजीबा देसाई या परंपरेची एन.डी.सरांनी निष्ठेने - ठामपणे तळपत ठेवलेली विचारध्वजा पुढे नेणे, हीच त्यांना आदरांजली ठरेल!

'माझ्या माणसांनो,
विचारशक्तीला रजा नेऊ नका,
सरकारांचे गुलाम होऊ नका,
तुमच्यातील माणसाचा खून
सैतानालाच काय पण तुमच्या देवालाही करू देऊ नका'

ही जयंत गडकरींची कविता त्यांना खूप आवडायची. ते स्वत: विचार आणि कृतीत भेद न ठेवता आयुष्यभर याच विचारांनी चालत राहिले. खाचखळग्यांच्या कमी मळलेल्या वाटेने जात राहिले आणि आमच्यासाठी विचारांची शिदोरी देऊन, हाच सत्याचा मार्ग खडतर असला तरी चालत राहा म्हणून सांगत राहिले. राजकारणाला ठीक वळण देणाऱ्या नैतिक शक्तीच्या राजकीय यतींची कल्पना आचार्य जावडेकरांनी केलेली आहे. सरांसोबाबत ती संकल्पना जोडण्याचा मोह एखाद्या राजकीय अभ्यासकाला होईलही; पण एन.डी. पाटील त्यापेक्षा जास्त पुढे होते. यती संकल्पनेत राज्यकर्त्यांवर नैतिकतेचा दबाव एव्हढाच भाग मध्यवर्ती आहे. एन. डी. सरांमध्ये नैतिकतेसोबत अहिंसक संघर्षांतून समग्र व्यवस्था परिवर्तनाची भूमिका आणि क्रांतिकारी शास्त्रीय दृष्टीची आवश्यकता प्रतीत होत असे. महाराष्ट्राच्या पंच्याहत्तर वर्षांच्या सार्वजनिक जीवनावर त्यांची छाप उमटली आहे. काळ पुढे जाईल तसतशी एन.डी.पाटील नावाची सत्याची छाप गडद होत जाईल. या वडाच्या पारंब्याही मातीत खोलवर घुसत जातील आणि कष्टकरी, शेतकऱ्यांच्या लढ्यांना बळ देण्यासाठी विषमतेला सर्वंकष विरोध करण्यासाठी मातीत पाय रोवून घट्ट रोवून उभ्या राहातील!!

'सत्य की जय हो!'

(लेखक सत्यशोधक शेतकरी सभा व सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेचे जीवनदानी कार्यकर्ते आहेत.)

●



# प्रत्येक क्षण जिंदादिलीने भरलेले कृतार्थ जीवन

उल्का महाजन
९८६२३२४७८

"अनेक अटीतटीच्या प्रसंगातून मार्ग काढण्याचे एन.डी.सरांचे कसब हे स्पष्ट वैचारिक बैठकीवर आधारलेले होते. वैज्ञानिक दृष्टिकोन, त्याला विवेकाची जोड आणि परिस्थितीचे, समाजाचे सतत जवळून वाचन यांमुळेच त्यांना हे साध्य झाले. सध्याच्या काळात माणसांच्या कर्तृत्वाची ओळख त्यांनी किती पदे भूषवली, यावरून दिली जाते. एन. डी सरांनी अनेक संस्थांची पदे भूषवलीच; पण ती त्यांची खरी व पूर्ण ओळख नाही. त्यांनी आयुष्यभर कशासाठी व किती वेळा झुंज घेतली यावरून इतिहास त्यांची नोंद ठेवेल. तीच त्यांची खरी ओळख आहे. सत्तापदांवर राहून त्यांनी संपत्ती/ मालमत्ता उभी केली नाही; पण महाराष्ट्रभर कार्यकर्ते, कष्टकरी, शेतकरी बांधवांच्या मनात जी स्वत:ची जागा तयार केली तीच त्यांच्या आयुष्याची खरी कमाई आहे."

ज्यांच्या जगण्याकडे पुन्हा पुन्हा वळून पाहावे, त्यातून आपल्या वाट्याला आलेले क्षण परत उजळून पाहावेत असे अनोखे व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रा. एन. डी. पाटील. अशी माणसे आयुष्यात येणे ही एक पर्वणीच ठरते. त्यांच्याबरोबर काम करायला मिळाले. संवाद साधता आला. शिकता आले, ही आयुष्याने मोलाची संधी दिली त्याबद्दल मी मनापासून कृतज्ञ आहे. लहानपणापासून प्रतिकूल परिस्थितीशी सामना करत एन. डी. आयुष्याच्या पायऱ्या चढत राहिले. स्वत:चे प्रभावक्षेत्र व आस्थेची क्षेत्रे विस्तारत राहिले. समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा हा प्रवास त्यांनी जाणतेपणी, विवेकाची कास न सोडता पार केला. आयुष्याचा पर्वत चढून त्यांच्या नजरेचा आवाका विस्तारत नेला म्हणून ते अनेक कार्यकर्त्यांसाठी दीपस्तंभ ठरले.

स्पेशल इकॉनॉमिक झोनविरोधात राज्यभर लढे उभारण्याच्या प्रवासात एन. डी. पाटील सरांबरोबर फिरण्याची संधी मिळाली. तो प्रवास कायम लक्षात राहील. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील अनेक आठवणी, आणीबाणीच्या काळातील अनेक किस्से, ते सहकार मंत्री असतानाचे अनुभव ऐकत तो प्रवास संस्मरणीय झाला.

त्यांच्या अनेक आठवणींपैकी आजपण डोळ्यांत अश्रू आणणारी आठवण म्हणजे रिलायन्सच्या रायगडमधील सेझविरोधी लढ्याच्या निर्णायक टप्प्यावरची. त्यावेळचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी जाहीर केले. रायगडमध्ये रिलायन्सच्या सेझसाठी शेतकरी जमीन द्यायला खरोखर तयार आहेत की नाहीत हे तपासण्यासाठी जनमत चाचणी घेण्यात येईल. आम्ही हा प्रस्ताव स्वीकारावा की नाही या संभ्रमात असताना एन. डी. सरांनी स्पष्ट केले की, आम्ही या कसोटीला सामोरे जाणार आहोत. ही भूमिका उलगडताना त्यांनी सांगितले, आपल्याकडे सत्य आहे. सत्य जितक्या वेळेला कसोटीला सामोरे जाईल, तेवढ्या वेळा अधिक उजळून बाहेर येईल. मग घाबरायचं कशाला?

गावागावांत तयारी सुरू झाली. प्रत्येक घरात जाऊन आम्ही शेतकऱ्यांची भूमिका समजून घेत होतो. त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देत होतो. शेवटच्या दिवशी आम्ही एक धावता दौरा काढला. सर्व गावांची तयारी पाहाण्यासाठी त्या दिवशी प्रा. एन.डी. पाटील पण पेणमधे येऊन पोहोचले. संध्याकाळनंतर तेही आमच्याबरोबर गावागावांत आले. ज्या लढ्याचे एन. डी. सर नेतृत्व करत त्या लढ्याच्या प्रत्येक अटीतटीच्या प्रसंगात ते आवर्जून उपस्थित राहात. कंपनीच्या दलालांनी सेझचे समर्थन करणारे मत नोंदवण्यासाठी दहा हजार रु. प्रतिशेतकरी जाहीर केले होते. पैशांचे वाटप रात्री होण्याची शक्यता होती. ते जाणून गावोगावच्या कमिट्यांनी आपली गस्त घालणारी तरुणांची पथके तयार केली होती. रात्री कुणीही बाहेर फिरताना दिसला तर सरळ दगड बसेल अशी हवा तयार केली गेली. फॉर्म भरण्याचे काम गटागटांना वाटून त्यांना एकेका विभागाची, गल्लीची जबाबदारी देण्यात आली होती. त्यात काही शंका असल्यास त्याचे निरसन करण्याचे कामही आम्ही करत होतो. सर्व गावकमिट्यांकडे आमच्यापैकी दोन-चार जणांचे नंबर होते. काही अडचण आल्यास फोन करण्यासाठी सर्वजण उत्साहात व जोशात होते. निवडणुकीसारखीच धामधूम होती; पण यात सर्वसामान्य शेतकरी जगण्याचाच प्रश्न असल्याने स्वयंस्फूर्तीने सामील होते. आम्ही रात्री या गावांमधून बाहेर पडताना आम्हाला गावाबाहेर दलालांच्या गाड्या थांबलेल्या दिसल्या. त्यांची गावात उघडपणे जाण्याची हिंमत नव्हती. रात्री उशिरा आम्ही पेणला परतलो. दुसऱ्या दिवशी २१ सप्टेंबर


२००८ ला सकाळी आठ वाजता जनमत चाचणीची सुरुवात होणार होती. आम्हा सर्वांवरही या प्रक्रियेचा ताण होता. एका मूलभूत अशा लोकशाही प्रक्रियेला आम्ही सामोरे जात होतो. एकापरीने ती आम्हा सर्वांचीच परीक्षा होती.

सकाळी निघताना आम्ही एन.डी. पाटलांच्या पाया पडलो. ते, मी, सुरेखा दळवी आणि वैशाली पाटील, आम्ही चौघे एकत्र निघालो. एन.डी. पाटलांनी मायेने आम्हाला जवळ घेतले. सर्वांच्याच डोळ्यांत पाणी होते. एका मग्रूर, धनदांडग्या उद्योगसमूहाच्या 'कर लो दुनिया मुठ्ठी में' अशा माजाच्या आक्रमणाविरुद्ध कुठलीही सत्ता हाती नसताना, जनमताच्या जोरावर आपले जगणे आणि लोकशाही वाचवण्यासाठी उभ्या राहिलेल्या लढ्याचे आम्ही भागीदार होतो. एरवी लढणारी सारी मंडळी समानता मानतो. ज्येष्ठ, कनिष्ठ असा भेदभाव त्यात मानत नाही. पाया पडणे तर सरंजामी मानसिकतेचे मानतो. पण एन.डी. पाटील आम्हाला वडिलांप्रमाणे. परीक्षेला निघताना मोठ्यांच्या पाया पडावे या आपसूक संस्काराने आम्ही त्यांना नमस्कार केला. ते आम्हा सर्वांचेच आधारस्तंभ होते. सत्तेच्या आवारात वावरूनदेखील ज्यांच्या डोळ्यातील पाणी आटत नाही ते विरळा नेते असतात. मनातील सहृदयता व निर्णयातील खंबीरपणा टिकवून ठेवलेले दुर्मिळ नेतृत्व होते ते. ज्येष्ठ वय व त्यामुळे असलेल्या सर्व शारीरिक व्याधींकडे दुर्लक्ष करत ते सतत कार्यरत होते. कार्यकर्त्यांच्या घरातील दु:खाच्या, अडचणीच्या प्रसंगात जातीने उपस्थित राहून धीर देत, प्रसंगातून मार्ग काढायला मदत करत. रिलायन्सविरोधी लढ्यातील एक बिनीचा कार्यकर्ता गणेश ठाकूर व सुझलॉनविरोधी लढ्याचे नेतृत्व करणारा किशोर ढमाले दोघांना त्यांच्या जिल्ह्यातून हद्दपार करण्याचा तेथील महसूल अधिकाऱ्यांनी डाव खेळल्यावर मंत्रालयापर्यंत पोचवून त्यांची हद्दपारी रद्द करेपर्यंत एन. डी. सर शांत बसले नाहीत. या काळात रिलायन्सच्या परिवारातील अनेक अधिकाऱ्यांनी त्यांना भेटण्याचा, त्यांचे मन वळवण्यासाठी त्यांना गाठण्याचा प्रयत्न केला. पण ते बधले नाहीत. त्यांनी भेटायला पण नकार दिला. कुठलाही लढा लढवताना विचारांशी, मूल्यांशी तडजोड तर नाहीच. तसेच आपल्या एकूण व्यवहाराप्रति, कुठलीही शंका घ्यायला वाव राहू नये इतकी स्पष्टता त्यांच्या वागण्यात नेहमीच असायची. त्यामुळे एन. डी. पाटील यांनी एखाद्या लढ्याचे नेतृत्व स्वीकारले म्हणजे कार्यकर्ते निर्धास्त होत आणि विरोधक काळजीत पडत. आधुनिक काळातील विविध लढ्यांचे सरसेनापतीपद म्हणूनच त्यांना राज्यभरातील कार्यकर्त्यांनी बहाल केले होते.

त्यांचे व्यापक भान दिसून येई जेव्हा ते त्यांच्याच विविध उपक्रमाची एकमेकांशी सांगड घालत. म्हणजे रयत शिक्षण संस्थेचे ते कार्यकारी अध्यक्ष होते. त्या संस्थेच्या कॉलेजेसमध्ये ते आमच्यासारख्या अनेक कार्यकर्त्यांना घेऊन जात. आमची मांडणी, अनुभव तेथील विद्यार्थी आणि प्राध्यापक, शिक्षकांना सामाजिक भान आणण्यासाठी ऐकायला लावत. स्वत: सतत नवीन मांडणी, अनुभव ऐकण्यासाठी उत्सुक असत. कोणत्याही भाषणाची तयारी करत, मुद्दे लिहून काढत. दोन दोन तास भाषण चालले तरी कोणी उठून जात नसे हा अनुभव मी स्वत: अनेकदा घेतला आहे. ते शेतकरी कामगार पक्षाचे नेते असले, तरी स्वत:च्या पक्षाच्या भूमिका तत्त्वाच्या कसोटीवर टिकल्या नाहीत तर त्याविरोधातदेखील स्पष्ट भूमिका घेत. तसेच डाव्या आघाडीतील अन्य पक्षांचे निर्णय, भूमिका पटल्या नाहीत तर त्याविरोधात रोखठोक बोलण्यास ते मागेपुढे पाहात नसत. सन २००४ मध्ये विलासरावांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात निर्माण झालेल्या अटीतटीच्या परिस्थितीत शेतकरी कामगार पक्षाच्या सर्व मंत्र्यांनी राजीनामे देऊन सरकारमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. या परिस्थितीला कारणीभूत ठरले होते. राष्ट्रवादी पक्षाच्या स्थानिक नेत्यांचे आपमतलबी राजकारण. पण काँग्रेसचे आघाडी सरकार कोसळून जातीयवादी, धर्मांध पक्षाची अर्थात भाजपप्रणित सत्ता येऊ नये म्हणून शेकापने मंत्रीपदाचे राजीनामे दिले, तरी पाठिंबा कायम ठेवला होता. या निर्णयाचे प्रमुख सूत्रधार होते स्वतः प्रा. एन.डी. पाटील. विलासरावांचे सरकार तेव्हा केवळ या निर्णयामुळे आणि एन.डी. पाटलांच्या स्पष्ट भूमिकेमुळे बचावले होते. अशा अनेक अटीतटीच्या प्रसंगांतून मार्ग काढण्याचे त्यांचे कसब हे स्पष्ट वैचारिक बैठकीवर आधारलेले होते. वैज्ञानिक दृष्टिकोन, त्याला विवेकाची जोड आणि परिस्थितीचे, समाजाचे सतत जवळून वाचन यामुळेच त्यांना हे साध्य झाले. सध्याच्या काळात माणसांच्या कर्तृत्वाची ओळख त्यांनी किती पदे भूषवली, यावरून दिली जाते. एन. डी सरांनी अनेक संस्थांची पदे भूषवलीच; पण ती त्यांची खरी व पूर्ण ओळख नाही. त्यांनी आयुष्यभर कशासाठी व किती वेळा झुंज घेतली यावरून इतिहास त्यांची नोंद ठेवेल. तीच त्यांची खरी ओळख आहे. सत्तापदांवर राहून त्यांनी संपत्ती/ मालमत्ता उभी केली नाही; पण महाराष्ट्रभर कार्यकर्ते, कष्टकरी, शेतकरी बांधवांच्या मनात जी स्वत:ची जागा तयार केली तीच त्यांच्या आयुष्याची खरी कमाई आहे.

अशा नि:स्पृह, व्यासंगी, ऋषितुल्य, पितृतुल्य नेत्याला भावपूर्ण आदरांजली आणि आमचे जगणे उजळून टाकल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद.

●



# विज्ञान, निर्भयता, नीती शब्दांचे खरेखुरे मानवी रूप

डॉ. प्रदीप पाटकर
९८६९४७२२१५

> “जीवनात बापमाणसे अनेक क्षेत्रांत भेटली. काही जवळ आली, काही मनात राहिली, काही जवळ येता येता दुरावली. पण एनडींचे मनातले स्थान जराही बदलले नाही. मनाचा तो कोपरा पाहाता पाहाता, समाज जाणून घेत असताना जीवनदृष्टी देणारे, सतत समाजभान जागविणारे एक प्रशस्त दालन होत गेले. आज आभाळमायेला पारखे झालो आहोत, हे निश्चित; पण सामाजिक प्रश्नांबाबतची त्यांनी आमच्या मनात जागविलेली निष्ठा सतत टिकून राहील, यात मला शंका वाटत नाही. एनडी मनात खोलवर रुजले आहेत, त्यांची उणीव समाजाला जाणवेल. आता अधिक तीव्रतेने जाणवेल; पण आमच्या मनातील एनडी आमच्यासोबत सतत राहातील, मार्गदर्शन करत राहातील. आमच्या खांद्यांवर मोठी जबाबदारी सोपवून एनडी आपल्यातून गेले. जाता जाता मनातच खूप अधिक खोल रुजले!”

सर एन.डी.पाटील उर्फ आमचे दाजी यांसारखे व्यक्तिमत्त्व या आयुष्यात मला पाहायला, बोलायला, ऐकायला मिळणे हे बाकी नेहमीच्या माझ्या सर्वसामान्य आयुष्याचे एक भव्यदिव्य वैशिष्ट्य आहे. असा निर्भय, कर्तव्यनिष्ठ, निःस्पृह, अपार मेहनती, सर्वांप्रति प्रेमळ, चाणाक्ष, व्यासंगी, सतत वैज्ञानिक दृष्टिकोन मनात ठेवून समाजकारण व राजकारण करणारा महामानव इतकी वर्षे जवळून जाणून घेता येणे यापेक्षा आणखी काय मोठा सन्मान आयुष्याने करावा? विज्ञान, निर्भयता, नीती शब्दांचे खरेखुरे मानवी रूप होते आपले एन.डी.!!

गरुडाने पिल्लांना आपल्या विशाल पंखांखाली सांभाळून घ्यावे, मायेची पाखर द्यावी, वेळोवेळी जीवन कसे जगायचे असते, ते शिकवावे तसे हे व्यक्तिमत्त्व. मायेने सावरणारे आणि योग्य वेळी पिल्लाला पंख पसरून उडायला सांगणारे प्रसंगी कर्तव्यकठोर शिक्षक होणारे एन.डी. हे व्यक्तिमत्त्व भारदस्त असे की, समोर आले की शब्द फुटू नयेत आपल्या तोंडातून आणि कान आसुसलेले व्हावेत त्यांना ऐकण्यासाठी. प्रश्न ओळखीचा असो वा नसो, एनडींचे वक्तृत्व त्या प्रश्नाचे जटिल स्वरूप सोप्या, रांगड्या, स्पष्ट लोकभाषेत समोर मांडून तो आजवरचा दूरस्थ प्रश्नही कार्यकर्त्यांच्या जीवित ध्येयाचा भाग बनवून टाकीत. हे प्रश्न आपल्या कार्यक्षेत्रातले नाहीत, ही काही वेळापूर्वीची मनातली समज ऐकता ऐकता सहज बदलायची. त्या प्रश्नाचा आपल्या समाजपरिवर्तनाशी नेमका किती जवळचा संबंध आहे, हे एनडी दाखवून द्यायचे. महाराष्ट्रातील आंदोलने अभ्यासावीत, तर अशा कित्येक आंदोलनात एनडी मार्गदर्शक म्हणून सामोरे असायचे. बापाने मुलाकडे व्यवसायतंत्रे सोपवावीत तसे ते शिकवीत व सामाजिक राजकीय प्रशिक्षण सहजरीत्या स्वीकारता येणारे करून, कार्यकर्त्याला आपले आपलेसे करून टाकीत.

जीवनात बापमाणसे अनेक क्षेत्रात भेटली. काही जवळ आली, काही मनात राहिली, काही जवळ येता येता दुरावली. पण एनडींचे मनातले स्थान जराही बदलले नाही. मनाचा तो कोपरा पाहता पाहता, समाज जाणून घेत असताना जीवनदृष्टी देणारे, सतत समाजभान जागविणारे एक प्रशस्त दालन होत गेले. आज आभाळमायेला पारखे झालो आहोत, हे निश्चित; पण सामाजिक प्रश्नांबाबतची त्यांनी आमच्या मनात जागविलेली निष्ठा सतत टिकून राहील, यात मला शंका वाटत नाही. एनडी मनात खोलवर रुजले आहेत, त्यांची उणीव समाजाला जाणवेल. आता अधिक तीव्रतेने जाणवेल; पण आमच्या मनातील एनडी आमच्यासोबत सतत राहातील, मार्गदर्शन करत राहातील. आमच्या खांद्यांवर मोठी जबाबदारी सोपवून एनडी आपल्यातून गेले. जाता जाता मनातच खूप अधिक खोल रुजले!

झाडावरची पाने, फुले, गळतात तेव्हा देठाला झाडाने केलेल्या आर्जवाचे काय होत असेल? आपलेच आधारवड निसर्गक्रमाने आपली आभाळमाया आपल्यावर पांघरूण आपला निरोप घेतात, तेव्हा त्यांच्या या छायेखाली सुरक्षित वाढणाऱ्या चळवळीच्या रोपट्यांचे, अनेक वर्षे या सुखावह पालकवृक्षाखाली मोठे होत जाणाऱ्या कार्यकर्त्यांची मनोवस्था आज काय असेल? कसे पुसत असतील ते एकमेकांचे अश्रू?

मी ५-६ वर्षांचं पोर असताना शाळेत प्रवेश घेतला तेव्हा स्वातंत्र्यसंग्राम आटोपून एनडी उर्फ दाजी राष्ट्र उभारणीत गुंतले होते. २२ वर्षांनी मी शालेय, पदवी व पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आणि प्रश्न निर्माण करणाऱ्या मुलांमाणसांच्यात नमनाचा अभ्यास करता करता सामाजिक प्रश्न समजून

घेण्यासाठी, समाजभानाच्या प्रांगणात वावरू लागलो. तेव्हाही समोर दाजी समाजउभारणीत अविरत कार्यरत असलेले दिसत होते! त्यानंतरही ४० वर्षे म्हणजे आजपावेतो, हा दीपस्तंभ अंधारात, वादळात सापडलेल्या जनसामान्यांना योग्य दिशा दाखवीत राहिला.

मला स्वत:ला तेव्हा कुठे समाजातील कष्टकऱ्यांचे स्वातंत्र्यप्राप्ती ते राष्ट्र उभारणीतील योगदान अर्धवट समजू लागले होते. राष्ट्रातील सर्वात खालच्या आर्थिक सामाजिक स्तरावरचा माणूस कसा जगतो आहे, हे एनडींसारख्या इतरही समाजसुधारकांकडून नीटसे जाणवू लागले. मन घेऊन जन्माला यायचे आणि जगण्याच्या परवडीत आपले विचार, आकांक्षा, भावभावना चिरडून जाताना पाहात तगण्यापुरते कसेतरी जगायचे आणि तरीही राष्ट्रसंगोपनात, राष्ट्रउभारणीत आपल्या अमाप कष्टाचे योगदान स्वत:च्याही नकळत देत राहायचे, हे कष्टकऱ्यांच्या ललाटावरचे अदृष्ट लिखाण वाचता येऊ लागले ते एनडींसारख्या आदर्श, कृतार्थ जीवन जगणाऱ्या योग्यांच्या मार्गदर्शनाने!

मध्यमवर्गीय सुखाने मिटलेले डोळे उघडून आपल्या उपकारकर्त्या कष्टकऱ्यांकडे कसे पाहायचे, कशाप्रकारे त्याला त्याच्या संकटकाळात सोबत करायची, त्याचे अश्रू कसे पुसायचे, त्याचवेळी त्याला कराव्या लागणाऱ्या संघर्षाची कारणमीमांसा त्याच्या भाषेत समजावून देत, त्याला संघर्षासाठी कसे उभे करायचे, कशी सोबत करायची हे सारे त्यांनी प्रत्यक्ष तसे जगून दाखविले आणि आमच्यासमोर जीवनार्थाचा आदर्श उभा केला.

संपूर्ण वेळ व ऊर्जा ग्रासणाऱ्या वैद्यकीय जीवनात जमेल तसे जमेल तितके, जमेल तेव्हा, प्रबोधन व संघर्षकार्यात उतरण्याची प्रेरणा या थोर व्यक्तींनी मला दिली. स्वार्थासारख्या महाफसव्या रिपुशी अंतर्मनात संघर्ष करीत चळवळींमध्ये उतरायची प्रेरणा दाजींसारखे निःस्पृह, कर्तव्यदक्ष, स्वार्थ-परायण, व्यासंगी, धुरंधर महामानव आयुष्यभर आम्हा अनेक कार्यकर्त्यांना देत राहिले. हे स्ववेळ कार्यकर्त्यांना मी पूर्णवेळ कार्यकर्त्यांइतकेच महत्त्वाचे मानतो. तेही एनडींना पाहात पाहात शिकलो. स्वभान व कुटुंबभान विसरून कामात पूर्णवेळ उतरण्याची संधी व पर्याय अशा काही काळ काम करणाऱ्या सर्वांनाच उपलब्ध नसते. समाज सदैव समोर पाहातो ते पूर्णवेळ कार्यकर्ते. पण रोजगार बुडवून मोर्चा धरण्यात उतरलेला/कष्टकरी व मध्यमवर्गीय कार्यकर्ती/कर्ता समाजासमोर फारसा येत नाही. सबब नोंद घेण्याइतका तो इतरांच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरत नाही. अशा अनेक कार्यकर्त्यांविषयी काय प्रेममय आदराची भावना सतत अंतरात ठेवावी, त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे एनडी! त्यांच्या नजरेतील तो प्रेमयुक्त आदरभाव अशा कित्येक कार्यकर्त्यांना जीवनभर प्रेरणा व ऊर्जा देत आला आहे.

विशेषत: महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीतील कार्यकर्त्यांना हे विशेष जाणवत आले आहे. विवेक व निःस्वार्थ जपणे वर्षानुवर्षे काम करूनही जमत नाही, अशी अनेक मने आढळतात. ती चळवळीला हानीकारक ठरतात; पण एनडींसारखा आधारस्तंभ अशावेळीही तुफान वादळातील दीपस्तंभासारखा मार्गदर्शन करीत राहातो, पुढील कार्याची प्रेरणा देतो, दिशादर्शन करतो, अंतरीच्या जखमा विसरून कामाला लागण्याचा निर्धार देतो. स्वतः त्यांनी उत्तुंग आदर्श तर पाहिले होतेच; पण त्याचबरोबर फुटीर स्वार्थी नेते व कार्यकर्तेही त्यांच्या तीक्ष्ण नजरेने जाणले होते. त्या सर्वांना सोबत कसे घ्यायचे, सुधारक कामे त्यांच्याकडून कशी करून घ्यायची, नाइलाजाने ध्येयपूर्तीसाठी असंगाशी संग ठेवावा लागत असेल, तर विचारांशी व भूमिकेशी तडजोड न करता, कार्यसिद्धीपर्यंत कसे जायचे, हे ते अत्यंत चाणाक्षपणे, चातुर्याने, मोजक्या शब्दात समजावून द्यायचे. विरोधी पक्षांच्या ताकदीचा पूर्ण अंदाज घेऊन लढा कसा मजबूत करायचा, याचे ठायी ठायी मजबूत शिक्षण एनडींच्या मार्गदर्शनात मिळत राहायचे. हातपाय गाळायचे वा काम टाळायचे हे त्यांनी कधी मान्य केले नाही, स्वीकारले तर नाहीच नाही. पण मार्ग चुकणाऱ्या कार्यकर्त्याला वेळीच सावरून घ्यायचा संदेश एनडींच्या सोबत केलेल्या संवादातून मिळत राहायचा !

प्रबोधन, संघर्ष, नैतिक सामाजिक भूमिका, नि:स्वार्थी राजकारण, चळवळ बांधणी, आयुष्यभराचे योगदान अशा अनेक गोष्टींचे आदर्श एनडींनी आपल्यासमोर उभे ठेवले आहेत. वाट चुकलेल्यांना सावरून घेत पुन्हा कार्यात सामावून घेणे व उन्नत विवेकी समाजउभारणीचे कार्य कसे करीत राहायचे याचे वस्तुपाठ त्यांच्या कामातून आपल्यासमोर येत असत.

एनडींना विसरता येणार नाही. त्यांची शिकवण मात्र कदाचित कालौघात काहीजण विसरून जाऊ शकतात. ते होऊ नये असे वाटत असेल, तर एनडींचे मार्गदर्शन कार्यकर्त्यांच्या मनात सतत जागे ठेवण्याचे काम आपण साऱ्यांनी केले पाहिजे. पृथ्वीमोलाची अशी माणसे आपल्याला खूप काही समजावून, शिकवून, निसर्गक्रमाने आता आपल्यापासून दुरावली आहेत. प्रबोधनात या साऱ्यांचे मार्गदर्शन वेळोवेळी स्मरून आपण सारे पुढे जाऊया.

या निमित्ताने संघर्ष व लोकप्रबोधन कार्यातील सर्व कार्यकर्त्यांना, पुन्हा एकदा, दुरावलेल्या अंनिस कार्यकर्त्यांना ऐक्याचे आवाहन करीत मी एनडींना अश्रुपूर्ण आदरांजली वाहातो. जनतेचे अश्रू त्यांच्यापर्यंत सतत पोहोचले, आपले हेही अश्रू मनात त्यांच्या स्मृतींना आयुष्यभर भिजवित राहातील.

●



# एक लढवय्या नेता आणि महाराष्ट्र ‘अंनिस’चा आधारवड गेला!

माधव बावगे
९४०४८७०४३५

“

”

दि. १७ जानेवारी रोजी ‘भाई एन. डी. पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन’ ही बातमी पसरली. सुरुवातीला विश्वासच बसला नाही. कारण या अगोदर ही अशी बातमी येऊन गेली होती. पण यावेळची बातमी खरी होती. महा.अंनिसचा कार्यकर्ता म्हणून आम्हा सर्व कार्यकर्त्यांसाठी ही बातमी अत्यंत वेदनादायी होती. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी अतिशय कल्पकतेने १९८९ मध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रवाहाच्या विरोधातील काम सुरू केले. अर्थातच, या कामासाठी समाजमान्य व्यक्तींच्या पाठबळाची आवश्यकता होती. एन. डी. सरांनी या चळवळीचे अध्यक्षपद स्वीकारावे, हा आग्रह होता. एन. डी. सर हे आचार, विचार आणि कृतीने अंधश्रद्धाविरोधी विचाराचेच असल्याने त्यांनी ही विनंती मान्य केली. ती फक्त पदापूर्तीच नव्हती, तर ते कृतिशील अध्यक्ष राहिले.

एन. डी. पाटील सर हे राजकीय दृष्टिकोनातून शेतकरी कामगार पक्षाचे शीर्षस्थ नेते होते. त्यांच्यात वैचारिक प्रगल्भता आणि परिपक्वता होती. त्यांच्यावर महात्मा गौतम बुद्ध, चार्वाक, संत तुकाराम, गाडगेबाबा, महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिकारी भगतसिंग, क्रांतिसिंह नाना पाटील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुरोगामी परिवर्तनवादी विचाराचा प्रभाव होता.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून भाई एन. डी. पाटील सर आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या समवेत विविध कार्यक्रम, धरणे, आंदोलने, मोहिमा परिषदांच्या माध्यमातून काम करण्याची संधी मिळाली. या दोघांचा आणि पुढे अविनाश पाटील यांचाही महा. अंनिसच्या लातूर केंद्राशी फार जिव्हाळा होता. १३ डिसेंबर १९९८ ला उपेक्षितांची शिक्षण परिषद, ३० जून, १ जुलै २००१–वैज्ञानिक जाणीवा कृती परिषद, २७,२८ नोव्हेंबर २००४– अंधश्रद्धा निर्मूलन महिला जाहीरनामा संकल्प परिषद, २१ मार्च २०१०– शासनाच्या धान्यापासून दारूनिर्मिती धोरणविरोधी परिषद, २८,२९ नोव्हेंबर २०१०– वारसा समाजसुधारकांचा अंधश्रद्धा निर्मूलनाचा विवेकाचा युवा संकल्प परिषद या सर्व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या लातूर जिल्हा केंद्राने आयोजित केल्या. या काळात राज्यस्तरीय परिषदासाठी आदरणीय एन. डी. पाटील सर हे लातूरला आलेले होते.

एन. डी. सर यांच्या उक्ती आणि कृती यामध्ये कधीही अंतर नसायचा. कोणत्याही स्वरूपाच्या अंधश्रद्धांना त्यांच्या व्यक्तिगत आणि सार्वजनिक जीवनात मुळीच स्थान नव्हते. ना नवस, ना ज्योतिष, ना कुठल्या मंदिरात प्रवेश नाही, ना कुठलेही कर्मकांडात ते अडकून राहिले नाहीत. जाणीवपूर्वक ते कधीही गुलाल, गंध, भंडारा आपल्या कपाळावर त्यांनी लावून घेतलेला नाही. मंत्री झाल्यानंतर ही आपल्या हस्ते साग्रसंगीत भूमिपूजन होता कामा नये, अशी जाहीर भूमिका ते घेत असत. अशा स्वतःच्या कृतिशील वर्तनातून आणि परखड मांडणीतून चळवळीला दिशा देणारे ते नेतृत्व होतं.

जादूटोणाविरोधी कायद्याच्या निर्मितीसाठी सातत्याने निवेदने, धरणे आंदोलने, परिषदांच्या माध्यमातून पाठपुरावा

चालू होता. मा. सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री असताना १५ ऑगस्ट २००३ रोजी बुवाबाजी, मंत्रतंत्र या बेड्यातून मुक्त करणारा जादूटोणाविरोधी कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य अशी जाहिरात राज्यशासनाच्यावतीने सर्व वर्तमानपत्रांना दिली गेली. प्रत्यक्षात कायदा लागू झाला नव्हता. तेव्हा भाईंनी सरकारला धारेवर धरले होते. तेव्हा सरकारने कायदा मंजूर होईपर्यंत जादूटोणा व तत्सम अंधश्रद्धेची व्याप्ती व कारणे शोधून उपाययोजना सुचविण्यासाठी १० फेब्रुवारी २००४ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य शासकीय समितीची स्थापना केली. या समितीचे अध्यक्षपद एन. डी. पाटील यांना देऊन राज्यमंत्र्यांचा दर्जा व लालदिव्याची शासकीय गाडी राहील, असे जाहीर केले होते. या समितीचे अध्यक्ष म्हणून भाई एन. डी. पाटील, उपाध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर समवेत आणखी आठ असे अजून दहा सदस्य असलेली समिती याच शासन निर्णयाने गठित केली होती. त्या समितीत अविनाश पाटील यांसह माझी मराठवाडा विभागाचा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती होती. या शासकीय समितीच्या पहिल्या बैठकीतच राज्यमंत्र्यांचा दर्जा व लालदिव्याची गाडी नाकारण्याचा निर्णय घेतला व १७ जून २००४ रोजी तशी दुरुस्ती करण्यास भाग पाडले गेले. या व अशा अनेक प्रसंगावरून कुठल्याही अमिषाला बळी न पडणारे भाई एन. डी. सर आपणास दिसून येतात. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना नागपूर अधिवेशनात जादूटोणाविरोधी कायदा सभागृहात मंजूर करण्यासाठी माझ्या मतदारसंघात उपोषण चालू आहे. त्यामुळे हा कायदा मजूर करण्यासाठी त्यांना बळ मिळावे, त्यांना तसे कारण सांगता यावे म्हणून जादूटोणाविरोधी कायद्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि माधव बावगे यांनी लातुरात महात्मा गांधींच्या पुतळ्यासमोर १० दिवसांचे उपोषण केले. त्यावेळी प्रा. एन. डी. पाटील सर आणि अविनाश पाटील हे नागपूरमध्ये विधानभवनात कायद्यासाठी पाठपुराव्याची खिंड लढवत होते.

शिक्षण हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय होता. लातूर उपेक्षितांची शिक्षण परिषदेत बोलताना ते म्हणाले की, 'अभिजन शिकत गेले, बहुजन शिक्षणापासून वंचित राहिले. समाजाची ९४ टक्के बुद्धिमत्ता आजही शिक्षणापासून वंचित आहे. फक्त सहा टक्केच मुले उच्च शिक्षणासाठी येतात. लक्षावधी कुटुंबे अशी आहेत की, ज्यांची मुले महाविद्यालयामध्ये फिरकलेच नाहीत. हे चित्र बदलून श्रमाशिवाय भाकरी मिळत नाही, असे शिक्षण उपलब्ध करून द्यायचे असेल तर सामाजिक रेटयाशिवाय, संघटन प्रयत्नाशिवाय पर्याय नाही' ते म्हणाले.

वैज्ञानिक जाणिवा कृती परिषदेच्या समारोप प्रसंगी प्रा. एन. डी. पाटील सर म्हणाले की, 'समाजजीवनाशी सांगड घालता यावी अशा पद्धतीच्या अभ्यासक्रमाची सध्या गरज असल्याने क्रमिक अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल करून यातून विज्ञाननिष्ठा कशी वाढवता येईल, याचा विचार करण्याची नितांत गरज आहे. विज्ञानाच्या संशोधनात पीएच. डी.; तसेच उच्च पदव्या मिळवलेल्यांनी सत्यनारायण घातले, तर मिळवलेल्या डिग्र्या नैतिकतेच्या दृष्टिकोनातून परत कराव्यात', असे ठणकावून सांगितले.

महिला जाहीरनामा संकल्प परिषदेत स्त्री-पुरुष समतेचा विचार प्रभावीपणे मांडला. शिक्षित स्त्रिया जर कर्मकांडात गुंतल्या, तर त्यांनाही खडे बोल सुनावले. धर्माच्या आडून लोकांना दैववादी व कर्मकांडात गुंतवले जाते त्याबद्दल एन. डी. सर म्हणायचे, 'धर्म ही अत्यंत व्यक्तिगत आणि निव्वळ खाजगी बाब आहे. धर्माच्या आधारे कुणालाही शिक्षण, आरोग्य, निवारा, रोजीरोटीची व्यवस्था केलेली नाही. उलट जेवढं रक्त या पृथ्वीतलावर सांडले, त्यात सर्वात जास्त रक्त हे देव आणि धर्माच्या नावावर सांडले आहे. धर्मनिरपेक्ष राष्ट्र हेच दीनदुबळ्या समाजाच्या हिताचा विचार करू शकते. उलट धर्म हा माणसामाणसांत कलह निर्माण करू शकतो.' शिक्षण व दारिद्र्य यांचे अतूट नाते असल्याचे सांगून प्रा. एन. डी. पाटील म्हणाले, 'अंधश्रद्धा निर्मूलनाला कायद्याने पाठबळ मिळेल. परंतु, समाजपरिवर्तनासाठी मोठी चळवळ उभी करण्याची गरज आहे. पुरुषापेक्षा स्त्रियांमध्ये अधिक अंधश्रद्धा आहेत हे आपण समजत असलो, तर स्त्रियातील अंधश्रद्धा घालवून त्यांना पुरुषाबरोबर आणण्याची गरज आहे. यातून विवेकी समाज निर्माण होण्यासाठी मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.'

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्ष व महा. अंनिसच्या द्विदशकपूर्तीनिमित्त वारसा समाजसुधारकांचा, अंधश्रद्धा निर्मूलनाचा, विवेकाचा राज्यस्तरीय युवासंकल्प परिषदेत बोलताना एन. डी. पाटील म्हणाले की, 'पुरोहित व राजेशाहीने एकत्र येऊन बहुजनांची पिळवणूक केली. आज सर्वत्र अन्नधान्याचा तुटवडा असताना अन्नधान्यापासून मद्यनिर्मिती करण्याचा राज्यकर्त्यांचा प्रयत्न असून राजकारणातील समाजकारणी गप्प का?' असा सवाल उपस्थित करीत पुरोगामी विचाराच्या नावाखाली राजकारण करून सत्तेवर येणारे राज्यकर्तेच खऱ्या अर्थाने सत्यशोधकी चळवळीचे मारेकरी असल्याचे परखड मत त्यांनी व्यक्त केले.

संघटनात्मक कामात ही भाई एन. डी. पाटील सरांचे बारीक लक्ष होते. आवश्यक त्या ठिकाणी प्रकृती अस्वस्थतेचाही विचार न करता संघटनेच्या कार्यात उपस्थित राहायचे. डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा निर्घृण खून झाल्यानंतर संघटनेचे काय होईल? असा प्रश्न अनेकांना पडला होता. परंतु, डॉक्टरांच्याच मुशीत तयार झालेल्या अविनाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील तमाम नव्या-जुन्या कार्यकर्त्यांनी

'आम्ही सारे दाभोलकर' म्हणून संघटना दुप्पटीने वाढवली. परंतु, संघटनात्मक निवडप्रक्रियेच्या वेळी वंशपरंपरा आणि वारसाहक्काचे वारे डोक्यात शिरल्याने अविनाश पाटील यांच्या नेतृत्वात काम न करण्याबाबत कार्यकर्त्यांत संभ्रमावस्था निर्माण करण्याचा काहीजणांचा अयशस्वी प्रयत्न झाला. तेव्हा भाई एन. डी. पाटील सरांनी अविनाश पाटील यांना मी डॉक्टरांच्यासोबत बरोबरीने ओळखतो. डॉक्टरांच्यासोबत सावलीसारखे राहून संघटना कशी चालवायची, पुढे न्यायची, प्रश्नासंदर्भात शासनाशी कसा पाठपुरावा करायचा उपक्रमशीलता त्यांच्या रक्तांत भिनली आहे. त्यामुळे अजून दोन दशक तरी अविनाश पाटीलच कार्याध्यक्ष राहील, असे स्पष्टपणे सांगितले आणि प्रकृती बरी नसतानाही भोरच्या राज्य कार्यकारिणी बैठकीला उपस्थित होते. त्यांची स्मरणशक्तीही तेवढी तल्लख. कार्यकर्त्यांना नावानिशी बोलायचे, कार्यकर्त्यांत राहून आत्मीयतेने वैयक्तिक चौकशी करायची त्यामुळे कार्यकर्त्यांना उभारी मिळायची. असे कार्यकर्त्यांचे प्रेरणास्रोत हरवल्याने पुरोगामी, परिवर्तनवादी चळवळीचे आणि शेतकरी कष्टकऱ्यांचे खूप मोठे भरून न निघणारे नुकसान झाले एवढे मात्र खरे.

ते ज्या ज्या संघटना चळवळीचे नेतृत्व करीत होते ते ते अर्धवट असलेले काम पुढे जोमाने करीत राहाणे हीच खरी त्यांना कृतिशील आदरांजली ठरू शकेल. महा. अंनिस कार्यकर्त्यांनी तसा निर्धार केला आहे.

(लेखक महा. अंनिसचे राज्य प्रधानसचिव आहेत.)

●

# आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार : प्रा. डॉ. एन. डी. पाटील

डॉ. अरुण शिंदे
मराठी विभागप्रमुख, नाइट कॉलेज, कोल्हापूर
मो. ९४२१०२४०५५

“

”

नारायण ज्ञानदेव पाटील या एका असामान्य मुलाचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील ढवळी या गावी झाला. त्यांच्या घराण्यात शिक्षणाचा गंधही नव्हता. आईवडील निरक्षर. कष्टकरी. हातातोंडाची गाठ कशीबशी पडायची. शाळेत दाखल झाल्यावर शिक्षकांनीच नारायणची जन्मतारीख १५ जुलै १९२९ अशी रजिस्टरमध्ये नोंदवली. पांडुरंग धोंडी परीट या नावाच्या गुरुजींनी नारायणची तल्लख बुद्धिमत्ता हेरली व नारायणच्या शिक्षणा०साठी घरच्यांना साकडे घातले. ‘नारायणा’साठी ‘पांडुरंग’ धावला व विद्येची वाट खुली झाली. गावातल्या शाळेत चौथीपर्यंत शिक्षण झाल्यावर जवळच्या बागणीच्या शाळेत नारायण व त्याचे थोरले बंधू शंकरराव दाखल झाले. रोज चार कि.मी.ची पायपीट करीत व अनेक अडचणींवर मात करीत त्यांनी शिक्षण घेतले. सातवीनंतर शंकररावांनी प्राथमिक शिक्षकाची नोकरी पत्करून घरादाराला हात दिला. परीट गुरुजींच्या आग्रहाखातर नारायणच्या पुढील शिक्षणास आजोबा तयार झाले.

कर्मवीर अण्णांनी आष्ट्यास सुरू केलेल्या हायस्कूलमध्ये नारायणने प्रवेश घेतला. या संपूर्ण परिसरावर सत्यशोधक समाजाचा मोठा प्रभाव होता. सत्यशोधकी विचारांमध्ये नारायणच्या उमलत्या मनाची घडण झाली. स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांचा, भूमिगत देशभक्तांचा, प्रतिसरकारच्या बहादूर सैनिकांचा सहवासही त्यांना लाभला. या भूमीतूनच क्रांतिकारी चळवळींचा व पुरोगामी विचारांचा ‘डी.एन.ए.’ त्यांच्यात आला. एक निर्भय बंडखोरी त्यांचा स्वभावधर्म बनत गेली. पुस्तकी शिक्षणाबरोबरच अवतीभोवतीच्या घटना–घडामोडींचे डोळस निरीक्षण व त्याचा अन्वयार्थ लावण्याची सत्यशोधकीय मूल्यदृष्टी त्यांना येत गेली. विद्यार्थिदशेतच अनेक उत्तमोत्तम ग्रंथांचे वाचन केल्यामुळे वैचारिक प्रगल्भता त्यांना प्राप्त झाली. मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये दाखल झाले. प्राचार्य डॉ. अप्पासाहेब पवार, प्रा. डॉ. व्ही. के. गोकाक यांसारख्या व्यासंगी व कर्तबगार प्राध्यापकांच्या तालमीमध्ये त्यांची घडण झाली. त्यामुळे अखंड अध्ययनशीलता व बौद्धिक व्यासंगाची शिस्त निर्माण झाली. कोल्हापूरच्या पुरोगामी वातावरणाचा गहिरा परिणाम तरुण एन.डीं.च्यावर झाला. विद्यार्थी संघटनेमध्ये त्यांनी सक्रिय भाग घेतला व यांमधूनच त्यांच्यातील नेतृत्वगुणांचा विकास झाला. बी. ए. झाल्यानंतर त्यांच्यावर मोठे संकट कोसळले. वडील आणि भावाचा मृत्यू एकाच वर्षी झाल्याने त्यांचे कुटुंब हादरून गेले.

या निकराच्या क्षणी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी त्यांच्या आईची भेट घेऊन धीर दिला व एन. डीं.ची आष्ट्याच्या ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिक्षक म्हणून नेमणूक केली. आपल्या अंगावर घेतलेली जबाबदारी चोखपणे पार पाडणे हा त्यांचा पिंडच होता. इतिहास विषयाच्या अध्यापनाबरोबरच इतिहासाचा अन्वयार्थ लावण्याची, चिकित्सेची दृष्टी त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. प्रबोधन, चर्चा, चिकित्सा यांमधून विद्यार्थ्यांची बौद्धिक घडण करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान त्यांनी विलिंग्डन महाविद्यालयामधून अर्थशास्त्रामध्ये एम. ए.

ची पदवी घेतली. बुद्धिवादाच्या भक्कम पायावर, अभ्यास आणि वैज्ञानिक दृष्टिकोनावर त्यांनी आपल्या विचारविश्वाची घडण केली. रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून ते रुजू झाले. गोरगरीब मुलांच्या शिक्षणासाठी सुरू केलेल्या 'कमवा आणि शिका' या अभिनव योजनची जबाबदारी कर्मवीर अण्णांनी एन.डी. सरांच्याकडे सोपवली. एन. डी. सरांनी या कामात वाहून घेतले. कर्मवीर अण्णांच्या देखरेखीखाली व हाताखाली एन. डीं.ची घडण झाली. प्राचार्य ए. डी. अत्तार, बॅ. पी. जी. पाटील यांच्यासारख्या थोर शिक्षकांचा सहवास त्यांना लाभला.

शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेपासून (१९४८) एन. डी. पाटील पक्षाचे संस्थापक सदस्य व सक्रिय कार्यकर्ते होते. शेकापची ध्येयधोरणे, विचारसरणी यांचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला. नवमहाराष्ट्राच्या उभारणीचे त्यांचे एक स्वप्न होते. शोषणमुक्त, समताधिष्ठित, पुरोगामी समाज व नवमहाराष्ट्र घडविण्यासाठी ते शेकापक्षामध्ये तनमनधन अर्पून काम करीत होते. दरम्यान, पक्षाच्या अडचणीच्या काळात पक्षकार्याची गरज ओळखून एन. डी. सरांनी प्राध्यापकपदाची सुखासीन नोकरी सोडून पक्षाचे पूर्णवेळ काम करण्यासाठी स्वतःला झोकून दिले. भाई दाजीबा देसाई, उद्धवराव पाटील यांसारख्या ध्येयवादी सहकाऱ्यांबरोबर एन.डी. सरांनी शेकापचे तारू आपल्या खांद्यांवर घेतले व समर्थपणे पेलले. रयत सोडून पक्षकार्य करण्याची परवानगी कर्मवीर अण्णांकडून मिळणे शक्यच नसल्यामुळे अण्णांना न सांगताच एन. डी. सरांनी नोकरी सोडली व मुंबईला जाऊन गिरणी कामगार युनियनचे सेक्रेटरी म्हणून काम सुरू केले. एक जीवनव्रत म्हणून त्यांनी पक्षकार्य मोठ्या निष्ठेने व समर्पित भावनेने स्वीकारले व ते आजतागायत करीत आहेत. अशी वैचारिक, कृतिशील बांधिलकी असणारी माणसे अपवादानेच आढळतात. त्यांना उपजीविकेसाठी पक्षाकडून ४५ रुपयांचे जीवनवेतन मिळायचे. त्यात भोजन, प्रवास, कपडेलत्ते वगैरे सर्व गरजा भागवाव्या लागत. अनेकदा अर्धपोटी राहून, पायपीट करून, अनेक अडचणींना तोंड देत पक्षउभारणीचे काम त्यांनी जीवनध्येय मानून केले आणि आधुनिक महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातील एका झंझावाती पर्वास प्रारंभ झाला.

शेतकरी, कष्टकरी, शोषित, वंचितांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी एन.डी. सर अष्टोप्रहर झगडत राहले. त्यांची आंदोलने, लोकलढे म्हणजे आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीचा, लोककल्याणाचा इतिहास आहे. वंचितांच्या मुक्तिलढ्यांचे नायक म्हणून एन. डी. सरांचे नाव इतिहासात अजरामर होईल. फुले, शाहू, म. शिंदे, डॉ. आंबेडकर, कर्मवीर अण्णा यांचा विचारवारसा एन. डी. सरांनी उक्तीने आणि कृतीने प्रत्यक्षात चालविला. महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींचे, प्रबोधन–परिवर्तनवादी परंपरेचे वैचारिक नेतृत्व केले व प्रत्यक्ष रस्त्यावरच्या लढाईत अग्रभागी राहून या कर्त्यासुधारकाने आपले सर्वस्व पणाला लावले. एन. डी. सरांनी केलेली आंदोलने, चळवळी व त्यांचे फलित हा एक व्यापक अभ्यासाचा विषय आहे.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व सीमालढ्याचे नेतृत्व एन.डी. सरांनी केले. सीमाप्रश्नावरील शेकडो आंदोलने त्यांच्या नियोजनाखाली व नेतृत्वाखाली झाली आहेत. त्यांना त्यासाठी अटक होऊन तुरुंगवासही भोगावा लागला. आजही ते महाराष्ट्र सरकारने सीमाप्रश्नी नेमलेल्या उच्चाधिकार समितीचे प्रमुख आहेत व सर्वोच्च न्यायालयातील सीमालढ्याचा दावा त्यांच्या मार्गदर्शनाखालीच सुरू आहे. १९६४ साली महाराष्ट्रात जीवनावश्यक वस्तूंची प्रचंड टंचाई निर्माण झाली होती. त्या वेळी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन 'उपासमार विरोधी कृतिसमिती' स्थापन केली. या वेळी एन. डी. पाटील यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर सरकारविरुद्ध मोठे लोकआंदोलन उभे केले. सरकारने त्यांना भारत संरक्षण कायद्याखाली अटक करून येरवडा जेलमध्ये स्थानबद्ध केले होते.

शेती आणि शेतकरी हा त्यांचा श्वास. शेतकऱ्यांच्यावरील अन्याय निवारणासाठी आणि कृषिकेंद्रित व्यवस्था परिवर्तनासाठी एन. डी. सरस तत बोलत, लिहीत, लढत राहिले. शेती तोट्यात जाण्याचे आणि शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे एक महत्त्वाचे कारण शेतमालाच्या भावातील अनिश्चितता, हे आहे. शेतीमालाच्या उत्पादनासाठी लागणारा खर्च आणि शेतकऱ्यांचे वाजवी जीवनमान गृहीत धरून शेतीमालाचे हमीभाव निश्चित केले जावेत, ही प्रमुख मागणी घेऊन शेकापक्षाने विधानसभेवर लाखो शेतकऱ्यांचे मोर्चे काढले. त्यामध्ये एन. डी. सरांचा पुढाकार होता. देशाच्या राजकारणामध्ये व अर्थकारणामध्ये शेतीमालाच्या किंमतीचा प्रश्न केंद्रस्थानी आणण्यासाठी १९७० साली एन. डी. सरांनी 'शेतीमालाच्या किफायतशीर किमतीची कैफियत' ही पुस्तिका लिहिली. त्यांनी शेतीमालाचे किफायतशीर हमीभाव निश्चित करण्यासाठी सुचविलेले निकष आजही उपयुक्त आहेत. शेतीमालाच्या भावाची शास्त्रीय पद्धतीने मांडणी करणारी व शेती आणि शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाचा अर्थशास्त्रीय दृष्टीने विचार करणारी ही बहुधा पहिलीच पुस्तिका असावी. कापूर एकाधिकार योजना सुरू करून त्यांनी शेतकऱ्यांना चार पैसे मिळवून दिले. त्यांनी सातत्याने जागतिकीकरणाचे शेतीवरील अरिष्ट अभ्यासपूर्णरीतीने मांडले. भूमिपुत्रांना देशोधडीला लावून भांडवलदारांसाठी रेड कार्पेट अंथरणाऱ्या 'सेझ' प्रकल्पाविरोधात त्यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांचे लढे यशस्वी झाले. एन्रॉनसारख्या बहुराष्ट्रीय कंपन्यांची विनाशकारी

धोरणे व त्यांचे दुष्परिणाम एन. डी. सरांनी अभ्यासपूर्णरीतीने सर्वसामान्य लोकांसमोर मांडून समाज जागृती केली. जागतिकीकरणाचे शोषक, विषमतावादी, विनाशकारी रूप भाषणे, लेखन यांच्या माध्यमातून सतत मांडत राहून लोकांना त्याविषयी साक्षर, सजग व कृतिप्रवण बनविण्याचे कार्य केले. अविरत संघर्ष हेच त्यांचे जीवनसार आहे.

शिक्षण हा एन. डी. सरांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय. त्यातही बहुजनांचे, वंचितांचे शिक्षण हा त्यांचा जीव की प्राण. म. फुले, शाहू, कर्मवीर अण्णा यांच्या शैक्षणिक विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव आहे. याच विचारांचे निष्ठापूर्वक वहन त्यांनी आयुष्यभर केले. १९६८ साली तत्कालीन शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनी शिक्षणविषयक श्वेतपत्रिका काढून शैक्षणिक पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला. एन. डीं नी 'श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप' ही पुस्तिका लिहून ग्रामीण शेतकरी, कष्टकरी यांच्या शिक्षणावर घाला घालणाऱ्या या श्वेतपत्रिकेची चिरफाड केली. गोरगरिबांच्या तोंडातील शिक्षणाचा घास काढून धनदांडग्यांना पोसणाऱ्या शिक्षणाच्या माध्यमातून स्तरीकरण व विषमता निर्माण करणाऱ्या या श्वेतपत्रिकेविरुद्ध एन. डीं.नी महाराष्ट्रभर रान उठविले. महाराष्ट्रभर चारशेहून अधिक सभा घेतल्या. दोन्ही सभागृहांतील आमदारांसमोर चार तास घणाघाती भाषण करून या श्वेतपत्रिकेतील तरतुदींचे भयावह परिणाम समजावून सांगितले. दुसऱ्या दिवशी विधिमंडळात श्वेतपत्रिकेचा ठराव आल्यावर आमदारांनी तो फेटाळून लावला. काँग्रेसचे बहुमत असतानाही सरकारला सपशेल माघार घ्यावी लागली. विशेष म्हणजे या काळात एन. डी. सर कोणत्याही सभागृहाचे आमदार नव्हते. अर्थात, कर्मवीर अण्णांच्या या पट्टशिष्याने सर्व आमदारांना 'धडा' देऊन गोरगरिबांच्या शिक्षणाचा हक्क शाबूत ठेवला.

कर्मवीर अण्णांच्या मुशीतून एन.डी. सरांच्या व्यक्तिमत्त्वाचे बावनकशी शंभर नंबरी सोने घडले. अण्णांच्या इच्छेनुसार ते १९५९ साली संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य झाले. १९९० साली ते संस्थेचे चेअरमन झाले. कर्मवीर अण्णांचे स्वप्न व 'रयत'चा हेतू डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी संस्थेच्या गुणात्मक व संख्यात्मक विकासासाठी प्रयत्न केले. ते म्हणत, 'शाळा नसलेल्या वाड्यावस्त्या, विद्येला वंचित झालेली मुले भले ती डोंगराळ भागांतील असतील, ते प्रत्येक मूल शिकेपर्यंत कर्मवीरांचा वारसा सांगणाऱ्यांना विश्रांतीचा अधिकार नाही.' शिक्षणापासून वंचित प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा व तेथे 'रयत'च्या वटवृक्षाची पारंबी लावण्याचा प्रयत्न केला. इथल्या सर्वसामान्यांची शैक्षणिक निकड ओळखून त्यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाला अग्रक्रम दिला. शिक्षणसंस्थांचे व्यापारीकरण होऊ नये, म्हणून व्यावसायिक महाविद्यालयांची स्थापना करण्यास त्यांनी ठामपणे नकार दिला व दुर्गम भागांत आश्रमशाळा, प्राथमिक शाळा सुरू केल्या. नापास विद्यार्थ्यांसाठी साताऱ्यात विशेष शाळा सुरू केली. कोणत्याही भ्रष्ट तत्त्वाला संस्थेत थारा दिला नाही. त्यामुळे रयत शिक्षण संस्था ही आदर्श शैक्षणिक संस्था म्हणून नावाजली जाते व संस्थेविषयी सर्वत्र आदरभाव आढळून येतो.

दक्षिण महाराष्ट्र शिक्षण मंडळ, बेळगावचे अध्यक्षपद १९८५ पासून आजतागायत एन. डी. सर सांभाळत आहेत. या संस्थेने सीमाभागात शिक्षणप्रसाराचे, प्रबोधनाचे व समाजपरिवर्तनाचे मोठे काम केले आहे. तसेच तत्त्वनिष्ठा, पारदर्शकता व उच्च नैतिक मूल्यांचा मानदंड निर्माण केला आहे. म. फुले शिक्षण संस्था, इस्लामपूर, खेडूत शिक्षण मंडळ कालकुंदी (जि. कोल्हापूर) या संस्थांची धुरा सांभाळत शिक्षणप्रसाराचे बहुमोल कार्य केले.

शेतकरी कामगार पक्षाच्या स्थापनेपासून आजपर्यंत ते पक्षाचे एकनिष्ठ शिलेदार आहेत. शेकापच्या संस्थापक सदस्यांवर सत्यशोधक चळवळीचा मोठा प्रभाव होता. त्यामुळे शेकापक्षाच्या विचारधारेवरही सत्यशोधक समाजाचा काही एक प्रभाव आढळतो. एन. डी. सरांनी सत्यशोधक चळवळीचा वैचारिक व सामाजिक आशय शेकापक्षाला देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रत्येक आंदोलनामधून व मांडणीमधून शोषित-वंचितांच्या मुक्तीचे तत्त्व मुखर होते. शेकापक्षाचे सरचिटणीस म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली प्रचंड लोकलढे महाराष्ट्रात उभारले. महाराष्ट्रातील सत्ताधारी वर्गास लोककल्याणकारी निर्णय घेण्यास त्यांनी भाग पाडले. 'बहुजनकेंद्री' व्यवस्थापरिवर्तनाचा प्रयत्न केला. सत्ताधारी वर्गावर नैतिक अंकुश ठेवला. एन. डी. आंदोलनामध्ये असले की विरोधकांवर/सत्ताधाऱ्यांवर दडपण येत असे. सत्याची व नैतिकतेची ताकद काय असते, हेच एन. डी. सरांच्या प्रत्येक उक्तीकृतीने दाखवून दिले.

महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी १८ वर्षे काम केले. १९७८-१९८० या काळात ते राज्याचे सहकारमंत्री होते. १९८५-९० या काळात कोल्हापूरमधून ते विधानसभेवर निवडून गेले. विधिमंडळातील त्यांची भाषणे व कामकाज ही आदर्शवत वस्तुपाठ आहेत.


एन. डी. सर महाराष्ट्रातील अनेक संस्था-संघटनांचे पदाधिकारी, मार्गदर्शक होते. हजारो कार्यकर्त्यांचे ऊर्जास्रोत होते. अंधश्रद्धा निर्मूलन समिती, बाबासाहेब आंबेडकर अकादमी सातारा, समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी, जागतिकीकरणविरोधी कृतिसमिती आदींचे प्रमुखपद त्यांनी सांभाळले व पुरोगामी, विधायक, रचनात्मक कार्यास सतत प्रोत्साहन व कृतिशील सहयोग दिला.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये एन. डी. पाटील

यांचे खूप मोठे योगदान आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांमध्ये त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा मानदंड निर्माण केला. त्यांच्या या जीवनसंघर्षामध्ये सरोजमाईंनी त्यांना सावलीप्रमाणे साथ दिली. माईंनी कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी घेतल्याने एन. डी. सर समाजाचा संसार करू शकले. माईंच्याच शब्दांत सांगायचे तर, ''निरलस वृत्ती, कार्यकर्त्यांसाठी असलेली तळमळ, अभ्यासूवृत्ती, वाचन, चिकाटी, मनाचा सच्चेपणा, खुलेपणा, निर्भीडपणा, स्वतःला प्रामाणिकपणे जे वाटते ते करताना कोणाला काय वाटेल याची फिकीर न करण्याची वृत्ती, स्वतःच्या मूल्यांना असलेले प्रथम अधिष्ठान अशा गुण समुच्चयामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व उन्नत आणि भव्य बनते.''

१७ जानेवारी २०२२ रोजी वयाच्या ९३व्या वर्षी एन. डी. सरांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने शेतकरी-कष्टकऱ्यांचा, शोषित-वंचितांचा आवाज गेला. आधुनिक महाराष्ट्राचा एक शिल्पकार गेला. म. फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा वैचारिक व कृतिशील वारस हरपला. 'चळवळींचा महामेरू। बहुत जनांसी आधारू' असणारा आधारवड हरपला. त्यांचे विचार, मूल्ये व कार्यसंस्कृती पुढे घेऊन जाण्यासाठी आपण वचनबद्ध होणे हीच त्यांना आदरांजली ठरेल!

●



# लोकलढ्यांचा सेनानी हरपला

संजय बनसोडे
९८५०८९९७१३

“

”

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष, डाव्या पुरोगामी चळवळीचे मार्गदर्शक, ज्येष्ठ सामाजिक विचारवंत, थोर शिक्षणतज्ज्ञ, कष्टकरी जनतेचे लोकनेते प्रा.डॉक्टर एन. डी. पाटील यांचं ९३ व्या वर्षात नुकतंच निधन झालं, त्यांना विनम्र अभिवादन.

त्यांच्या आठवणींना उजाळा देताना जड अंतःकरणाने लिहावे लागत आहे.

गेली ७२-७३ वर्षे कुठल्याही दमनशक्तीला न जुमानता निःस्वार्थी वृत्तीने जनतेच्या विविध प्रश्नांवर एन.डी सर लढत आले. छोट्या-मोठ्या आंदोलनाला लढण्याची ऊर्जा देण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. शास्त्र त्यांनी त्यांच्या कृती आणि युक्तीतून विकसित केलेला आहे. त्यांच्या दीर्घ अनुभवाचा फायदा चळवळीला नेहमी होत असतो. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सुरुवातीपासून सतत मार्गदर्शन, प्रेरणा देत आले आहे. समितीच्या अनेक आंदोलनात सरांना मोठा सहभाग राहिलेला आहे.

महा. अंनिस पहिल्या दशकात आम्ही जटा निर्मूलनाचे काम करायचो. दि.१७/०२/१९९२ रोजी इस्लामपुरात जिल्हा परिषद शाळेतील एक मुलाचे व एक मुलीचे सरांच्या हस्ते जटा निर्मूलन केले. या छोटेखानी कार्यक्रमात सरांनी शाळेतल्या मुलांचं जटा निर्मूलन प्राधान्य देण्याचा संदेश दिला. त्यानंतर जिल्हाभर सर्वेक्षण करून शाळेत शिकणाऱ्या अनेक मुलांचं जटा निर्मूलन केलं, राज्यभर त्यानंतर जोमाने या कामी गती आली.

१९९० ला पुण्यात अंधश्रद्धा निर्मूलनाचा जाहीरनामा परिषद झाली. शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांवर चर्चा झाली. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी एन. डी. सरांना विचारविनिमय करून शिक्षण क्षेत्रांत वैज्ञानिक दृष्टिकोन कसा वाढवता येईल, याबद्दल कृतिकार्यक्रमाची चर्चा केली.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असताना शिक्षकांची वैज्ञानिक जाणिवा शिबिरे मोठ्या प्रमाणात घेतली, त्यामध्ये सरांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरले. राज्यभर सातत्याने शिक्षकांची शिबिरे सुरू झाली, त्यातील बरेच प्रशिक्षित शिक्षक पुढे चळवळीत सक्रिय झाले. त्यानंतर नियमितपणे प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांची शिबिरे घेतली. वैज्ञानिक आणि सामाजिक जाणिवा वाढवण्यासाठी सर नेहमीच आग्रही असायचे.

शनिशिंगणापूर, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथील शनीच्या चौथऱ्यावर महिलांना प्रवेश नसायचा, यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ मोठा सत्याग्रह केला होता. दि.११ जून २००० रोजी राज्यव्यापी सत्याग्रह अहमदनगर येथे केला गेला. त्यावेळी शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर, प्रा. एन. जी. पाटील, डॉ.श्रीराम लागू, डॉ.पुष्पा भावे, अविनाश पाटील, स्वातंत्र्यसेनानी वेंकट अण्णा आदीं मान्यवर त्यामध्ये सहभागी झालेले होते. राज्यभरांतून कार्यकर्ते आले होते. दिवसभर हे आंदोलन सुरू राहिले. आम्हा कार्यकर्त्यांना पोलिसांनी अटक केली आणि सोडून दिलं. मात्र एन. डी. पाटील, डॉ. दाभोलकर, डॉ.लागू यांनी मात्र आम्ही शनिशिंगणापूरला

जाणार ही भूमिका घेतली. त्या सर्वांना अटक केले, तुरुंगात ठेवले, त्यांनी एक दिवसाची शिक्षा भोगली. हे आंदोलन समतेसाठी होते, जिथे पुरुषांना प्रवेश मिळतो, तिथे महिलांना प्रवेश मिळालाच पाहिजे, ही त्या मागची भूमिका होती. काही वर्षपूर्ती तिथे महिलांना प्रवेश खुला झाला.

२००० साली महाराष्ट्रात सत्तारूढ झालेल्या लोकशाही आघाडी सरकारने किमान समान कार्यक्रमासाठी त्यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेतली. त्यात सरांनी जाणीवपूर्वक अंधश्रद्धा निर्मूलनाचा कायदा करण्याच्या कलमाचा समावेश केला. मात्र तो कायदा होण्यासाठी कित्येक वर्षे आंदोलन करावे लागले. या सगळ्या आंदोलनात पाटील सर हे आघाडीवर असायचे. प्रत्येक अधिवेशनाच्या वेळी पाटील सर, डॉ. दाभोलकर हे मंत्रालयात मंत्र्यांच्याभेटी घ्यायचे. मुख्यमंत्री, सभापती, गृहमंत्री संबंधित सचिवांना भेटून या प्रश्नांची चर्चा करायचे आणि सभागृहात कसं होईल याचा सातत्याने प्रयत्न केला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला सतरा-अठरा वर्षे सतत आंदोलन करावे लागले. यामध्ये उपोषण, धरणे आंदोलन, निदर्शन, स्वतःच्या थोबाडीत मारून घेणे, रक्ताने पत्र लिहिणे जेवढी लोकशाही मार्गाने आंदोलन करायची तेवढी सगळी आंदोलन या कायद्यासाठी केले आणि या प्रत्येक लढ्याच्या वेळी, आंदोलनाच्या वेळी आघाडीवर असायचे. त्यांच्या त्या सगळ्याच आंदोलनाला नेहमीच मार्गदर्शन राहायचं, प्रोत्साहन मिळायचं. जादूटोणाविरोधी कायदा व्हावा यासाठी कायदा होईपर्यंत प्रत्येक पावसाळी अधिवेशनाला आझाद मैदानावर आमची आंदोलनं असायचीच. या आंदोलनाच्या वेळी संबंधित लोकांना भेटणं, पाठपुरावा करणं हे प्राधान्यक्रमाने सरांच्या पुढाकाराखाली ही कामे होत होती. भारतात प्रथमच अंधश्रद्धा निर्मूलनाचा स्वतंत्र कायदा करणारे राज्य म्हणून सरकारनं जाहिरातपण केली होती. दिलेल्या शब्दाला त्यामुळे उशीर झाला याबाबत सरकारला सातत्याने धारेवर धरण्याचे काम करत होते. जादूटोणाविरोधी कायदा व्हावा, याच्या प्रबोधनासाठी राज्यभर दौरे केले. शिबिरे घेतली. त्यामध्ये प्रत्येक कार्यक्रमात एन. डी. सर असायचेच. आंदोलनाची धार कशी वाढवायची, आंदोलन कसे यशस्वी करायचं, याबद्दल त्यांचे मार्गदर्शन समितीला नेहमीच उपयुक्त ठरले आहे.

नरेंद्र महाराजांच्या भक्तांनी पुणेमधील दोन अंनिस कार्यकर्त्यांना अपहरण करून त्यांना बेदम मारहाण केली होती, हे समजल्यावर डॉ. दाभोलकर यांनी ही गोष्ट सरांना सांगितली. दुसऱ्या दिवशी सरांनी मुख्यमंत्र्यांना भेटून याबद्दल संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. संबंधितावर कारवाई झाली, कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहाण्याचे काम सर करत होते.

कामगार, कष्टकरी लोकांच्याबद्दल प्रचंड कणव आणि आत्मीयता सरांच्याजवळ होती. सर कोल्हापूरमध्ये आमदार म्हणून विजयी झाल्यावर विजयाची मिरवणूक निघालेली होती. तो दिवस होळीचा होता. एका गल्लीत गेल्यावर तरुण कार्यकर्त्यांनी विनंती केली की, 'सर, आज तुमच्या हस्ते होळीला नारळ वाहू या, पूजन करा.' सरांनी ठामपणे नकार दिला. ते म्हणाले, 'हे माझ्या विचारांत, तत्त्वांत बसत नाही. भले तुम्ही माझा निषेध केला तरी चालेल.' एवढे विचारांची बांधिलकी जपणारे होते.

सर सत्यशोधकी विचारांचे कट्टर समर्थक, अनुयायी होते. आयुष्यभर फुले, शाहू, आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, वि. रा. शिंदे यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार केला. सत्यशोधकी जलशातील अनेक गोष्टी सांगत असायचे.

२० ऑगस्ट २०१३ ला डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा खून झाला. त्यानंतर सतत अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीसोबत राहिले, सातत्याने मार्गदर्शन केले. डॉ. दाभोलकरांना अग्नी दिल्यावर काही वेळाने स्मशानभूमीत एन. डी. सरांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी एन. डी. पाटील सर म्हणाले, 'डॉ. नरेंद्र दाभोलकर हा पृथ्वीमोलाचा माणूस होता. सनातनी वृत्तीनेच हा माणूस आपल्यातून हिरावून घेतला. मात्र आपण कार्यकर्त्यांनी खचून न जाता आपण सर्वांनीच 'आम्ही सारे दाभोलकर आहोत', ही भूमिका घेऊन काम करावे.' त्यानंतर फुले, शाहू, आंबेडकर 'आम्ही सारे दाभोलकर' ही घोषणा देऊन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अधिक सक्रिय राहिली, त्यात सरांचे मार्गदर्शन फार उपयुक्त होते.

प्रत्येक महिन्याच्या वीस तारखेस प्रत्येक माणूस निर्भय मॉर्निंग वॉकला सर आवर्जून उपस्थित राहायचे. सात वर्ष सातत्याने ते निर्भय मॉर्निंग वॉकला कोल्हापुरात हजर असायचे. राज्यभर निषेध व निर्धार सभा झाल्या त्यावेळी आवर्जून सर उपस्थित राहून मार्गदर्शन करायचे. 'हिंसा के खिलाफ मानवता की ओर' या अभियानातसुद्धा सरांचा सहभाग लक्षणीय होता. शहीद डॉ. दाभोलकर यांचे मारेकरी पकडले जात नाहीत, त्याचा मास्टर माईंड पकडला जात नाही याबद्दल शासकीय पातळीवर सतत ताशेरे ओढत असायचे. तपासाचा पाठपुरावा करण्याचे काम ते करत होते.

मिरज दंगलीनंतर पोलीस कार्यक्रमास परवानगी देत नव्हते. या घटनेचा निषेधही करता येत नव्हता, अशा प्रसंगी सरांनी आपल्या इस्लामपुरातील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये याबद्दल कार्यक्रम घेण्याचे सांगितले. सरांच्या सांगण्यावरून पोलिसांची कोणतीही परवानगी न घेता दंगलीच्याबाबत निषेध करणं, त्याबद्दल पुढील ध्येयधोरणे ठरवणे याबद्दलचा जाहीर कार्यक्रम के. डी. पाटील सर, डॉ. दाभोलकर, कॉम्रेट गोविंद पानसरे यांच्या उपस्थितीत झाला.

कोणत्या प्रसंगी काय करायचं, चळवळीत कशी भूमिका घ्यायची याबद्दल उत्कृष्ट मार्गदर्शन सर नेहमी करायचे. एन. डी. सरांबाबत डॉ. नरेंद्र दाभोलकर म्हणायचे, 'एन. डी. म्हणजे आपले फ्रेंड, गाईड, अँड फिलॉसॉफर आहेत.'

सरांना वाढदिवस साजरा करणे कधीच पसंत नसायचे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने सरांच्या नव्वदाव्या वाढदिवसानिमित्त १५ जुलै २०१८ ला कोल्हापूर येथे आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी सरांना तयार करायला खूप कसरत घ्यावी लागली. सरांच्या पत्नी आदरणीय सरोजमाई यांचे सहकार्य मिळाले. सरांच्यामागे लागून कार्यक्रम घडला. चळवळींच्यासाठी आजचा काळ बिकट आहे, अशावेळी सरांनी उभारलेले काम सर्वच समताधिष्ठित चळवळींना मार्गदर्शक आहे. सरांच्या जाण्याने परिवर्तन चळवळींचा आधार गेला आहे, लोकलढ्यांचा सेनानी हरपला. त्यांना भावपूर्ण आदरांजली.

(लेखक महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधानसचिव आहेत.)

●

# एन.डी. काही आठवणी

संजीव साने
९८६९७८९७०५

❝ प.बंगालमध्ये नंदीग्राम व सिंगूर येथेही असेच भूसंपादन सरकारने चालवले होते. तेथे डाव्या आघाडीचे सरकार होते. त्यांच्याकडून अशी जबरदस्ती अपेक्षित नव्हती. ते बंगाल व केरळ वगळता देशभरच्या सेझविरोधी आंदोलनात सहभागी होते. तरीही शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढून त्यांनी नंदीग्राममध्ये गोळीबार करून शेतकऱ्यांचे आंदोलन दाबण्याचा प्रयत्न केला. या हिंसाचाराचा निषेध जागतिकीकरणविरोधी कृतिसमितीने केला पाहिजे, हा मुद्दा जेव्हा चर्चेला आला तेव्हा विस्ताराने चर्चा होऊन एकमताने हा निषेध प्रस्ताव मंजूर करण्यात आला. एन.डीं.नी प्रेसला स्पष्टपणे समिती निषेध करत असल्याचे सांगितले. दुसऱ्या दिवशी सर्व वर्तमानपत्रे व वाहिन्यात याचे प्रसारण झाले. ❞

सेझविरोधी आंदोलन जे मुख्यत: रायगड, पुणे, औरंगाबाद व मुंबईत सुरू होते. त्यात धारावी बेट बचाव यासाठी गोराई, उत्तन परिसरातील १० गावांतही आंदोलन सुरू होते. परिसरात अनेक मोर्चा, परिषदा घेतल्या गेल्या. या दहा गावांतील प्रत्येक घरासमोर नो टू सेझ (छे ीं डएन) असा बोर्ड लावलेला असायचा. जनसहभाग व प्रबोधनाची एक छोटीशी कृती काय करू शकते हे उदाहरण एन.डी. राज्यात सर्वत्र देत. सरांच्या किडनी विकारामुळे एक किडनी काढून टाकावी लागली. त्यावेळी डॉक्टरांनी त्यांना 'सर्व राजकीय, सामाजिक काम करा, आंदोलने करा; पण उपोषण कोणत्याही स्थितीत करू नका', असा सल्ला दिला होता. रायगड सेझविरोधी आंदोलन निर्णायक टप्प्यात आले होते. वडखळ नाक्यावर रास्ता रोको आंदोलन सुरू होते. सरकार कोणताच प्रतिसाद देत नाही असे पाहून, एन.डीं.नी आपल्या भाषणात विधानसभा अधिवेशनापूर्वी सरकारने सेझ रद्द करण्याचा निर्णय जाहीर करावा, अन्यथा पहिल्या दिवशी मी उपोषण सुरू करेन, अशी घोषणा केली. आम्ही सर्व कार्यकर्ते अवाक् झालो. या घोषणेची अंमलबजावणी करावी लागणार नाही व सरकार निर्णय घोषित करेल, असे आम्हास वाटले होते. मुख्यमंत्री विलासराव देशमुख होते व महसूलमंत्री नारायण राणे होते. सरकारने काहीच निर्णय न केल्याने ठरल्याप्रमाणे सरांनी उपोषण सुरू केले. पण कार्यकर्त्यांनी त्यांना निक्षून सांगितले की, 'सरकारी डॉक्टर रोज तपासायला येतील, त्यांनी तब्येत बरी नाही व हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागेल असे सांगितले की हट्ट न करता दवाखान्यात दाखल व्हायचे.' सरांनी ते मान्य केले; पण 'मी फक्त सलाईन घेईन, काहीही खाणार नाही', अशी अट घातली. आम्ही ती मान्य केली. पहिल्याच दिवशी संध्याकाळी तब्येत बिघडली व त्यांना जे.जे रुग्णालयात दाखल करावे लागले.

दुसऱ्या दिवशी पतंगराव कदम भेटायला आले. त्यांनी मुख्यमंत्र्याचा निरोप दिला व सांगितले की, सेझ परिसरातील जनतेचे काय म्हणणे आहे ते ऐकून सरकार निर्णय घेईल. त्यावर सकारात्मक विचार करून ४ वाजेपर्यंत कळवले जाईल, असे सरांनी सांगितले. लगेच सर्व कार्यकर्त्यांना बोलावून घेतले. सरकारची ही खेळी आहे. निवडणुका मॅनेज केल्या जातात तेव्हा हे सर्व दमनशक्ती लावून त्यांच्या बाजूचा निर्णय करवून घेतील; तसेच जनता दबावाखाली जमीन देण्याचा निर्णय करेल, असे मत पुढे आले. पण एन.डी. म्हणाले, 'हे आव्हान आहे चळवळीला. आपण ते स्वीकारले पाहिजे, सर्व ताकद लावून आपण प्रबोधन व लोकजागरण करू. निवडणूक कशी घ्यायची त्याचा प्रस्ताव देवू, या उपर जनतेने चळवळीच्या विरोधात जमीन देण्याचा निर्णय दिला तर तो आपण स्वीकारला पाहिजे', यावर एकमत झाले. हे मत सरकारला कळवले गेले. जिल्हाधिकारी कार्यालयाशी निवडणूक कशी घ्यायची याची प्रदीर्घ चर्चा करण्यात आली व त्याचा तपशील जाहीर करण्यात आला. सर्व गावातील प्रत्येक घरात जाऊन कार्यकर्त्यांनी जनजागरण व प्रबोधन केले.

सरकारमधील पक्ष तरीही गडबड करण्याची शक्यता लक्षात घेऊन आंदोलनाच्या कार्यकर्त्यांनी काळजीपूर्वक आखणी केली. मतपत्रिकेवर काय व कसा मजकूर असेल हे गावात सभा घेऊन जाहीर केले गेले. सरकारी मतपत्रिका पांढऱ्या रंगातील असणार होती म्हणून चळवळीने गुलाबी रंगाच्या मतपत्रिका छापून घेतल्या. त्या निवडणुकीच्या आधी एक दिवस प्रत्येक मतदारांना दिल्या. सरकारी पांढरी मतपत्रिका मतदानकेंद्राच्या बॉक्समध्ये टाकायची व मतदानकेंद्राच्या बाहेर आंदोलनाने नियमानुसार अंतर सोडून ठेवलेल्या मतपेटीत

गुलाबी मतपत्रिका टाकायची व एक स्वतःकडे ठेवायची. सरकार या निवडणुकीचे निर्णय जाहीर करणार नाही, असा अंदाज होता तो खरा ठरला, म्हणून सरकारकडे दोनदा मागणी करून शेवटी आंदोलनाने जनतेला बोलावून पेणमध्ये ही मतमोजणी गाववार केली व निकाल प्रेसच्यासमोर जाहीर केला. त्यात ९६% जनतेने जमीन देण्यास विरोध केला हे समोर आले. यास संपूर्ण मीडिया उपस्थित होता व अंतिमतः रिलायन्सला व सरकारला सेझ रद्द करावा लागला. हे पूर्ण आंदोलन जागतिकीकरण विरोधी कृतिसमितीच्या झेंड्याखाली झाले. एन.डी. पाटील या समितीचे अध्यक्ष होते. सेझविरोधी सर्व देशात आंदोलन सुरू होते. जनता आपली शेतजमीन देण्यास विरोध करत होती. पण सरकारे भू-संपादन कायद्याचा आधार घेत जबरदस्ती करत होती. जनतेत प्रचंड आक्रोश होता. पण शहरात राहाणारे व उद्योगात चाकरी करणारा मध्यमवर्ग, उच्च वर्ग विकासाच्या नावे सुरू असलेल्या; पण प्रत्यक्षात विकासविरोधी प्रकल्पाचे समर्थन करत होते व आजही करत आहेत.

प.बंगालमध्ये नंदीग्राम व सिंगूर येथेही असेच भूसंपादन सरकारने चालवले होते. तेथे डाव्या आघाडीचे सरकार होते. त्यांच्याकडून अशी जबरदस्ती अपेक्षित नव्हती. ते बंगाल व केरळ वगळता देशभरच्या सेझविरोधी आंदोलनात सहभागी होते. तरीही शेतकऱ्यांचा विरोध मोडून काढून, त्यांनी नंदीग्राममध्ये गोळीबार करून शेतकऱ्यांचे आंदोलन दाबण्याचा प्रयत्न केला. या हिंसाचाराचा निषेध जागतिकीकरण विरोधी कृतिसमितीने केला पाहिजे, हा मुद्दा जेव्हा चर्चेला आला तेव्हा विस्ताराने चर्चा होऊन एकमताने हा निषेध प्रस्ताव मंजूर करण्यात आला. एन.डीं.नी प्रेसला स्पष्टपणे समिती निषेध करत असल्याचे सांगितले. दुसऱ्या दिवशी सर्व वर्तमानपत्रे व वाहिन्यांत याचे प्रसारण झाले. राज्यातील सिपीएम पक्षाने यावर आक्षेप घेतला. समिती डाव्या सरकारचा निषेध कसा करू शकते ? त्यावर एन.डीं.नी दोन मुद्दे स्पष्टपणे मांडले.

१) सिपीएमचे प्रतिनिधी ज्येष्ठ नेते कॉ. कृष्णा खोपकर बैठकीस उपस्थित होते.

२) विरोध केला म्हणून माणसावर गोळ्या चालविण्याचा अधिकार सरकारला नाही व असता कामा नये.

कायदा सुव्यवस्थेची स्थिती अन्य मार्गाने हाताळू शकते. सरकारच्या माणसे मारण्याच्या कृतीचे कोणतेही समर्थन होऊ शकत नाही. या मुद्द्यावर मतभेद नोंदवून समितीतून फक्त सिपीएम बाहेर पडला. अन्य डावे पक्ष व संघटना मात्र समितीत राहिल्या. एन.डीं.नी व अन्य सर्व सहकाऱ्यांनी स्पष्ट व तर्कसंगत भूमिका घेतल्यानेच हे शक्य झाले.

राज्यात विजेचे संकट आहे, असे सांगून एन्रॉन प्रकल्प कोकणातील गुहागर तालुक्यात आणायचा असे राज्यसरकारने जाहीर केले. या प्रकल्पाचे तपशील पुढे आल्यावर राज्य वीज मंडळ हा बोजा सहन करू शकत नाही व एका प्रकल्पाच्या उभारणीसाठी राज्य अंधारात घालावे लागेल, हे स्पष्ट झाल्यावर तेथे आंदोलन सुरू झाले. तेथे प्रकल्पविरोधी दोन आंदोलने झाली. सुरुवातीला स्थानिक गावकरी व मेधाताई पाटकर यांच्या नेतृत्वाखाली (छअझच्) केलेले आंदोलन. काँग्रेस सरकारने करार केलाच होता. नंतर सरकार बदलल्यावर नवीन सेना-भाजप युतीने प्रकल्प समुद्रात बुडवला असे जाहीर केले. त्यानंतर आंदोलन काही काळाने थांबले. पण काही काळाने पुन्हा प्रकल्प सुरू करण्याची घोषणा केली गेली.

या विरोधात नव्याने आंदोलनाची गरज लक्षात घेऊन जागतिकीकरण विरोधी कृतिसमिती स्थापन करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष एन.डी. पाटील यांनाच करणे योग्य आहे, ही भाई वैद्य यांची सूचना मान्य झाली. समितीच्या नेतृत्वाखाली दुसरे आंदोलन सुरू करण्यात आले. यात गुहागर येथे कंपनीसमोर सत्याग्रह आंदोलन व राज्यात जनजागरणासाठी परिषदा असा कार्यक्रम जाहीर झाला. एन्रॉनमुळे राज्य कसे संकटात येईल, वीज मंडळ कसे कोलमडून पडेल व राज्यातील जनतेला वीज घेणे परवडणार नाही व त्यामुळे राज्य अंधारात नेण्याचे कार्य काँग्रेस व सेना भाजप करत आहे, हा प्रचाराचा मुद्दा असायचा. त्यानंतर पुन्हा सत्ताबदल झाला. राज्यात काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार डाव्या लोकशाहीवादी पक्षांचा पाठिंबा घेऊन सत्तेवर आले. या सरकारने किमान समान कार्यक्रम तयार करून एक समन्वय समिती स्थापन केली गेली. या समितीचे अध्यक्षस्थानी एन.डी. पाटील असावेत, असे एकमताने ठरले.

या समितीने जो कार्यक्रम चर्चा करून ठरवला व जाहीर केला त्यात एन्रॉन प्रकल्पाची चौकशी करण्याचे एक कलम होते. सरकारला किमान वेळ दिल्यावर अंदाजे दोन वर्षानंतर हा मुद्दा समितीत चर्चेस आला. काँग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचे नेत्यांनी हा मुद्दा टाळण्याची आखणी केली; पण एन.डी., कॉ.प्रभाकर संझगिरी, साथी निहाल अहमद व कॉ. गोविंदराव पानसरे यांनी आग्रह धरून ही चौकशी समिती करण्याचा निर्णय समितीत घडवून आणला. यासाठी वेळ आली तर डावे व लोकशाहीवादी पक्ष सरकारमधून राजीनामा देतील, हेही स्पष्ट केले गेले. या समितीच्या अध्यक्षपदी श्री.माधव गोडबोलेच असावेत, हा आग्रह होता. त्यांच्या नावास शरद पवारांचा विरोध होता. एन.डीं.नी गोडबोले यांना भेटून त्यांची संमती घेतली होती. गोडबोले हे कोणाच्याही व कोणत्याच दबावाला बळी पडणार नाहीत, याची खात्री असल्याने त्यांच्या नावावर एन.डी. आग्रही होते, तर गोडबोले यांना मॅनेज करता येणार नाही याची कल्पना काँग्रेस व राष्ट्रवादीच्या नेत्यांना होती त्यामुळेच त्यांचा विरोध होता.

पुढे चौकशी झाली, त्यात तत्कालीन सरकारला दोषी ठरवले गेले. अध्यक्ष म्हणून गोडबोले यांचे मत महत्त्वाचे ठरले व न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे, हे मत मांडले गेले. पुढे माजी न्यायमूर्ती कुर्डुकर यांचा आयोग नेमला गेला. पुढे एन्रॉन कंपनीचे दिवाळे वाजले व प्रकल्प बंद पडला व महाराष्ट्रावरचे संकट टळले. एन.डी. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन झाले. अनेक नवे उपक्रम व दूरच्या डोंगर कपारीत शाळा व आश्रमशाळा त्यांनी सुरू केल्या. संस्थेचा कारभार भ्रष्टाचारमुक्त व पारदर्शक असलाच पाहिजे यावर त्यांची करडी नजर असायची. शिक्षक व नोकर भरती म्हणजे पैसे कमावण्याची संधी ही प्रथा अनेक संस्थांत होती. यावर एन.डीं.नी विचारपूर्वक एक उपाय केला व त्याची अंमलबजावणी केली. जाहिरात दिल्यावर अनेक अर्ज येत, त्यांची नियमानुसार राखीव जागा व ओपनच्या जागांची नोंद करून यादी बनविली जायची, ती काटेकोरपणे तपासून नक्की केल्यावर ओपनच्या व एस. सी. एस. टी. व व्हीजेएनटी यादीत जितक्या जागा भरायच्या. त्यातील क्रमाने असलेल्या उमेदवारांना नियुक्तीचे पत्र दिले जायचे. त्यातील हजर न झालेल्या उमेदवाराच्या जागी पुढील क्रमांक वरील उमेदवारास नियुक्ती दिली जायची. मुलाखती घेणे हा भ्रष्ट व्यवहार करण्याचा एक मार्ग असायचा, तोच त्यांनी बंद केला. एन.डी. कार्याध्यक्ष असेपर्यंत याच प्रक्रियेने नियुक्त्या होत असत. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात सर्व क्षेत्रांत अभ्यासपूर्ण हस्तक्षेप सलग ७५ वर्षे करणारे अलौकिक नेतृत्व देणाऱ्या एन.डीं.ना भावपूर्ण आदरांजली.

●

# झंझावात

एकनाथ पाटील
९४२११२८५०८२

वडाच्या झाडासारखे खोल खोल
तितकेच सभोवार खूप विशाल पसरलेली तुम्ही
कुणीही यावे आणि हक्काने
निर्धास्त तुमच्या सावलीत विसावावे
आता तेजस्वी, प्रखर, निर्मळ आणि शुभ्रधवल
असे खूप काही हरवले आमच्या जगण्यातून
जणू निसटावे पाणी ओंजळीतून
आणि नुसते हातच ओले
तसे काहीसे भांबावलेपण
आजवर कधी कुणालाच
तुम्हाला पकडता आले नाही शब्दात
तुमची आभाळउंची
कुणी कशी मोजावी कोणत्या निकषात?

इतक्या वर्षांच्या दीर्घ प्रवासात
जाणीवपूर्वक नवी वाट मळवलात
काटेकुटे टोचले असतील
पाय रक्तबंबाळ झाले असतील
किती वेदना सहन कराव्या लागल्या असतील
त्याची कधीही केला नाही फिकीर
किती सहज जाता आले असते मळलेल्या वाटेने
सुखवस्तू मार्गाने
मळलेल्या सोप्या रस्त्याने जाणारे
आजूबाजूला खूप होते लोक
गेला असता अशा वाटेने
तर काट्याकुट्यांचा कधी झाला नसता त्रास
पाय रक्तबंबाळ झाले नसते
वेदना सहन कराव्या लागल्या नसत्या
शीणही जाणवला नसता प्रवासाचा
परंतु मळलेल्या वाटेने जाणाऱ्यांना
जिकडे नेईल ती वाट तिकडेच जावे लागते
जिकडे जायचे असेल चालणाऱ्याला
तिकडे ती जात नसते
कुठे जायचे...
तुम्हाला पक्के होते ठाऊक
तिथेच पोहोचण्यासाठी मग
खाचखळग्यातून, वळणावळणातून, डोंगरदऱ्यातून
चढउतारातून नवी वाट मळवलात तुम्ही
अहोरात्र उपसलात कष्ट
आणि आजच्या आत्मकेंद्री पिढीला
आता पटेल का
तुमच्या संघर्षाची ही गोष्ट...

पायाखाली घातलात दऱ्याखोऱ्या – कडेकपाऱ्या
आणि तुडवलात उजाड माळरानं
थकला नाहीत
की, अजिबात दमला नाहीत
चालत राहिलात अथक
सहन केलात ऊन-पाऊस, थंडी-वारा
सहन केलात काटेकुटे
सहन केलात ठेचा
रक्तबंबाळ झाले पाय
खोलवर जखमा झाल्या पायांना
आयुष्यावर उमटले अशा जखमांचे ठसे
असे ठसे अभिमानाने मिरवलात
आणि शोषितांच्या लढाईतून
लढणारा नवा माणूस
नवा समाज – नवं जग घडवलात
आणि सारे रस्तेच उखडले जाण्याच्या
संभ्रमाच्या या सैरभैर काळात
आता खूप खूप दूरवर जाऊन उभारलात...

तुम्ही गेलात
आणि आकाश काळवंडले
पाना फुलांचे रंग उडाले
एक उदास कळा पसरली आहे गावशिवारात
आणि लोक विसरूच शकत नाहीत तुमचा झंझावात
तुमच्या जाण्याने
खूप काही एकाएकी वजा झाले आमच्या आयुष्यातून
जे भरून निघणे अशक्य आहे आता कशातून...

वैचारिक दुष्काळाच्या या कठीण काळात
कार्यकर्त्यांना बजावून सांगत होता तुम्ही,
'जोपर्यंत चळवळीची हत्यारं बोथट झाली नाहीत

तोपर्यंत नामोहरम होण्याचे कारण नाही
संख्येनं नेहमीच आपण कमी असू
म्हणून हताश होऊ नका बसू
खचून तर अजिबात जाऊ नका
तत्त्वनिष्ठेचं बीज प्राणपणाने जतन करा
कधीतरी आभाळ येईलच भरून
आणि जेव्हा पाऊस जाईल पडून
जमिनीला वाफसा येईल
तेव्हा बी पेरायला विसरू नका
कष्टकऱ्यांची कधीही संपत नसते लढाई.'

लोकचळवळींच्या यशाचे शास्त्र आणि शस्त्रं
कृती आणि युक्तीतून करीत आलात विकसित
शोषक शक्तींचा आज वाढला आहे जोर
सामान्य माणसांच्या जीवाला घोर
जात आणि धर्माच्या लोक उभे आहेत जाळात
अशा कठीण काळात
लोकांसाठी तुमचे दीपस्तंभासारखे कार्य
तुमच्या माघारी आता तर ते खूपच अनिवार्य
संभ्रम, संशय आणि
अस्वस्थतेच्या या महाकठीण काळात
दीपस्तंभासारखे आमच्या समोरच असाल तुम्ही
तुमच्याच उजेडात वावरू
आणि पडत्या काळाला सावरू
आमच्यासाठी संघर्षाचे पर्यायी नाव : एनडी

खाचखळग्यांची, काट्याकुट्यांची तुमची खडतर वाट
किती अवघड चढणीचे हे जीवघेणे घाट
समोर दात विचकून उभा हा घनदाट काळोख
दिसत तर काहीच नाही
संभ्रमाचा सैरभैर भोवताल
आणि वाट तर शोधायची आहे
कष्टकऱ्यांच्या राज्याप्रत पोहोचायचे आहे
आता उठवू सारे रान...
मग, तुम्ही दिलेला उजेड घेऊनच चालावे लागेल
संकटांना तोंड देण्याची तयारी ठेवावी लागेल
आम्ही ती तयारी ठेऊ
एकमेकांचे हात हातात घेऊ
ठामपणे पाय रोवून उभे राहू
तुम्ही दाखवलेल्या वाटेवरूनच चालत राहू
लढत राहू – लढत राहू
संकटांचे डोंगर अथकपणे चढत राहू
अगदी अथकपणे चढत राहू
समतेचे निशाण हाती घेऊ
माणुसकीचे गीत गाऊ
या काळ्याकभिन्न काळोखातही उजेडाचे दीप लावू...

●

# प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांचा जीवनक्रम

रयत शिक्षण संस्थेचे,
**संपूर्ण नाव :** नारायण ज्ञानदेव पाटील
**जन्म :** १५ जुलै १९२९ – ढवळी (नागाव), जि.सांगली येथे अशिक्षित शेतकरी कुटुंबात जन्म.

**शिक्षण :** एम.ए. (अर्थशास्त्र), पुणे विद्यापीठ,१९५५; एल.एल.बी.( १९६२ ) पुणे विद्यापीठ.

**अध्यापन कार्य**

१९५४– १९५७ छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे प्राध्यापक तसेच 'कमवा व शिका' या योजनेचे प्रमुख व रेक्टर.
१९६० साली कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर येथे प्राचार्य.

**शैक्षणिक क्षेत्रातील कार्य**

शिवाजी विद्यापीठ – पहिल्या सल्लागार समितीचे सदस्य १९६२.
शिवाजी विद्यापीठ – सिनेट सदस्य १९६५.
शिवाजी विद्यापीठ – कार्यकारिणी सदस्य १९६२–१९७८.
शिवाजी विद्यापीठ – सामाजिकशास्त्र विभागाचे डीन १९७६–१९७८.
सदस्य, प्राथमिक शिक्षण आयोग, महाराष्ट्र राज्य १९९१.
रयत शिक्षण संथेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य– १९५९ पासून
रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन – १९९० पासून
दक्षिण महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ, बेळगाव अध्यक्ष – १९८५ पासून

**राजकीय कार्य**

१९४८ – शेतकरी कामगार पक्षात प्रवेश.
१९५७ – मुंबई गिरणी कामगार संघटनेचे सरचिटणीस.
१९६०–६६,१९७०–७६,१९७६–८२ अशी १८ वर्षे महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य.
१९६९–१९७८, १९८५–२०१० – शे.का.प.चे सरचिटणीस.
१९७८–१९८० – सहकारमंत्री, महाराष्ट्र राज्य.
१९८५–१९९०– महाराष्ट्र विधानसभा सदस्य.
(कोल्हापूर मतदारसंघाचे प्रतिनिधी )
१९९९–२००२ – निमंत्रक लोकशाही आघाडी सरकार.
महाराष्ट्र राज्य सीमाप्रश्न समितीचे सदस्य व सीमा चळवळीचे प्रमुख नेते

**मिळालेले सन्मान / पुरस्कार**

भाई माधवराव बागल पुरस्कार – १९९४.
स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ, नांदेड–डी.लिट.पदवी, १९९९.
राष्ट्रीय बियाणे महामंडळ (अध्यक्षपद) भारत सरकार–१९९८ – २०००.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ – डी.लिट.पदवी, २०००.
विचारवेध संमेलन, परभणी अध्यक्षपद – २००१.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – डी.लिट.पदवी.
शाहीर पुंडलिक फरांदे पुरस्कार

**भूषविलेली पदे**

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य.
समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी – उपाध्यक्ष.
अंधश्रद्धा निमूर्लन समिती, महाराष्ट्र – अध्यक्ष.
डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा – अध्यक्ष.
जागतिकीकरणविरोधी कृतिसमिती – मुख्य निमंत्रक.
म. फुले शिक्षण संस्था, इस्लामपूर – अध्यक्ष.
दक्षिण महाराष्ट्र शिक्षण प्रसारक संस्था, बेळगाव – अध्यक्ष.
महाराष्ट्र राज्य सीमाप्रश्न समिती – सदस्य.

**प्रसिद्ध झालेले लेखन**

समाजविकास योजनेचे वस्त्रहरण (पुस्तिका).
शेतजमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा (पुस्तिका) १९६२.
काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट (पुस्तिका) १९६२.
शेतीमालाला किफायतशीर किमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयीकरण (पुस्तिका) १९६३.
वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट (पुस्तिका) १९६६.
महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे (थहळींश झरशिी) कृष्णस्वरूप (पुस्तिका) १९६७.
शेतीमालाच्या किफायतशीर किमतीची कैफियत (पुस्तक) १९७०.
शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी ? (पुस्तिका) १९९२.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे (पुस्तिका).
नववे विचारवेध संमेलन परभणी, अध्यक्षीय भाषण, २००१ (नवसाम्राज्यवादी युगातील भारतीय लोकशाही समोरील आव्हाने).

**रयत शिक्षण संस्थेतील विशेष कार्य**

चेअरमनपद काळात : औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आश्रमशाळा, साखरशाळा, नापासांची शाळा, श्रमिक विद्यापीठ, संगणक शिक्षक केंद्र, कर्मवीर भाऊराव पाटील इन्फर्मेशन अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी इन्स्टिटय़ूट, 'कमवा व शिका' या योजनेवर भर, स्पर्धा परीक्षा केंद्रे, गुरुकुल प्रकल्प, लक्ष्मीबाई पाटील शिष्यवृत्ती योजना, सावित्रीबाई फुले दत्तक - पालक योजना यांची राबणूक, दुर्बल शाखा विकास निधी, म.वि.रा.शिंदे अध्यासन केंद्रे आदींची स्थापना, कर्मवीर विद्याप्रबोधिनीमार्फत विविध पुस्तकांची निर्मिती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अकादमी, समाजवादी प्रबोधिनी, अंधश्रद्धा निर्मूलन समिती या संस्थांच्या सहकार्याने विद्यार्थी, शिक्षक-प्राध्यापक प्रबोधन कार्याला चालना.

●

# डॉ. एन. डी. पाटील अभिवादन सभेचा वृत्तांत

उत्तम जोगदंड

“

”

महाराष्ट्रातील ज्येष्ठ सामाजिक विचारवंत, कष्टकरी जनतेचे नेते, डाव्या – पुरोगामी चळवळींचे खंबीर आधारस्तंभ आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय डॉ. एन. डी. पाटील यांचे सोमवार, दि. १७ जानेवारी, २०२२ रोजी वृद्धापकाळाने कोल्हापूर येथे निधन झाले. त्यानिमित्त महा. अंनिसने ऑनलाइन अभिवादन सभेचे आयोजन दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी सायंकाळी ७.०० वाजता केले होते. अत्यंत शोकाकुल वातावरणात पार पडलेल्या या ऑनलाईन अभिवादन सभेस महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय आणि अन्य क्षेत्रांतील विविध मान्यवरांसह सुमारे ३५० कार्यकर्ते/नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महा. अंनिसचे प्रधानसचिव संजय बनसोडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करताना महा. अंनिसच्या प्रधानसचिव सुशीला मुंडे यांनी डॉ. एन. डी. पाटील यांचे जादूटोणाविरोधी कायदा आणि सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा पारित करण्यातील महत्त्वाचे योगदान, त्यांची तत्त्वनिष्ठा, धडाडी आणि कार्यकर्त्यांना ऊर्जा देणाऱ्या नेतृत्वगुणांचा उल्लेख केला.

पुरोगामी चळवळीतील वरिष्ठ कार्यकर्ते किशोर बेडकीहाळ यांनी डॉ. एन. डी. पाटील यांच्यासोबत ३० वर्षे काम करायला मिळाले याचा उल्लेख करताना त्यांच्या नेतृत्वाचे अनेक पैलू जवळून अनुभवल्याचे आणि खूप काही शिकल्याचे सांगितले. निर्भयता, नैतिकता, वैज्ञानिकता आणि पारदर्शकता या चतुःसूत्रीचा आपल्या व्यवहारात ते अंमल करीत असत आणि रस्त्यावर किंवा विधिमंडळात पूर्ण भान ठेवून ते काम करीत असत. त्यांनी उभारलेल्या त्यांच्या विविध आंदोलनांमध्ये कधीही एकही दगड किंवा वीट कार्यकर्त्यांनी उचलली नव्हती याची आठवण त्यांनी करून दिली.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उदय नारकर यांनी डॉ. एन. डी. पाटील यांच्या ७५ वर्षांच्या सामाजिक कार्याचा आलेख मांडताना त्यांच्या कार्याची व्यापकता सांगून सर्वच पुरोगामी आणि परिवर्तनवादी चळवळींवर त्यांचा वरदहस्त होता हे सांगितले. तसेच लोकशाही प्रणालीचे पालन करून, या प्रणालीमार्फत संसदेत जाऊन, कायदे करून, प्रशासनावर दबाव निर्माण करून, पदांचा समर्थ वापर करून महाराष्ट्राला प्रगतिपथावर घेऊन गेले पाहिजे या त्यांच्या शिकवणीची आठवण करून दिली.

महा. अंनिसचे राज्य सरचिटणीस आणि तरुण कार्यकर्ते कृष्णात स्वाती यांनी शहीद डॉ. दाभोलकर आणि कॉम. पानसरे यांच्यानंतरचा चळवळीचा आधारवड नाहीसा झाला हे मान्य करणे कठीण जात आहे हे सांगतानाच डॉ. एन. डी. पाटील यांनी तरुणांना कसे सन्मानाने वागवले, मार्गदर्शन केले आणि आजारी असताना देखील ते चळवळीचे काम कसे करीत असत याविषयी आठवणी सांगितल्या. ते देहाने नसले तरी विचाराने आपल्यात आहेत आणि त्या विचारांवर चालून समतावादी चळवळ पुढे घेऊन जाणे हेच त्यांना अभिवादन ठरेल, असे विचार व्यक्त केले.

‘अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका’ या महा. अंनिसच्या

मुखपत्राचे सहसंपादक साहित्यिक एकनाथ पाटील यांना भावनावेगाने अश्रू आवरता आले नाहीत. त्यांनी झंझावात या आपल्या कवितेतून 'वडाच्या झाडासारखे खोल खोल तितकेच विशाल पसरलेले तुम्ही....' असा गौरव करून काव्यमय अभिवादन केले.

उल्का महाजन यांनाही आपला शोक आवरता आला नाही. डॉ. एन. डी. पाटील यांचा मायेचा, आधाराचा हात आधारवडासारखा होता. तसेच त्यांचे अस्तित्व दीपस्तंभासारखे होते हे सांगून काही बोलायला शब्दच सुचत नाहीत हे सांगितले. ते समाजाच्या सुख-दुःखाचे वाचन करायचे, प्रश्न समजून घ्यायचे, त्यांचे लक्ष आजूबाजूला देखील असायचे आणि त्यातून ते प्रश्न कसे सोडवायचे याची उदाहरणे त्यांनी दिली. रिलायन्स कंपनीच्या मालकाची मुंबईतील अँटीलिया इमारतीवर काढलेल्या मोर्चाची आठवण सांगून त्यांची नर्म-विनोदबुद्धी, तोंडपाठ किस्से वापरून आपल्या भाषणातून शेतकऱ्यापासून ते बुद्धिजीवी वर्गापर्यंत पोहोचण्याच्या हातोटीचा उल्लेख केला. सत्याची ताकद वापरून सत्तेच्या आवारात वावरणे आणि त्याच वेळेस डोळ्यात पाणी असणे, असे डॉ. एन. डी. पाटील यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व विरळाच आहे, हे त्यांनी सांगितले.

कॉम. किशोर ढमाले यांनी समतेच्या क्रांतिवादी, मार्क्सवादी आणि सत्यशोधकी/आंबेडकरवादी या तीन समतावादी प्रवाहांचा उल्लेख करून डॉ. एन. डी. पाटील यांच्यात या तिन्ही प्रवाहांचा संगम असल्याचे सांगितले. शरीराला लागलेला मधुमेह आणि खुब्यात रॉड असतानासुद्धा काठी टेकवून लढणे हे शेतकऱ्याचा मुलगा असल्याने शक्य होत होते. सर्वच परिवर्तनवादी आंदोलनांना त्यांचे बळ होते आणि ते नसते तर अनेक चळवळी चिरडल्या गेल्या असत्या हे सांगून त्यांच्या जाण्याने सैरभैर, पोरके झाल्यासारखे वाटत आहे, अशी भावना व्यक्त केली. त्यांनी दाखविलेल्या वाटेवर प्रवास करत राहाणे हीच त्यांना आदरांजली आहे, असे विचार त्यांनी व्यक्त केले.

माजी खासदार राजू शेट्टी यांनी सर्वच चळवळीत डॉ. एन. डी. पाटील अग्रस्थानी असत, ते चळवळीचे भीष्माचार्य होते हे सांगून आपल्या नैतिकतेच्या जोरावर राज्यकर्त्यांना अंगावर घ्यायचे, मागे हटायचे नाही या त्यांच्या गुणांचा उल्लेख केला. आपल्या पुतण्याचा आंदोलनात बळी गेलेला पाहून सुद्धा ते कधीही आंदोलनांपासून दूर झाले नाहीत. त्यांनी मळवलेल्या वाटेचा महामार्ग बनविण्याची प्रतिज्ञा करून आणि तशी वाटचाल करून त्यांना श्रद्धांजली वाहाण्याचे आवाहन त्यांनी केले.

डी. एल. कराड यांनी डॉ. एन. डी. पाटील यांचे करारी, कणखर, सामर्थ्यशाली व्यक्तिमत्त्व कार्यकर्त्यांना आत्मविश्वास देणारे होते, असा त्यांचा गौरव केला. ते आपल्यातून गेले असले, तरी शोषणमुक्त समाज निर्माण करण्याचा मार्ग त्यांनी दिला आहे, संस्कार रूजविले आहेत, त्यानुसार प्रतिज्ञा करून मजबुतीने पुढे जाऊ या आणि त्यांच्या स्मृती कायम ठेवून त्यांना आदरांजली अर्पण करू या, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

महा. अंनिसचे उपाध्यक्ष आणि प्रसिद्ध मनोविकारतज्ज्ञ डॉ. प्रदीप पाटकर यांनी डॉ. एन. डी. पाटील यांचे भव्यदिव्य व्यक्तिमत्त्व गरुडासारखे मायेची पाखर घालणारे आणि भरारी घ्यायला शिकवणारे होते, असा त्यांचा उल्लेख केला. त्यांनी मनाचा एक कोपराच नव्हे; तर मनाचे संपूर्ण प्रशस्त दालनच काबीज केल्याचे सांगताना डॉ. पाटकर यांना भरून आले.

प्रख्यात विचारवंत डॉ. यशवंत मनोहर यांनी असे प्रतिपादन केले की, डॉ. एन. डी. पाटील यांना सर्वच परिवर्तनवादी चळवळींनी आणि महाराष्ट्राने अभिवादन केले पाहिजे आणि पुढील पिढ्यांपर्यंत त्यांना पोहोचविले पाहिजेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वसमावेशक होते, मार्क्स, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचे प्रारूप त्यांच्या कार्यात होते. मुस्लीम, आदिवासी भटके, बौद्ध, शेतकरी या सर्वांचे प्रश्न त्यांनी आपले मानले आणि त्यानुसार राजकारण, समाजकारण केले. त्यांचे आयुष्यच एक चळवळ होते. ते समतावादी, संविधाननिष्ठ होते, ते जसे बोलत तसे जगत होते. त्यांनी कधीही, संविधान, विचार आणि निष्ठेशी तडजोड केली नाही. ते कार्यकर्ता, नेता, सेनापती आणि मार्गदर्शक, कर्मवीर आणि विचारवंत होते, लेखक होते हे पुढच्या पिढ्यांना गौरवाने सांगितले पाहिजे, असे विचार व्यक्त करून अभिवादन केले.

प्रसिद्ध विचारवंत गजानन खातू यांनी डॉ. एन. डी. पाटील यांच्यासोबत ३०-३५ वर्षे केलेला संवाद आणि आंदोलने यांचे स्मरण केले. ते नैतिकतेचा एक मापदंड होते आणि त्यांच्यारूपाने असा शेवटचा मापदंड गेल्याबद्दल दुःख व्यक्त केले. आज भांडवलशाही सर्व काही ताब्यात घेत असताना ते असते तर त्यांनी टोकाची भूमिका न घेता नव्या अंगाने यासाठी विचार केला असता असे प्रतिपादन त्यांनी केले.

महा. अंनिसचे उपाध्यक्ष आणि प्रसिद्ध साहित्यिक उत्तम कांबळे यांनी डॉ. एन. डी. पाटील पाटील यांना आपण गेली ४०-४५ वर्षे अनुभवत आहोत हे सांगून त्यांचा जन्म समग्र परिवर्तनाच्या जन्मजात लढाईसाठी झाल्याचे विचार व्यक्त केले. तसेच मुळे खोलवर गेल्यावर आणि फांद्या उंचावल्यावरच आधारवड तयार होतो, तसेच डॉ. एन. डी. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व होते हे सांगितले. राजकीय सभेतील भाषण कसे करायचे याचे धडे त्यांनी दिल्याची आठवण उत्तम कांबळे यांनी सांगितली. इस्लामपूर आंदोलनाच्या वेळी पोस्टरवर लिहिलेल्या 'सरणावरती आज आमुची पेटतात प्रेते, उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते....' या कुसुमाग्रज

यांच्या कवितेतील ओळींमधील आशावाद आणि विश्वास घेऊन पुढे गेल्यास अंधार संपणार आहे, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

महा. अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांनी महा. अंनिसच्या संघटित कामात सुरुवातीपासूनच डॉ. एन. डी. पाटील यांचे पाठबळ, मार्गदर्शन होते आणि त्यामुळे शक्ती, आत्मविश्वास आणि ऊर्मी मिळाल्याचे सांगितले. जादूटोणाविरोधी कायदा आणि सामाजिक बहिष्कारविरोधी कायदा आणताना त्यांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाचा उल्लेख केला. तसेच लोकशाहीत विविध प्रश्नांना कसे भिडायचे, प्रशासनाला बाध्य कसे करायचे याची शिकवण त्यांनी दिली. त्यांनी दिलेले प्रेम, आपुलकी, मार्गदर्शन यांना आपण मुकलो आहोत आणि पोरकेपणा जाणवत आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. त्यांनी दिलेली शिदोरी सोबत घेऊन त्यांच्या स्मृती जागृत ठेवण्याचे आवाहन करून त्यांनी डॉ. एन. डी. पाटील यांना अभिवादन केले.

शेवटी आभार प्रदर्शन होऊन अभिवादन सभेचा कार्यक्रम संपला.

●




शनिशिंगणापूरच्या शनिमंदिराच्या चौथऱ्यावर बायकांना प्रवेश मिळायला पाहिजे यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आंदोलन केले. त्यावेळी या आंदोलनात डॉ. एन. डी. पाटील, डॉ. नरेंद्र दाभोलकर, डॉ. श्रीराम लागू, डॉ. बाबा आढाव, प्रा. पुष्पा भावे आदी सहभागी होते.



अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अर्थात जादुटोणाविरोधी कायद्याच्या जनजागृती मोहिमेस सुरुवात करताना प्रा. एन. डी. पाटील, अभिनेते सदाशिव अमरापूरकर, डॉ नरेंद्र दाभोलकर, संजय बनसोडे.



डॉ. एन. डी. पाटील यांच्या वयाच्या नव्वदीनिमित्त कोल्हापूर येथे महाराष्ट्र अंनिसने कृतज्ञता सोहळा आयोजित केला होता. त्यावेळचे क्षणचित्र. मेधा पाटकर, सरोज पाटील, लक्ष्मीकांत देशमुख, अविनाश पाटील आदी उपस्थित होते.



मी कास्ट फ्री मूव्हमेंटतर्फे एन.डी.पाटील व सरोज पाटील यांना 'शरद-प्रतिभा पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. यावेळी खासदार श्रीनिवास पाटील उपस्थित होते.




कोल्हापूर येथे झालेल्या निर्भय मॉर्निंग वॉकमध्ये सहभागी झालेले एन. डी. पाटील, शाहीर राजू राऊत, कृष्णात स्वाती, बी. एम. पडवळे, टी. एस. पाटील, सीमा पाटील, मेघा पानसरे आदी कार्यकर्ते.



शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाच्या तपासात गती यावी या मागणीसाठी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची एन. डी. पाटील, आमदार कपिल पाटील, राहुल भोसले आदी.



इस्लामपूर येथे २००० साली झालेल्या महाराष्ट्र अंनिसच्या राज्य कार्यकारणीत बोलताना एन. डी. पाटील. मंचावर डॉ. श्रीराम लागू, डॉ. नरेंद्र दाभोलकर.



जादूटोणाविरोधी कायद्याच्या मागणीसाठी निदर्शने करताना एन. डी. पाटील, डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि इतर मान्यवर कार्यकर्ते.



सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा व जागतिकीकरणविरोधी कृतिसमितीने आयोजित केलेल्या आदिवासी व शेतकरी जमीन हक्क परिषद – मोर्चासमोर बोलताना एन. डी. पाटील. यावेळी किशोर ढमाले, प्रतिमा परदेशी आदी उपस्थित होते.

---

Book-Post

प्रति, ______________________

______________________

______________________

**प्रेषक,**

संपादक
**अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका**
कल्पतरू, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, जि. सांगली–४१५४०९.
मो.: ९८६०४३८२०८

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.